# गांधींच्या सहवासात एक आठवडा

**आणि**

## लुई फिशरनी घेतलेल्या गांधीजींच्या इतर काही मुलाखती

**लुई फिशर**

अनुवाद

**ब्रिजमोहन हेडा**

**माझे व्यक्तित्व घडवण्यात मदत करणाऱ्या**

**श्रीमती केशरबाई महाविद्यालयाच्या माजी आणि आजी शिक्षकवृंदाला**

**सादर समर्पित**

# लेखकाचे निवेदन

ही लहानशी पुस्तिका प्रकाशित करण्यात माझा कोणताही दोष नाही. गांधींबोबर मी जेव्हा एक आठवडा होतो तेव्हा मी अतिशय काळजीपूर्वक रोजनिशी ठेवली होती. ती टिपणे हरवू नये वा नष्ट होऊ नये म्हणून अमेरिकेत गेल्यानंतर मी ती व्यवस्थित लिहून काढली होती. माझ्या मित्रांनी जेव्हा ही टिपणे पाहिली तेव्हा त्यांनी मी ती पूर्ण स्वरूपात प्रकाशित करावी असा आग्रह धरला. मी त्यांना सागितलेसुद्धा की माझ्या हिंदुस्थानातील भ्रमंतीचा हा फार त्रोटक अहवाल होईल. हिंदुस्थानात माझी इतरही अनेक लोकांशी चर्चा झाली होती आणि तीसुद्धा अत्यंत उपयोगी आणि फलदायी होती. परंतु त्या उद्धृत करण्याकरिता नव्हत्या. केवळ गांधींवरील पुस्तक म्हणूनही हिंदुस्थानवरील हे व्यापक पुस्तक होणार नाही. माझा मित्र म्हणाला, “ठीक आहे, तसे असेल तर हे सर्व प्रास्ताविकात लिही.”

गांधीशी झालेली ही चर्चा माझ्याकरिता संपन्न करणारी स्फूर्तिदायक होती. नवी दिल्लीतील व्हाईसराय लॉर्ड लिनलिथगो मला म्हणाले होते, “हिंदुस्थानात गांधी ही सर्वाधिक मोठी गोष्ट आहे.” हे बरोबर आहे. गांधी ही अद्वितीय घटना आहे. त्याच्या व्यक्तिमत्वाशी संपर्क झाल्याने मन उत्तेजित होते. ते माझ्याजवळ जे काही म्हणाले होते त्याचा मी एखाद्या लघुलेखकाप्रमाणे अहवाल तयार केला होता. तोच मी पुढील पानांमध्ये उद्धृत करत आहे. घांधींवरील माझे भाष्य या पुस्तीकेच्या भाष्य या प्रकरणात सापडेल.

# अनुवादकाचे दोन शब्द

गांधींजीच्या संकलित साहित्यातील खंडांचा अनुवाद करताना लुई फिशरशी गांधीजींची जी चर्चा झाली होती तिचा अनुवाद करण्याची संधी मला मला मिळाली होती. या मुलाखती वाचल्यानंतर यावर लुई फिशरने या मुलाखतींसबंधी लिहिलेल्या पुस्तकाचा अनुवाद करावा अशी इच्छा झाली. परंतु जोपर्यंत गांधीजींच्या संकलित साहित्याच्या अनुवादाचे काम पूर्ण होत नाही तोपर्यंत दुसऱ्या कोणत्याही पुस्तकाचे काम हाती घ्यायचे नाही असे मी ठरवले होते. आता ते काम संपलेले असल्यामुळे मी हा अनुवाद केला आहे.

दिलिपराज प्रकाशनने हा अनुवाद प्रकाशित करण्याची जबाबदारी घेऊन मला काळजीतून मुक्त केले याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

हा अनुवाद वाचून मला अमूल्य सूचना केल्याबद्दल मी संभाजीनगरचे (औरंगाबाद) माझे मित्र रमाकांत पाठक यांचाही आभारी आहे.

ब्रिजमोहन हेडा

brijmohanheda@gmail.com

San Jose, U.S.A

जून ३, १९४२

नवी दिल्लीहून निघालेल्या उकाडा होत असलेल्या, धुळीने भरलेल्या जलद आगगाडीतून सत्तावीस तास प्रवास केल्यानंतर मी मध्यप्रांतातील वर्धा नावाच्या एका लहानशा शहरात रात्री ८.३० ला पोहोचलो. गांधीजींशी माझी मुलाखत ठरवायला १० दिवसांपूर्वीच मी जवाहरलाल नेहरूंना सांगितले होते. तुमच्याशी गांधीजींची मुलाखत ठरली आहे असे नेहरूंनी मला वर्ध्याहून काही दिवसांनी लिहिले होते. त्यांनी मला वेळ ठरवण्याकरिता गांधीजींचे सचिव महादेव देसाईंशी संपर्क करण्याचा सल्ला दिला होता. मला कोणतीही वेळ चालेल असे मी देसाईंना लिहिले आणि त्यांची मला लगेच तार आली “स्वागत - महादेव देसाई.”

वर्ध्याला मी गाडीबाहेर पाऊल टाकताच पांढऱ्या शुभ्र पोषाखातील एक तरुण गृहस्थ माझ्याकडे आले आणि तुम्ही फिशर आहा काय असे त्यांनी मला विचारले. मीच फिशर आहे असे त्यांना सांगितल्यानंतर “मला गांधीजींनी तुमची भेट घेण्याकरिता पाठवले आहे” असे तो म्हणाला. एक टांगा आमची वाट पाहत होता. टांग्याला एक घोडा जुंपलेला असतो आणि त्याला दोन चाक असतात. त्यात चालकामागे पाठ करून दोन लोक बसतात. आम्ही काळोखातच शहराबाहेर पडलो आणि एका घरी पोहोतलो. ते घर हिंदुस्थानातील एका करोडपतीने काँग्रेस पक्षाला वसतिगृह म्हणून उपयोग करण्याकरिता दिले होते. तिथे मी एका पोर्चवर उघड्या आकाशाखाली झोपलो. तिथे रात्रभर कॉग्रेसचा पांढराहिरवा ध्वज तारायंत्रासारखा फडफड आवाज करत फडफडत होता.

# जून ४, १९४२

मी सकाळी सवकर उठलो आणि सेवाग्रामला जाण्याकरिता गांधीजींच्या दंतचिकित्सकासह एका टांग्यात बसलो. गांधीजी जेव्हा तुरुंगात नसायचे तेव्हा गांधीजींचे घर या खेड्यात असायचे. दंतचिकित्सक म्हणाला, "इंग्लंड समंजस मालक आहे." मी त्याला गांधीजींबद्दल बोलते करण्याचा प्रयत्न केला, पण त्याला राजकारणावरच बोलण्याची इच्छा होती.

टांगा थांबला. मी झटकन उडी मारली आणि माझ्यासमोर एक उंच करड्या रंगाची आकृती - गांधी उभे होते. मी लांबलांब जलद पावले टाकत त्यांच्याकडे चालत गेलो. त्यांनी त्यांचे दोन्ही हात दोन स्त्रियांच्या खांद्यावर ठेवलेले होते. त्या त्यांच्या दोन्ही बाजूंनी चालत होत्या. त्यांच्या पंचाखाली त्यांचे काटकुळे पाय स्पष्ट दिसत होते. त्यांच्या पायात कातडी चपला होत्या आणि त्यांच्या डोक्यावर एक घडी केलेला रुमाल बांधलेला होता. त्यांनी खाद्यावरून एक चादर लपेटलेली होती. ते इंग्रजी उच्चारात म्हणाले, "मि. फिशर" आणि आम्ही हस्तांदोलन केले. दंतचिकित्सकाकडे वळून त्यालासुद्धा त्यांनी अभिवादन केले. मग मी त्यांच्या मागेमागे दोन लोखंडी कांबीवर ठेवलेल्या लाकडी तक्त्याकडे गेलो. ते खाली बसले, तक्त्यावर हात टेकवला आणि मला म्हणाले, "बस." ते पुढे म्हणाले, "जवाहरलालने मला तुझ्या पुस्तकासंबंधी आणि तू कशा प्रकारचा माणूस आहे हे सांगितलेले आहे. तू इथे आला याचा आम्हांला आनंद होतो. तू किती दिवस थांबणार आहेस?"

"मी काही दिवस राहीन" मी म्हणालो.

"अरे वा! मग आपल्याला बऱ्याच गप्पा मारता येतील.".

एक तरुण त्यांच्याकडे आला आणि परत परत त्यांच्या पायाला हात लावून तो त्यांना नमस्कार करू लागला.

"बस, बस" ते पुटपुटले. त्याचा अर्थ "पुरे, पुरे" आहे अशी मी कल्पना केली. माझा अंदाज बरोबर होता असे नंतर माझ्या लक्षात आले. नतर थोड्याच वेळात अजून दोन तरुण आले आणि त्यांनीही तसेच केले. गांधीजींनी 'ठीक आहे' असे म्हणून त्यांना जाण्याकरिता सांगितले.

तुम्ही राहण्याकरिता हेच गाव का निवडले असे मी त्यांना विचारले. त्यावर ते काही तरी म्हणाले आणि त्यांनी एका नावाचा उल्लेख केला, पण त्यांनी उच्चारलेले नाव मला काही कळू शकले नाही. मी त्यावर काहीच

बोललो नाही. मला हिंदुस्थानी नाव काही कळू शकले नाही हे त्यांच्या लक्षात आले. मग ते म्हणाले की मीराबेन या इंग्रज आहेत आणि पूर्वाश्रमीच्या या स्लेड आहेत. त्या माझ्याबरोबर बऱ्याच काळापासून आहेत. मी हिंदुस्थानच्या मधल्या भागात राहावे अशी मुळात त्यांचीच कल्पना होती. मग मीच त्यांना असे ठिकाण शोधायला सांगितले. मला गावामध्ये राहण्याची इच्छा नव्हती कारण तेथिल वातावरण अतिशय घाणेरडे असते आणि तिथे गोंगाटही फार असतो. "इथे गावाबाहेर किती तरी चागले आहे." दंतचिकित्सकाने कवळीबद्दल बोलायला सुरुवात केली आणि गांधींनी त्याला स्पष्ट करून सांगितले की मी ही जी कवळी लावली आहे तिने नीट चावता येत नाही. एका स्त्रीने तीन कवळ्या आणि पाणी भरून पितळेचे भांडे आणले आणि मी तिथून जाण्याचा विचार करू लागलो. तोच गांधी मला म्हणाले, "तू माझ्याबरोबर सकाळ-संध्याकाळी दररोज फिरायला येशील. आणि आपल्याला बोलण्याकरिता इतर वेळीही संधी मिळेल." मी नमस्कार केला आणि तिथून निघालो.

मला सेवाग्राम येथील विश्रामगृहात राहण्याचे स्वातंत्र्य मिळाले होते. त्या विश्रामगृहात एक खोली सर्वात जास्त थंड होती. त्या वसतिगृहाचे अंगण मातीचे होते आणि छप्पर बांबूचे. खोलीत किती तरी बिछाने टाकलेले होते. त्या खोलीतून एका लहानशा बोळीने स्वयंपाकघरात जाता येत असे. तसेच जवळच पाण्याची खोली होती. त्या खोलीतील अंगणाला फरशा लावलेल्या होत्या. तेथील जमिनीवर मोठ्या संख्येत टिनाच्या आणि पितळेच्या बादल्या ठेवलेल्या होत्या. तसेच तिथे आंघोळीचे दोन टब होते. घरगुती काम करणारी एक वयस्कर बाई गावातील विहिरीतून घागरीने पाणी काढून ते डोक्यावर आणायची आणि ते त्या टबात टाकून टब भरायची. तुमची काळजी खुरशेदबेन घेईल असे गांधींनी मला सांगितले होते. कुमारी खुरशेद पारसी बाई होती आणि तिचे वय अदांचे चाळीसच्या दरम्यान असावे. तिने हातताईची जाडीभरडी पिवळ्या रंगाची साडी घातलेली होती. ती फ्रांस आणि इटालीत सहा वर्षे संगीत शिकली होती. परंतु पंधरा वर्षांपूर्वीच तिने संगिताचा व्यवसाय सोडला होता आणि तेव्हापासून तिने गांधीजींचे शिष्यत्व स्वीकारले होते. तिचे कुटुंब करोडपती आहे. पहिल्या महायुद्धाच्या वेळी तिच्या आजोबांचा वयाच्या पंचाण्णव्या वर्षी मृत्यू झाला होता. ब्रिटिश हाऊस ऑफ कॉमन्सचे ते पहिले हिंदुस्थानी सदस्य होते. सकलातवाला हे अजून असे गृहस्थ होते की जे साम्यवादी पक्षाचे होते आणि ब्रिटिश संसदेचे तिसरे आणि शेवटचे सदस्य होते.

खुरशेदबेन हुशार चपळ होत्या. इथे हिंदुस्थानी राष्ट्रवादावर काही अधिकच भर आहे असा वाद मी त्यांच्याशी घातला. अशाने हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यानंतर कदाचित फासीवादी होऊ शकेल आणि मग त्याला

ब्रिटिशांच्या राज्यात मिळते त्यापेक्षाही कमी स्वातंत्र्य मिळू शकेल असे मी म्हणालो. तिला माझा युक्तिवाद पटला नाही. आधी ब्रिटिशांना जाऊ द्या आणि मग हिंदुस्थान स्वतःच स्वतःच्या समस्या सोडवील असे तिचे म्हणणे होते. आम्हाला एकट्याने राहायचे आहे. एखाद्या घरी पाहुणे यावे आणि त्यांनी काही केल्या परत जाऊच नये अशातले हे आहे. अशा वेळी केव्हा एकदाचे हे पाहुणे जातील हाच विचार त्या घराच्या गृहिमीच्या मनात राहत असतो आणि पाहुण्याची निघून जाण्याचीच ती वाट पाहत असते.

अकरा वाजता जेव्हा मी अतिशय भुकेला झालो होतो तेव्हा खुरशेदने मला गांधीच्या घरी नेले. विश्रामगृहापासून ते जवळपास शंभर यार्ड दूर होते. ते एकमजली घर होते आणि त्याच्या भिंती चटईच्या होत्या आणि छप्पर लाल रंगाच्या कौलांचे. झोपण्याच्या खोलीतील चपला मी बाहेरील सिमेंटच्या पायऱ्यावरच ठेवल्या आणि मी पुढील खोलीत गेलो. तिथून मला घरातील मुख्य खोली दिसू शकत होती. गांधीजी जमिनीवर अंथरलेल्या गवताच्या पांढऱ्या बिछान्यावर पहुडलेले होते आणि त्यांचा एक शिष्य जमिनीवर बसून छताला टांगलेला काळा पंखा हलवत होता. हा पंखा विजेवर चालणाऱ्या पंख्याची जागा घेईल असे समजले जात होते. त्यांच्या झोपडीत मुळीच वीज नव्हती. गांधी उठले आणि मला म्हणाले, "आता तुमचा टोप आणि जोडे घाला. इथे या दोन गोष्टींशिवाय भागू शकत नाही. उष्माघात व्हायला नको." एका बाईने गांधीजींच्या डोक्यावर ठेवण्याकरिता घडी केलेला ओला रुमाल आणला. मग एक हात खुरशेदच्या खांद्यावर ठेवून ते चालू लागले. खुरशेद त्यांच्या एक पाऊल पुढे चाललेली होती. मैत्रीपूर्ण आवाजात ते म्हणाले, "या." आम्ही दोन घरे ओलांडून सर्वांच्या जेवणघराजवळ आलो. तो जाड्याभरड्या चटयांनी तयार केला होता. गांधीजींप्रमाणेच मीसुद्धा जोडे बाहेर काढले. मी माझा टोप खुरशेदला दिला. तिने तो भिंतीवरील एका खुंटीला लटकवला. गांधीनी दाखवलेल्या जागेवर आम्ही दोघे बसलो. गांधी आमच्यापासून थोडे अंतरावर बसले होते. माझ्या आणि खुरशेदच्यामध्ये नरेंद्र देव बसले होते. त्यांना दम्याचा विकार होता. कॉँग्रेसशी संलग्न असलेल्या समाजवादी पक्षाचे नरेंद्र देव पुढारी होते. मी एका आसनावर बसलो. ते अंदाजे एक फूट रुंद होते. गांधी एका उशीवर बसले आणि त्यांच्या डाव्या बाजूला त्यांची दंतविहीन पत्नी कस्तुरबा बसली होती. त्या सत्तर वर्षांच्या होत्या तर गांधी त्र्याहत्तर वर्षांचे होते. (माझ्या माहितीप्रमाणे कस्तुरबा गांधीजींपेक्षा सहा महिन्यांनी मोठ्या होत्या. - अनुवादक)

जेवण घराला दोन लांब भिंती होत्या आणि त्या विटांच्या एका भिंतीने जोडलेल्या होत्या. जेवणघरात प्रवेश करताच तिथे एक टेबल होता आणि त्याव अन्नाने भरलेली मोठाली ताटे आणि पाण्याने भरलेले जार होते. स्त्रिया वेगळ्या बसल्या. चमचमणारे डोळे तपकिरी रंगांचा चेहरा असलेल्या काही मुलांकडे मी पाहत

होतो. त्यांच्यातील काही तीन, पाच वा आठ वर्षांची असावी. ती मुले आश्रमातील सदस्यांची होती. थोड्याच वेळात प्रत्येकासमोर पितळेचे ताट आले, आणि किती तरी वाढपी आवाज न करता अनवाणी फिरत होते आणि ताटात अन्न वाढत होते. गांधींसमोर किती तरी वाट्या आणि ताटल्या ठेवलेल्या होत्या. त्यांनी त्यांच्यावरील झाकण काढले आणि त्यांच्याजवळ बसलेल्या लोकांना ते ते वाढू लागले. मला पाण्याने भरलेला एक पेला दिला. गांधींनी मला एक मोठी वाटी भरून भाज्यांच्या सूप दिला. त्यात मला वाटते की पालकाची पाने आणि काही फळभाज्यांचे तुकडे होते. मग त्यानी धातूचा डबा उघडला आणि मला एक कडक, कागदासारखी पातळ गव्हाची पोळी दिली. तिचा रंग करडा होईल इतकी ती भाजलेली होती. एका बाईने माझ्या ताटात थोडे मीठ वाढले आणि मला पेला भरून दूध दिले. थोड्याच वेळात ती परत आली आणि मला सालीसह उकळलेले दोन आलू  आणि थोडे चुरून नरम केलेले आलू दिले. गांधी हसत हसत म्हणाले, "तुम्हाला वाढले आहे खरे, परंतु प्रार्थना संपेपर्यंत तुम्ही जेवणाला सुरुवात करू नका." मी त्यांना म्हणालो, "मुलांना वाढलेले असूनही त्यांनी ताटाला स्पर्शही केलेला नाही. यामुळे जेवायला सुरुवात करायला नको हे माझ्या लक्षात आले आहे. तीस वयस्कर गृहस्थांनी पांढरा पोषाख केलेला होता आणि ते सर्व मांडी घालून तपकिरी रंगाच्या जमिनीवर बसलेले होते. त्या सर्वांना वाढणे सुरू होते, परंतु कोणीही जेवणाला सुरुवात केली नव्हती. जेवणाकरिता आलेले सर्व लोक अन्नाचे भांडे एकाकडून दुसऱ्याकडे सरकवत होते. तेवढ्यात घंटा वाजली आणि एक उंच, धष्टपुष्ट माणूस ताटावरून नजर काढून डोळे मिटून उंच आवाजात प्रार्थना म्हणू लागला आणि त्यात गांधींसह सर्व सामील झाले. प्रार्थनेचा शेवट "शांति, शांति, शांति" या शब्दांनी झाला. देवने मला सांगितले की 'शांती; म्हणजे 'पीस'.

भाज्यांचा सूप खाण्याकरिता मला लहान चमचा दिला होता. परंतु बहुतेक लोकांनी तो गोल गव्हाच्या चौपदरी पोळीबरोबर खाऊन संपवला. एका स्त्री वाढपीने माझ्या पोळीवर मुक्तहस्ते तूप आणि मीठ ओतले. अन्न अगदीच बेचव नव्हते. गायीच्या उकळलेल्या दुधाची चव मारण्याकरिता मी थोडी साखर घेतली. (गांधींनी बकरीच्या दुधाऐवजी गायीच्या दुधाचा प्रचार सुरू केला होता. लोक जर गायीचे दूध घेऊ लागले तर ते गायींची अधिक चांगली निगा राखतील अशी आशा त्यांना वाटत होती.)

अधूनमधून बायकोला, खुरशेदला, देवला आणि मला वाढण्याकरिता थांबणे वगळता गांधीजी न थांबता जेवत होते. त्यांचे हात आणि बोट लांब आणि मजबूत होते. त्यांचे गुडघे मोठे होते आणि त्यांची हाडे रुंद आणि मजबूत होती. त्यांची कातडी मऊ आणि स्वच्छ होती. ते वाटीत हात घालत तेव्हा त्यांचे थरथरत

नसत. त्यांची पत्नी त्यांना गवताच्या पंख्याने अधूनमधून सारखी हवा घालायची. स्वतःला पुसून टाकण्याचे त्या जणू काय प्रतीक होत्या.

एकदा मध्येच थांबत गांधींनी मला विचारले, “तुम्ही रशियात चौदा वर्षे राहिला आहा. तुमचे स्टॅलीनबद्दल काय मत आहे?”

मला अतिशय उकडत होते, जेवण सुरू असल्यामुळे माझे हात ओशट झालेले होते. मी थोडक्यात उत्तर दिले, “अतिशय कर्तृत्ववान आणि अतिशय क्रूर.”

“हिटलरइतके क्रूर?”

“किमान तितके तरी असतीलच.”

काही वेळ थांबून गांधींनी माझ्याकडे वळून विचारले. “तुम्ही व्हाईसरायना भेटला काय?”

“हो.” पण गांधीनी नंतर विषय बदलवला. मी माझे गुढघे चाचपडत होतो. त्यांच्यावर फार मोठा भार पडला होता. हिंदुस्थाना ैं ंना आपल्या शरीराचे ओझे शरीराच्यासर्व भागावर कसे पाडावे हे कळते. परंतु मला ती कला अवगत नव्हती. मी एका पायावर दुसरा पाय ठेवून उभा राहिलो, आणि मला काहीसे बरे वाटू लागले. गांधी मला म्हणाले, “तू स्तब्ध उभा आहेस?”

मी म्हणालो, “तसे काही नाही, नवल वाटावे इतके जेवण चांगले होते.”

“तुला हवे तितके पाणी तू पिऊ शकतोस. आम्ही त्याची चांगली काळजी घेतो. ते चांगले उकळलेले असते. आणि आता तू तुझा आंबा खा. आता जीवनात पहिल्यांदाच मी एक आंबा खाऊन पाहण्याचा प्रयत्न करीन. खुरशेद म्हणाली हे सर्व आटोपले की मला आंघोळ करायची आहे. मी आंबा सोलायला सुरुवात केली. गांधी आणि इतर हसू लागले. गांधी म्हणाले की सामान्यपणे आम्ही हातात घेऊन त्याला चोहोकडून पीळ देतो आणि तो नरम करतो, आणि मग त्यातील रस चोखतो. परंतु आंबा चांगला आहे की नाही हे पाहण्याकरिता तू तो सोलून पाहिला हे चांगलेच केले. ते म्हणाले, “आमच्याप्रमाणे खाण्याचा तू जी धैर्याने तयारी केली आहेस त्याकरिता तर तुला बक्षीस म्हणून पदकच द्यायला पाहिजे.” मी जेवण संपवत नाही तोच गांधी उठायच्या आधी तुम्ही जाऊ शकता असे खुरशेदने मानेनेच सुचीत केले. मी गांधींना नमस्कार केला, टोप आणि जोडे घातले आणि तिथून निघालो. गांधी तीन वाजता मला भेटतील असे खुरशेदने मला सांगितले.

हिंदुस्थानी सामान्यपणे हस्तांदोलन करत नाहीत. ते जेव्हा भेटतात वा एकमेकांचा निरोप घेतात तेव्हा ते दोन्ही ओठांच्या पातळीत दोन्ही पंजे आणून नमस्कार करतात, गोड हसतात आणि हात हलवतात. ते जेव्हा असे करतात तेव्हा त्यांचे वागणे फार गोड आणि लाघवी वाटते. मी जेव्हा गांधींसमोर नम्रपणे वाकलो तेव्हा त्यांनी मला हाताने स्पर्श करून माझा निरोप घेतला.

मी माझ्या खोलीत गेलो. बारा ते एकपर्यंत झोपलो आणि उकाड्याने घामाघूम झालो. पाण्याच्या खोलीत जाऊन मी दिवसाची तिसरी आंघोळ केली. मी न्हाणीघरात सरळ जाऊन उभा राहिलो आणि लहानशा पितळी भांड्याने माझ्यावर पाणी ओतू लागलो.

तीन वाजायला काही मिनिटेच शिल्लक असताना गांधींकडे जाण्याकरिता गरम वाळू आणि रेतीतून शंभर यार्ड चालत गेलो. उकाड्याने माझे संपूर्ण डोके आतून शुष्क झाल्यासारखे वाटत होते. उष्णतामान एकशे दहा फॅरनहाईट होते. मी गांधींच्या खोलीत शिरलो तेव्हा त्यांच्या खोलीत पांढऱ्या पोषाखात आधीच सहा लोक जमिनीवर बसलेले होते. काळ्या साडीतील एक बाई पंख्याची दोरी ओढत होती. त्या खोलीला शोभा आणणारी तिथे एकच गोष्ट होती, आणि ती म्हणजे येशू ख्रिस्ताचा तिथे असलेला काचेचा पुतळा. त्यावर “हिअर ईज अवर पीस” हे शब्द इंग्रजीत कोरलेले होते. गांधी त्याच्या गवती बिछान्यावर बसले. तेच त्यांचे अंथरुणही होते. त्यांच्या पाठीशी एक लाकडी तक्ता होता आणि त्याची पाठ आणि तक्ता यांच्यामध्ये एक तक्क्या ठेवलेला होता. त्यांनी सोनेरी रंगाचा चष्मा लावलेला होता आणि ते फौंटनपेनने एक पत्र लिहत होते. त्यांचे पाय कैचीप्रमाणे दुमडलेले होते. एका गुढघ्यावर त्यांनी एक लहानसा लाकडी तक्ता ठेवला होता, त्या तक्त्यावर त्यांचे पत्र लिहिण्याचे कागद ठेवलेले होते. हाताने तयार केलेल्या एक लाकडी स्टँडमध्ये अजून तीन फौंटनपेन ठेवलेले होते. त्यांच्या डाव्या बाजूला काही पुस्तकांची एक चळत नीट ठेवलेली होती. ते मला म्हणाले, “ये आणि पंखा हलवणाऱ्या त्या स्त्रीमागे बस. ती जागा सगळ्यात थंड आहे.” मी त्या कोपऱ्यात बसलो आणि माझी पाठ मी भिंतीला लावलेल्या चटईला टेकवली. गांधी म्हणाले, “तू जर काही वाटून घेणार नसशील तर हे लोक इथेच थांबतील. ते काहीही बोलणार नाहीत. तुझा जर आक्षेप असेल तर ते जातील.” देव, देसाई आणि खुरशेदसह आश्रमाचे किती तरी सदस्य तिथे होते. इतके सगळे लोक असताना मुलाखत घेण्याची कल्पना मला कशीशीच वाटली. परंतु मी म्हणालो, “माझी काही हरकत नाही.” आणि मी सावरून बसलो.

गांधी - आता मी पूर्णपणे तुमच्या सेवेशी सादर आहे.

लुई फिशर - मला वाटते की क्रिप्स मिशन ही हिंदुस्थानच्या इतिहासाला कलाटणी देणारी घटना होती. क्रिप्सच्या अपयशाचे महत्त्व देशाला बहुधा जाणवू लागले आहे, आणि त्या आकलनाने मोठ्या गोष्टी होऊ शकतील. क्रिप्सना अपयश का आले याबद्दलचे तुमचे मत मला तुमच्याकडून जाणून घ्यायचे आहे.

गां. - क्रिप्स आले तेव्हा त्यांनी तार पाठवून मला नवी दिल्लीत भेटायला बोलावले होते. माझी जाण्याची इच्छा नव्हती, परंतु मी गेलो कारण त्यामुळे काही चांगले होईल असे मला वाटले. त्यांनी हिंदुस्थानात आणलेल्या ब्रिटिश सरकारच्या प्रस्तावात काय आहे यासंबंधी मी अफवा ऐकत होतो, परंतु मी प्रस्ताव पाहिला नव्हता. त्यांनी तो मला दिला आणि त्याचा थोडा अभ्यास केल्यानंतर मी त्यांना म्हणालो, “तुम्हाला जर हाच प्रस्ताव द्यायचा होता तर तुम्ही हिंदुस्थानात कशाला आला? हिंदुस्थानला तुम्हाला हाच सगळा प्रस्ताव द्यायचा असेल तर तुम्ही पुढील विमान घ्या आणि घरी जा.” क्रिप्स म्हणाले, “मी त्याबद्दल विचार करीन.”

लुई फिशर - क्रिप्सच्या प्रस्तावाबद्दल तुमचा नेमका आक्षेप काय आहे? ब्रिटिश राष्ट्रकुलातून बाहेर पडण्याच्या अधिकारासह त्यात तुम्हाला उपनिवेशाचा अधिकार दिलेला नाही काय?

गां. - चार्ल्स ॲन्ड्र्यूज (मँचेसटर गार्डियनचे हिंदुस्थानातील वार्ताहर आणि अनेक वरषांपासून गांधींचे निकटचे मित्र.) नेहमी म्हणायचे की हिदुस्थानकरिता उपनिवेश नाही. ब्रिटनबरोबर आमचे तसे संबंध नाहीत जसे इतर उपनिवेशांचे आहेत. ते उपनिवेश गोऱ्यांचे आहेत आणि तिथे प्रामुख्याने ब्रिटनमधून गेलेले लोक आणि त्यांचे वंशज राहतात. आम्हाला असा कोणता तरी दर्जा मिळावा अशी आमची इच्छा नाही. आम्हाला जर एखादा दर्जा देण्यात आला तर त्याचा अर्थ आम्ही स्वतंत्र नाही असा होईल.

राष्ट्रकुलातून वेगळे होण्यासंबंधी म्हणाल तर त्यात फार दोष आहेत. क्रिप्सच्या प्रस्तावात संस्थानिकांबद्दल जी तरतूद करण्यात आली आहे त्यात एक मोठी उणीव आहे. ब्रिटनचे म्हणणे आहे की संस्थानिकांशी झालेल्या करारानुसार संस्थानिकांचे रक्षण करणे आमचे कर्तव्य आहे. खरे म्हणजे हे करार संस्थानिकांवर ब्रिटनच्या हिताकरिता लादण्यात आले होते. बिकानेरचे महाराज, आणि इथे त्यांचा हा जो उल्लेख करण्यात आला आहे तो केवळ त्यांचा वैयक्तिक उल्लेख नाही तर इतर कोणत्याही संस्थानिकाप्रमाणे आहे, ब्रिटिश येण्यापूर्वीही ते राज्य करत होते तेव्हा त्यांना आतापेक्षा जास्त अधिकार होते हा त्यातील मोठाच दोष आहे. दुसरा दोष पाकिस्तानला मान्यता आहे. हिंदू आणि मुसलमानांमधील मतभेदाला ब्रिटिशांच्या सत्तेत खतपाणी घालण्यात आले. आता क्रिप्सच्या प्रस्तावात त्यांना अधिकच महत्त्व देण्यात आले आहे.

लॉर्ड मिंटो जेव्हा व्हाईसराय होते [१९०९ साली] (चौकोनी कंस मुळाप्रमाणे आहे.) तेव्हा या दोन धार्मिक समुदायांच्या आधारावर विभक्त मतदार संघ निर्माण करून त्यांनी याची सुरुवात केली. तेव्हापासून ब्रिटिशांनी आमच्यात अजून अजून फूट पाडायला सुरुवात केली. लॉर्ड कर्झन फार मोठे प्रशासक होते. चेम्सफोर्ड, इर्विन [हॅलिफॉक्स] आणि लॉर्ड लिनलिथगो यांच्याशी जशी माझी भेट झाली होती तशी त्यांच्याशी कधीही माझी भेट झाली नव्हती. परंतु ते एक गोष्ट एकाला सांगायचे, दुसऱ्याला दुसरी आणि तिसऱ्याला तर अजूनच तिसरी गोष्ट सांगायचे. सर सॅम्युअल होरशी बोलताना मी कोणाशी बोलतो आहे, त्यांची काय भूमिका आहे हे मला माहीत असायचे. परंतु कर्झनबद्दल नाही.

कर्झननी बंगालचे जे विभाजन केले ती आवश्यक सुधारणा होती. ती चांगली उपाययोजना होती. परंतु धर्माच्या आधारावर ते विभाजन करण्यात आले होते. क्रिप्सनी आपल्या प्रस्तावात हाच आधार घेतला आहे; त्यांच्या प्रस्तावात हा दुसरा मोठा दोष आहे. जोपर्यंत ब्रिटिश इथे आहेत तोपर्यंत हिंदुस्थानात ऐक्य होऊ शकत नाही.

लु. फि. - ठीक आहे, तुम्हाला क्रिप्सनी युद्धोत्तर तडजोडीच्या प्रस्तावाची रूपरेषा आवडली नाही परंतु मध्यंतरकालीन वा लगेच करण्यासारख्या ज्या तरतुदी होत्या त्यांतील तुम्हाला काहीही वांछनीय वाटत नाही काय? भविष्यकालीन योजना जरी बाजूला ठेवली तरी ताबडतोब करण्यासारख्या ज्या तरतुदी त्या प्रस्तावात आहेत त्यांना काही मूल्य असू शकते असे तुम्हाला वाटत नाही काय? यामुळे जनतेवर शासन चालवण्याचा जसा अनुभव तुम्हाला मिळू शकला असता तसेच युद्धानंतर स्वातंत्र्याची मागणी करण्याचा तुम्हाला अधिकार मिळू शकणार नव्हता काय?

गां. - ढोबळमानाने मी त्या प्रस्तावाकडे याच भावनेने पाहण्याचा प्रयत्न केला होता. परंतु मी जेव्हा क्रिप्सच्या प्रस्तावाचा मजकूर पाहिला तेव्हा सहकार्याची मुळीच शक्यता नसल्याचे माझ्या लक्षात आले. मुख्य मुद्दा संरक्षणाचा होता. युद्धाच्या काळात संरक्षण करणे हे सरकारचे मुख्य काम असते. युद्धाच्या प्रत्यक्ष संचालनात हस्तक्षेप करण्याची मला मुळीच इच्छा नव्हती, नाही. हे करण्याची माझ्यात क्षमता नाही.

परंतु रुझवेल्टना डावपेचाचे कोणतेही प्रशिक्षण नाही, आणि जर ते असेलच तर ते थोडेसेच असेल. किंवा आपण चर्चिलला घेऊ.

लु. फि. - उदाहरण म्हणून तुम्ही रुझवेल्टला घेण्यात मुळीच संकोच बाळगू नका. मी मुद्दा समजू शकतो.

गां. - मुद्दा हा आहे की युद्धकाळात सैन्यावर नागरी लोकांचा अधिकार असला पाहिजे. नागरी लोकांना जरी युद्धाच्या डावपेचाचे सैन्याइतके प्रशिक्षण नसले तरी युद्धाच्या काळात सैन्यावर त्यांचा अधिकार असला पाहिजे. ब्रह्मदेशातील सुवर्ण पगोडावर जपानी बॉम्ब टाकू शकतील असे समजून ब्रह्मदेशातील ब्रिटिश जर तेथील पगोडा उध्वस्त करणार असतील तर ती चूक होईल, कारण ब्रह्मदेशातील तो सुवर्ण पगोडा ब्रह्मदेशाच्या आत्म्याशी जुळलेला आहे. ब्रिटिश जेव्हा येतात आणि सांगतात की आम्हाला इथे विमानतळ बांधायचा असल्यामुळे येथील शेतकऱ्यांनी आजच जायला पाहिजे तेव्हा माझे म्हणणे असते की, 'हा विचार तुम्हाला काल का सुचला नाही, आणि त्या गरीब बिचाऱ्या शेतकऱ्यांना जाण्याकरिता वेळ का दिला नाही, आणि त्यांना जाता येईल असे ठिकाण तुम्ही का शोधले नाही?'

लु. फि. - या गोष्टी हिंदुस्थानींच्या नियंत्रणात असाव्या असे जर तुम्हाला वाटत असेल तर मला खात्री आहे की सेनापती वेव्हेलना ही गोष्ट युद्धात अडथळा आणणारी वाटली असावी.

गांधी स्मित करत म्हणाले, "उपहारगृह चालवणे आणि स्टेशनरीची छपाई करणे अशी युद्धातील क्षुल्लक कामे आम्हाला देण्याची ब्रिटिशांची तयारी होती. यांना फार कमी महत्त्व आहे. मला जरी रणनीती येत नसली तरी आम्ही अशा काही गोष्टी करू शकलो असतो की ज्या युद्धातील यशाच्या दृष्टीने निर्णायक ठरू शकल्या असत्या. सुदूरपूर्वेतील अतिशय वाईट परिस्थितीत ब्रिटिशांना आमची मदत होऊ शकली असती.

लु. फि. - स्पष्ट आहे की तुमचा मुख्य भर संरक्षणावर होता.

ते (गांधी) सहमत झाले.

नेहरू आणि काँग्रेसच्या इतर नेत्यांचा हाच दृष्टिकोन होता काय?

गां. - आशा आहे की असेल, आशा आहे की नेहरू असाच दृष्टिकोन ठेवत असतील आणि मौलाना साहेबही (काँग्रेसचे तत्कालीन मुसलमान अध्यक्ष).

लु. फि. - वेगळ्या शब्दांत तुम्हाला क्रिप्सच्या प्रस्तावात काहीही चांगले आढळले नाही?

गां. - तुम्ही हा सरळ आणि नेमका प्रश्न मला विचारत आहा याचा मला आनंद होतो. मला त्यात काहीही चांगले दिसत नाही.

लु. फि. - तुम्ही हे क्रिप्सला सांगितले काय?

गां. - हो, मी क्रिप्सना सांगितले की, 'तुम्ही रशियात चमत्कार घडवला.'

लु. फि. - मी मध्येच हस्तक्षेप करत म्हणालो तुम्ही असे का म्हणाला? स्टॅफर्ड क्रिप्सनी रशियाला युद्धात ओढले नव्हते तर ऍडॉल्फ हिटलर नावाच्या सद्गृहस्थाने रशियाला युद्धात ओढले होते.

गांधीजी हसले आणि त्यांचे मित्रही हसले. "परंतु माझा आणि हजारो हिंदुस्थानींचा समज आहे की हा चमत्कार क्रिप्सनी घडवून आणला होता."

लु. फि. - तुम्ही जेव्हा असे म्हणाला तेव्हा क्रिप्सनी ते नाकारले नाही काय?

गां. - त्यांनी ते प्रशंसा म्हणून घेतले. आम्हाला वाटले की रशियावर आक्रमण होण्याच्या भीतीने स्टॅलीनने ब्रिटिशांची मदत मागितली होती.

लु. फि. - नाही, ते बरोबर नाही. आक्रमण झाल्यानंतर रशियाला ब्रिटन आणि अमेरिकेकडून मदत मिळाली आणि आता ती वाढत्या प्रमाणात मिळते आहे. परंतु हल्ला होण्यापूर्वी स्टॅलीन हिटलरला घाबरत होता आणि तो ब्रिटन वा क्रिप्सबरोबरची मैत्री दाखवत नव्हता.

गांधी पुढे म्हणाले, "ते काहीही असले तरी मी क्रिप्सला इथेही चमत्कार करून दाखवण्याकरिता मी सांगितले, परंतु ते त्यांच्या अधिकारात नव्हते."

लु. फि. - मला वाटते की इंग्लंडच्या जनतेच्या मनात काही तरी शिजते आहे. मागील उन्हाळ्यात मी इंग्लंडमध्ये विमानाने गेलो होतो आणि तिथे नऊ आठवडे राहिलो होतो. युद्धापूर्वी ज्यां लोकांच्या हाती शासन होते आणि ज्यांनी हे युद्ध ओढवून घेतले होते त्यांच्या हाती युद्ध संपल्यानंतर परत शासन द्यायचे नाही असे तेथील जनतेने ठरवले असल्याचे मला जाणवले. या लोकप्रिय विरोधाच्या अभिव्यक्तीचे मूर्तरूप क्रिप्स झाले असावे. यामुळे त्यांची पदोन्नती उत्साहवर्धक गोष्ट आहे.

गांधीजी मध्येच म्हणाले, "हो, आणि क्रिप्समध्ये महान मुत्सद्द्याचे गुण असल्याबद्दल मला शंका असल्यामुळे ही गोष्ट हतोत्साहित करणारीसुद्धा आहे. जवाहरलालचा मित्र असणाऱ्या आणि हिदुस्थानात रस असणाऱ्या माणसाने हा प्रस्ताव आणावा ही हतोत्साहित करणारी गोष्ट आहे.

स्पष्ट होते की तेव्हा गांधींच्या डोक्यात काही तरी विचार आला होता. बहुधा त्यांच्याबरोबरचा माझा तास संपत आलेला असावा. कारण ते म्हणाले, विशेष असे काहीही नाही. "लॉर्ड शॅन्की प्रकृतीची काळजी

घेण्याबद्दल मला म्हणाले होते. मी त्यांना म्हणालो, 'मी जर प्रकृतीची काळजी घेतली नसती तर या इतक्या म्हातारपणापर्यंत मी पोहोचलो असतो काय?' माझ्यात हा दोष आहे."

लु. फि. - मला वाटत होते की तुम्ही परिपूर्ण आहा.

ते हसत म्हणाले, "मी मुळीच परिपूर्ण नाही". जाण्यापूर्वी तुम्हाला माझ्यात शेकडो दोष आढळतील, आणि जर तुम्हाला ते आढळले नाही तर ते दाखवून देण्याकरिता मी तुम्हाला मदत करीन.

त्यांनी आपल्या मोठाल्या निकेलच्या घड्याळाकडे पाहिले. ते त्यांच्या कंबरेच्या पंचाला लटकलेल्या एका साखळीला बांधलेले होते. आता मी तुम्हाला एक तास दिला आहे.

मी नमस्कार केला आणि निघालो. या एका तासात दात नसलेली एक मुसलमान स्त्री त्यांच्या छातीवर घामाने भरलेला दुपट्टा बदलवण्याकरिता आली होती. मध्येही अनेकदा त्यांनी डोक्याला बांधलेला रुमाल अनेकदा काढला होता, त्याचा गोल गुंडाळून तो पाण्याने भरलेल्या एका पातेल्यात बुडवला, तो पिळला आणि परत आपल्या डोक्यावर ठेवला. दरवेळी ते जेव्हा आपल्या डोक्यावरील रुमाल काढायचे तेव्हा मला त्यांचा लहानसा चेहरा चांगल्या प्रकारे पाहायला मिळायचा. त्यांच्या अरुंद वरच्या ओठावर काळ्यापांढऱ्या, प्रामुख्याने पांढऱ्या मिशा होत्या. त्यांचे ओठ इतके अरुंद होते की त्यांचे नाक ओठांखाली यायचे. त्यांचा खालचा ओठ अतिशय संवेदनशील आणि बोलका होता. त्यांचे डोळे मृदू होते. त्यांचा चेहरा पण खालून लांबुळका होता. त्यांचे कपाळ फुगीर होते आणि त्यांचे कान मोठे. ते प्रकर्षाने डोक्याबाहेर आलेले दिसत होते.

मी विश्रांतीगृहात परतल्यानंतर काही मिनिटातच समाजवादी पुढारी (नरेंद्र देव) देव आश्रमातील एका सदस्याबरोबर आले. त्यांना माझ्याशी हिंदुस्थान, रशिया आणि युद्धासंबंधी चर्चा करायची होती. ते अतिशय ब्रिटिशविरोधी होते. या बाबतीत ते अतिशय भावनाशील होते. देव म्हणाले की असे असल्याबद्दल मला खेद होतो, परंतु वस्तुस्थिती ही अशीच आहे. ब्रिटनकडून हिंदुस्थानला बरेच काही सहन करावे लागले आहे. आणि राष्ट्राला हे जे काही सहन करावे लागले आहे त्याचीच ही प्रतिक्रिया आहे.

गांधी जे काही म्हणाले होते त्याचा मला संपूर्ण अहवाल तयार करायचा होता. देव आणि त्यांचे मित्र गेल्यानंतर गांधींच्या मुलाखतीकरिता घातलेला निळ्या पट्ट्या असलेला पायजामा आणि सदरा मी काढला आणि मुलाखतीची टिपणे लिहिण्याकरिता मी बसलो. पाच मिनिटातच मी थकलो आणि घामाघूम झालो. माझ्या पाण्याच्या खोलीत मी परत आंघोळ केली. ओसरीत मी टंकलेखन करत असतानाच मला एक तरुण

हिंदुस्थानी स्त्री घरासमोर फेरफटका मारत असताना दिसली. ती अनवाणी होती आणि तिने हातकताईच्या कापडाची चोळी घातली होती. ती तिच्या हातावर आणि छातीवर घट्ट बसलेली होती. तिने कंबरेपासून तर पूर्ण पाय झाकेल असा प्रकारे साडी नेसलेली होती आणि तिने साडीचा पदर आपल्या गळ्या आणि डोक्याभोवती गुंडाळलेला होता. तिची साडी गर्द पिवळ्या रंगाची होती आणि तिला रुंद चमकदार लाल काठ होता. माझे डोळे टंकलेखन यंत्रावर खिळलेले असल्यामुळे मला तिथे आग लागल्याचाच भास झाला. ती तिच्या डोक्यावरून मोठी घागर पाण्याने भरून नेत होती आणि त्या घागरीला एका हाताने तिने आधार दिला होता. धातूच्या चमचमणाऱ्या एका बांगडीशिवाय तिच्या हातात दुसरे काहीही नव्हते. घरासमोर असलेल्या कोठीत पाणी ओतून जेव्हा ती काही क्षणातच परतू लागली तेव्हा तिच्या डोक्यावरील घागर एकीकडे कललेली होती आणि डोक्यावरील मोळीत जणू काय ती घागर नृत्य करत होती. अशा प्रकारे ती त्या रणरणत्या कडक उन्हात ती तासंतास ते कठीण काम करत होती. एक लहानसा पाईप तिथे टाकला असता तर तिचे कितीतरी सर्व श्रम वाचले असते.

उन्हामुळे थकवा येईपर्यंत मी लिहीत होतो. मग मी खुरशेदशी गप्पा मारू लागलो. पाच वाजता रात्रीचे जेवण सुरू होत असल्याची घोषणा घंटीच्या मृदू आवाजाने केली. नेहमीच्या प्रार्थनेने जेवण सुरू झाले. आश्रमातील एक सदस्य गांधींजवळ बसलेला होता. तो गांधीशी हिंदुस्थानीत बोलत होता, आणि बोलत असताना त्याने एक इंग्रजी शब्द उच्चारला. मी म्हणालो हिंदुस्थानात आल्यानंतर दुसऱ्याच दिवशी मी काँग्रेसच्या ज्या अधिवेशनात हजर होतो त्याची आठवण या शब्दाने मला झाली. प्रमुख वक्ती श्रीमती आसफ अली होत्या (युसूफ आसर अलींची हिंदू पत्नी आणि काँग्रेस कार्यकारिणीची तत्कालीन सदस्य.). त्यासुद्धा हिंदुस्थानीत बोलल्या होत्या, परंतु मी त्यानी उच्चारलेले इंग्रजी शब्दच टिपून घेतले. ते होते “फॉरीन पॉलिसी” (विदेशनीती), “एक्सप्लॉइटेशन” (पिळवणूक), “सोशल पोझिशन” (सामाजिक स्थान), “एफिशिअंसी” (कार्यक्षमता), “ब्रिटिश इंपेरियालिझम” (ब्रिटिशांचा साम्राज्यवाद),”नॉनकोऑपरेशन” (असहकार), “इंडिया ऑफिस” (हिंदुस्थान ऑफिस) आणि “रिफ्यूजीज” (निर्वासीत). मी तयार केलेली यादी पाहून गांधींना खूप मजा वाटली. त्यांच्याजवळ बसलेला माणूस म्हणाला अजून असा एक इंग्रजी शब्द आहे जो सर्वांना माहीत आहे. तो म्हणजे “स्टुडंट स्पाईज”. सरकारने काही लोकांवर लक्ष ठेवण्याकरिता विद्यार्थ्यांना नेमले आहे. गांधी म्हणाले, “ब्रिटिश शासनावर माझा हासुद्धा एक आरोप आहे.“

गांधींनी मला रशियातील दहशतीबद्दल प्रश्न विचारला. रशियात मला जे काही अनुभव आले होते ते सर्व मी त्यांना सांगितले. मग इंग्लंड आणि संयुक्त राज्य अमेरिकेतीलही. गांधींनी पुस्ती जोडली, “मग काय जगातील लोकशाहीवादी राष्ट्रेच शिल्लक राहिली आहेत?”

गांधींशी सहमती दर्शवत मी म्हणालो, “युद्धानंतरही इंग्लंड लोकशाहीवादी राष्ट्र राहिले आहे हे नवल आहे.स्वीडनसुद्धा आहे.”

विश्वास बसू नये अशा पद्धतीने गांधींनी भाष्य केले - “हो.”

मी भर घालत म्हणालो, “आणि स्वित्झरलंड” आणि “ब्रिटिश उपनिवेश.”

गांधी मध्येच म्हणाले, “गोऱ्यांकरिता. मी दक्षिण आफ्रिकेत राहिलेलो आहे, मला माहीत आहे.” त्यांनी परत जेवणाकडे लक्ष दिले.

मी माझ्या झोपडीत आंघोळ करायला गेलो. आंघोळ करण्याकरिता मला केवळ पैजामा आणि चपला काढाव्या लागणार होत्या आणि जगमध्ये पाणीभरून ते माझ्या डोक्यावर तिरपे करावे लागणार होते. ताजातवाना होऊन मी परत सव्वासहा वाजता गांधींच्या घराची वाट धरली. गांधी बाहेर येईपर्यंत मी एखाद मिनिट वाट पाहिली असेन. त्यांनी वेळूची लांब काडी आणली होती. गांधीच्या प्रकृतीची काळजी घेणारे डॉक्टर दास आश्रमातच राहत होते. ते आणि इतरही अनेक स्त्री-पुरुष आमच्याबरोबर आले. गावाबाहेरून आलेल्या तरुणांचा एक गट गांधींच्या घरापासून थोड्याशा अंतरावर गांधीदर्शनासाठी उभा होता. गांधी जात असताना त्यांच्यावर एक दृष्टिक्षेप पडावा अशी त्यांची इच्छा होती. त्यांचे चेहरे काही तरी अद्भुत पाहिल्याच्या भावनेने आणि भक्तिभावाने भारलेले होते. त्यांनी ओठावर पंजे नेऊन पुढे वाकून गांधींना नमस्कार केला. गांधींनी त्यांना पाहून असे काही उद्गार काढले की त्यामुळे गांधी आणि ते सर्व हसू लागले. दुसरा एक म्हाताऱ्यांचा गट उभा होता. त्यातील एकाची ढेरी मोठी होती. गांधी आपल्याकडे एक दृष्टिक्षेप टाकतील अशी आशा त्यांना वाटत होती, पण त्याच्या पदरी निराशाच पडली. आम्ही एक धुळीने भरलेला रस्ता घेतला आणि एका नांगरलेल्या शेताला वळसा घालून परत फिरलो. गांधींनी मला “आता?” असे म्हणून प्रश्न विचारायला सांगितले.

लु. फि. - पहिल्या महायुद्धात तुम्ही ब्रिटिशांना सैन्यभरतीकरिता मदत केली होती. हे युद्ध जेव्हा सुरू झाले तेव्हा तुम्ही म्हणाला होता की ब्रिटिश सरकारची अडचण होईल असे मला काहीही करायचे नाही. आता स्पष्ट आहे की तुमच्या धोरणात बदल झाला आहे. काय झाले?

गां. - पहिल्या महायुद्धाच्या वेळी मी नुकताच आफ्रिकेतून परतलो होतो. अजून माझे पाय स्थिरावले नव्हते. याचा अर्थ माझ्यात अहिंसेवरील श्रद्धेचा अभाव होता असा होत नाही. परंतु ही श्रद्धा परिस्थितीप्रमाणे विकसित झाली पाहिजे, आणि मला परिस्थितीची पूर्ण कल्पना नव्हती. या दोन युद्धांच्या मधल्या काळात मला किती तरी अनुभव आले. तरीही व्हाईसरायशी झालेल्या चर्चेनंतर काँग्रेस युद्धप्रयत्नांच्या आड येणार नाही असे मी १९३९ साली घोषित केले होते. मी काँग्रेस नाही. खरे म्हणजे मी काँग्रेसमध्येसुद्धा नाही. मी या पक्षाचा ना तर पदाधिकारी आहे ना सदस्य आहे. काँग्रेस तर माझ्यापेक्षाही अधिक ब्रिटिशविरोधी आणि युद्धविरोधी आहे, आणि युद्धप्रयत्नात अडथळा निर्माण न करण्याकरिता मला तिची समजूत घालावी लागली. आता मी काही निष्कर्षांवर पोहोचलो आहे. मला ब्रिटिशांची लाजिरवाणी अवस्था करायची नव्हती. परंतु ब्रिटिशांनी जायलाच पाहिजे. ब्रिटिश जापान्यांपैक्षाही वाईट आहेत असे मला म्हणायचे नाही.

लु. फि. - अगदी उलट आहेत.

गां. - अगदी उलट असे मी म्हणणार नाही. परंतु मला एक मालक बदलून मला दुसरा आणायचा नाही. इंग्लंड जर स्वतःहोऊन आणि सुव्यवस्थित पद्धतीने जाईल तर त्याचा नैतिक दृष्टीने लाभ होईल.

अजूनही हवेत उकाडाच होता. तरीही त्यानंतर गांधी माझ्याशी विस्ताराने बोलले आणि ते श्वास घेण्याकरितासुद्धा क्वचितच थांबले असतील. आम्ही जरी वेगात चालत होतो तरीही बंगाल आणि इतरत्र ब्रिटिशांनी जे अत्याचार केले त्याबद्दल ते बोलले. ते म्हणाले की आजच मला गावकऱ्यांकडून पत्र मिळाले आहे. विमानतळ बांधण्याकरिता कोणतीही पूर्वसूचना वा नुकसानभरपाई न देता त्यांना घराबाहेर काढण्यात येत आहे. गांधी भाष्य करत म्हणाले युद्धाकरिता असे करण्यात येत आहे असे जरी वाटत असेल तरी यामुळे उलट युद्धप्रयत्नात अडथळाच येतो आहे. ब्रिटिश जोपर्यंत हिंदुस्थान सोडून जात नाहीत तोपर्यंत ते हे युद्ध जिंकू शकत नाहीत अशी माझी खात्री पटली आहे.

गांधींच्या घरी आम्ही जेव्हा परचलो तेव्हा काळोख पडलेला होता. ते ओसरीत एका तख्तपोसावर आडवे झाले आणि जवळच्याच एका तख्तपोसावर त्यांनी मला बसायला सांगितले. एका मुसलमान बाईने

छातीवर ठेवण्याकरिता कोरडे कापड आणले आणि मग ती गांधीजींचे पाय पुसू लागली. मी मत व्यक्त करत म्हणालो की इंग्लंडने हिंदुस्थानात काही चुकाही केल्या असतील आणि केव्हा केव्हा काही अत्याचारही केला असेल तरी एखाद्या विदेशी सत्तेने हिंदुस्थानवर विजय मिळवला असता आणि इथे जर हुकूमशाही स्थापन केली तर ती याहून किती तरी वाईट असती. याच्या उत्तरात १९१९ साली अमृतसरमध्ये ब्रिटिशांनी जी कत्तल केली होती आणि हिंदुस्थानात जी इतर हिंसक कृत्ये केली होती त्यासंबंधी गाधी विस्ताराने बोलले. त्यांच्या शब्दांत कटुता भरलेली होती. ते आग्रहपूर्वक म्हणाले की इतरांपेक्षा माझे बोलणे कितीतरी मवाळपणाचे आहे आणि काही हिंदुस्थानींमध्ये तर इतकी कटुता भरलेली आहे की त्यांना इथे जापानी व्हाईसराय झाला तरी चालेल.

त्यांनी उठण्याकरिता हालचाल केली आणि मीसुद्धा म्हणालो माझीसुद्धा जाण्य़ाची वेळ झालेली आहे. ते म्हणाले, “प्रार्थनेकरिता ये.”

ही वद्य पक्षाची रात्र होती. गांधींच्या घरापासून पन्नासेक यार्डवर असलेल्या पटांगणाकडे आम्ही निघालो. तिथे आश्रमातील जवळपास सत्तर सदस्य गोळा झालेले होते. त्यांतील बहुतेक पांढऱ्या पोषाखात होते. ते एका चौकोनाच्या तीन बाजूला बसले होते. स्त्रिया चौकोनाच्या डाव्या बाजूला बसल्या होत्या तर पुरुष चौकानाच्या दोन बाजूला बसले होते. गांधी म्हणाले, फिशर तू इथे मांडी घालून बसू शकशील काय? आणि मी चौकानाच्या चौथ्या बाजूच्या मध्यभागी गांधी जिथे बसले होते त्याच्या बाजूला बसलो. आमचे चेहरे जमावाकडे होते. एक मुसलमान बाई त्यांच्यामागे बसून त्यांना गवताच्या काड्यांनी तयार केलेल्या पंख्याने हवा घालू लागली. प्रार्थनेकरिता आलेल्या काही लोकांकडे कंदील होते. त्या कंदिलांच्या प्रकाशाने विरुद्ध बाजूच्या लोकांचे डोळे चमकू नये म्हणून कंदिलांच्या एका बाजूला कागद लावलेले होते. असा एक कंदील गांधीजींच्या बाजूला ठेवलेला होता. गांधीनी जेव्हा भजन म्हणायला सुरुवात केली तेव्हा प्रार्थना सभा सुरू झाली. प्रार्थना म्हणण्यात सगळे सामील झाले आणि गांधी जमावाबरोबर प्रार्थना म्हणत होते. आणि इतर सर्वांपासून वेगळा असा त्यांचा आवाज स्पष्ट ऐकू येत होता. मग गाणे म्हणणाऱ्या प्रमुखाने गाणे म्हणायला सुरुवात केली आणि त्याच्या मागे असलेला माणूस चिपळ्या वाजवू लागला. त्याचबरोबर प्रत्येकजण रडक्या तारस्वरात गाणे म्हणू लागला. त्यांच्या गाण्याचे सूर काहीसे चिनी काहीसे अरबी सुरासारखे वाटत होते. ते सूर कंटाळवाणे होते. मग गांधींनी एका जाड धर्मग्रंथातून काही ओळी वाचल्या. शांततेकरिता केलेल्या प्रार्थनेने त्या प्रार्थनासभेचा शेवट झाला.

जून ५, १९४२

तारका आणि चंद्राखाली ताजेतवाने करणारी झोप घेऊन मी सकाळी चार वाजताच उठलो. मी दोरीने विणलेल्या आणि चार लाकडी पाय असलेल्या खाटेवर झोपलो होतो. रात्रीच्या वेळी वारा शीतल होता. सहा वाजता माझे शेजारी डॉ. दास आले आणि त्यांनी सांगितले की गांधीजी थकलेले असल्यामुळे आज सकाळी ते फिरायला येणार नाहीत. खुरशेदने माझ्या न्याहरीकरिता चहा, बिस्किट, लोणी, मध आणि आंबे आणले. माशा आणि मुग्यांनी स्पर्धा करू नये म्हणूत मी ते पदार्थ घाईत संपवले आणि टंकलेखन घेऊन मी काम करू लागलो. परंतु मध्येच देव आणि काळे सिलोनी आर्यनायकम आल्यामुळे व्यत्यय आला. आर्यनायकम हे काँग्रेसच्या लोकांना शिकवणारात प्रमुख होते. ते रशियाबद्दल बोलू लागले. स्वातंत्र्य पुरेसे नाही आणि हिंदुस्थानची खरी डोकेदुखी स्वातंत्र्यानंतरच सुरू होईल असे मत मी दिले. खुरशेद कालचेच आपले मत देत म्हणाली की हिंदुस्थानमध्ये फासीवाद जरी येणार असेल तरी मला हिंदुस्थान स्वतंत्र झालेला पाहिजे. बोस (सुभाषचंद्र बोस १९३८साली काँग्रेसचे अध्यक्ष, युद्ध सुरू झाल्यानंतर ते हिंदुस्थानातून निसटले आणि त्यांनी जर्मनीत वास्तव्य केले होते. तिथेन ते ब्रिटिश सत्तेच्या विरोधात रेडिओवरून प्रचार करू लागले.) जर हिंदुस्थानात हिंदुस्थानी सैन्याचे प्रमुख म्हणून आले तर ते संपूर्ण देश भारावून टाकतील. ती म्हणाली की हॉगकॉग, मलाया, सिंगापूर आणि बर्मामध्ये पकडलेल्या हिंदुस्थानी सैनिकांना आणि अधिकाऱ्यांना जापानने मुक्त केले आहे आणि त्यांची विशेष हिंदुस्थानी तुकडी तयार करत असल्याची घोषणा धुरी राष्ट्रांच्या रेडिओने केली आहे. धुरी राष्ट्रांच्या रेडिओने पुढे जाऊन घोषित केले आहे की हे सैन्य हिंदुस्थानात शिरेल आणि ब्रिटिशांना हिंदुस्थानातून हाकलून लावील. ती म्हणाली की बोस नेहरूंपेक्षाही लोकप्रिय आहेत आणि काही बाबतीत तर त्यांनी केलेले आवाहन गांधींपेक्षाही लोकांना आवडते.

देव म्हणाले की अलिकडच्या काही वर्षात नेहरू आणि प्रागतिक विचारांच्या लोकांच्या दडपणामुळे काँग्रेस आर्थिक आणि सामाजिक प्रश्नाकडे अधिक लक्ष देऊ लागली आहे. ती एक सामाजिक कार्यक्रम तयार करत असून तो तयार झाला की ते मला तो देतील.

अकरा वाजता सकाळचे जेवण झाले. जेवणाकरिता जायला मला उशीर झाला होता. जेवणघरात गांधी आधीच येऊन बसले होते. मी दिसताच ते जिव्हाळ्याने म्हणाले, ये. मी त्यांना तुम्ही कसे आहा म्हणून विचारले. ते म्हणाले, “मी चांगला आहे, परंतु थकवा जाणवत असल्यामुळे मी फिरायला आलो नाही. तू एकटा

वा कुणासोबत फिरायला जायला पाहिजे होते. व्यायामाला महत्त्व आहे." मी त्यांना म्हणालो की तुम्ही दिलेल्या प्रेरणेमुळे या उकाड्यातही मला फिरायला जाण्याची प्रेरणा होईल. ते हसले. ते मला त्याच्या भांड्यातील उकळलेले कांदे देऊ लागले. मी ते नाकारले आणि यापेक्षा मला न शिजवलेले कांदे आवडतील असे मी म्हणालो. बेचव अन्न खाऊन कंटाळल्यानंतर ते कांदे खाल्ल्यामुळे माझ्या जिभेला थोडी चव येईल असे मला वाटले. खुरशेद मला लहान चमचाभरून कांदे देऊ लागली, परंतु गांधींनी माझ्याकडे मोठा चमचा भरून कांदे सरकवले आणि म्हणाले, "तुझ्या आकाराला इतके कांदे लागतीलच". जेवणानंतर मला जेव्हा आंबा मिळाला तेव्हा त्यांनी मला हातकताईचा रुमाल दिला. मी म्हणालो, "माणूस जेव्हा रोममध्ये असतो तेव्हा त्याने रोमन लोकांप्रमाणेच राहायला पाहिजे. इथे मला सगळे राहतात तसेच राहायचे आहे. मला वेगळी वागणूक नको."

ते म्हणाले, "तू ना! आणि शिवाय माझ्याजवळसुद्धा रुमाल आहे."

दुपारी तीन वाजता मुलाखतीकरिता मी गांधींच्या खोलीकडे चालत गेलो. देसाई आणि इतर सचिव जमिनीवर बसून गांधींना आलेल्या पत्रांचे उत्तर लिहीत होते. खुरशेदने पंखा हाती घेतला. खोलीला सुशोभित करणारी दुसरी गोष्ट माझ्या लक्षात आली. खोलीच्या मातीच्या भिंतीवर फिकट रंगात एका धार्मिक मिरवणुकीचे चित्र रंगवलेले होते. याशिवाय गांधींच्या पाठीमागच्या भिंतीवर पामच्या झाडाचे चित्र आणि पामच्या पानावर अरेबिक तीन या अंकासारखी एक आकृती कोरलेली होती. देसाईंनी मला सांगितले की हे चित्र धार्मिक प्रतीक "ॐ" चे आहे. या शब्दाला ग्रीकांचे धार्मिक प्रतीक "Logos" सारखेच महत्त्व आहे.

गांधी आले, त्यांनी मला अभिवादन केले आणि ते आपल्या अंथरुणावर पडले.

गां. - मी पडल्यापडल्याच तुझे आघात सहन करीन.

एका मुसलमान स्त्रीने त्यांना मातीच्या पट्ट्या लावल्या. ते म्हणाले :

ही माझ्या भविष्याशी माझा संपर्क करून देते. मला वाटते की मी काय म्हणालो ते तुम्हाला कळले नाही.

लु. फि. - मला हे कळले नाही असे नाही, परंतु धुळीत मिसळण्याच्या दृष्टीने मी अजून बराच तरुण आहे असे मला वाटले.

गां. - का, तुमचे आणि माझे आणि आपणा सर्वांचे लवकर म्हणा वा उशिरा म्हणजे एकशेवीस वर्षांनी काहींचे असेच होणार आहे.

ते किंचितसे थांबले आणि मला प्रश्न विचारण्याकरिता आमंत्रित करत म्हणाले, “आता?”

लु. फि. - मी जेव्हा भविष्यकालीन व्यवस्थेबद्दलची काही सूचना ऐकतो तेव्हा खरोखरच या योजना अंमलात आणल्या तर काय होईल याचा मी विचार करण्याचा प्रयत्न करू लागतो. मला खात्री आहे की ब्रिटिश खरोखरच गेले तर काय होईल याचा तुम्हीही विचार केलेलाच असेल. तर मग इंग्रजांनी जर क्रमशः एकेक पाऊल टाकत जाण्याचे ठरवले तर तुम्हाला ते कसे वाटेल?

गां. - आधी तर संस्थानिक आहेत. त्यांच्याजवळ त्यांचे स्वतःचे सैन्य आहे. ते गोंधळ करू शकतात. ब्रिटिश जातील तेव्हा सर्व काही ठीक असेल असे मला वाटत नाही. तेव्हा गोंधळ होऊ शकतो. मी म्हणालो की ‘ब्रिटिशांनी व्यवस्थित पद्धतीने जावे आणि हिंदुस्थानला ईश्वराच्या भरवशावर सोडावे.’ तुम्हाला अशी काल्पनिक भाषा आवडणार नाही. त्या परिस्थितीला तुम्ही अव्यवस्थाही म्हणू शकता. जास्तीतजास्त वाईट हेच असू शकते. परंतु याला अडवण्याचा आम्ही प्रयत्न करू. कदाचित अराजक होणारही नाही.

लु. फि. - हिंदस्थानी ताबडतोब सरकार संघटित करू शकणार नाही काय?

गां. - होय, इथे राजकीय परिस्थितीत तीन घटक आहेत: संस्थानिक, मुसलमान आणि हिंदू. ते सर्व मिळून तात्पुरते सरकार स्थापित करू शकतात.

लु. फि. - तशा परिस्थितीत सत्ता आणि पद कोणत्या प्रमाणात विभागले जातील?

गां. - मला माहीत नाही. काँग्रेस सर्वात शक्तिशाली घटक असल्यामुळे ती सर्वात मोठ्या वाट्याचा दावा करू शकेल. परंतु हे सामंजस्याने ठरवता येऊ शकेल.

लु. फि. - मला असे दिसते की ब्रिटिश एकदम पूर्णपणे निघून जाण्याची शक्यता नाही. त्याचा अर्थ होईल जापानला हिंदुस्थान भेट देणे आणि इंग्लंड याला कधीही मान्यता देणार नाही, आणि अमेरिकाही याकरिता संमती देणार नाही. तुमची जर मागणी असेल की इंग्लंडने बाडबिस्तरा गुंडाळून ताबडतोब निघून जावे तर तुम्ही सरळ सरळ अशक्यप्राय गोष्टीची मागणी करत असाल; तुम्ही झाडावर भुंकत आहा. त्यांनी आपले सैन्यसुद्धा काढून घ्यावे असा तुमचा अर्थ नसेल, आहे काय?

निदान दोन मिनिट तरी गांधी काहीही बोलले नाही. खोलीत पसरलेली निरव शांतता जवळपास लक्षणीय होती. टाचणी पडल्याचाही आवाज ऐकू येऊ शकला असता. मग गांधी म्हणाले -

अखेरीस ते म्हणाले “तुम्ही बरोबर आहा. नाही, ब्रिटन, अमेरिका आणि इतर देशसुद्धा इथे सैन्य ठेवू शकतात आणि हिंदुस्थानातील भूमीचा सैनिकी तळ म्हणून उपयोग करू शकतात. जापानने युद्ध जिंकावे अशी माझी इच्छा नाही. धुरी राष्ट्रांचा विजय व्हावा अशीही माझी इच्छा नाही. परंतु माझी खात्री आहे की हिंदुस्थानी जनता स्वतंत्र झाल्याशिवाय ब्रिटन जिंकू शकत नाही. ब्रिटन दुर्बल आहे आणि हिंदुस्थानात शासन करतानाची त्याची नैतिक भूमिका समर्थनीय नाही. मला इंग्लंडला नामोहरम करायचे नाही.

लु. फि. - परंतु हिंदुस्थानचा उपयोग जर संयुक्त राष्ट्रांना सैनिकी तळ म्हणून करायचा असेल तर त्यात इतर अनेक गोष्टींचाही समावेश असेल. सैन्य पोकळीत राहू शकत नसते. उदाहरणार्थ संयुक्त राष्ट्रांना रेल्वे मार्ग चांगले संघटित स्वरूपात असणे आवश्यक वाटत असेल.

आश्चर्योद्गार काढत ते म्हणाले, “हो, हो, ते रेल्वेचे संचालन करू शकतात. बंदरांमध्ये जिथे त्यांची रसद उतरेल तिथेही त्यांना व्यवस्था लागेल. त्यांना मुंबई आणि कलकत्त्यात दंगली नको असतील. या गोष्टींकरिता सहकार्य आणि संयुक्त प्रयत्न लागतील.

लु. फि. - परस्परातील सहकार्याच्या या अटी एखाद्या मैत्रीकरारात नमूद करता येऊ शकतील काय?

गां. - हो, यासंबंधात इंग्लंडशी लेखी करार करता येईल.

लु. फि. - अथवा ब्रिटन, अमेरिका आणि इतरांशी? मी अजून सोप्या भाषेत सांगितले.

त्यांनी होकारार्थी मान हलवली.

लु. फि. - हे तुम्ही आधीच का सांगितले नाही? मी मान्य करतो की मी जेव्हा तुमच्या सविनय आज्ञाभंगाचा प्रस्ताव ऐकला तेव्हा त्याबद्दल माझ्या मनात पूर्वग्रह निर्माण झालेले होते. मला वाटत होते की त्यामुळे युद्ध संचालनात अडथळे येतील. हे युद्ध लढायला आणि जिंकायला पाहिजे असे माझे मत होते. धुरी पक्षाचा विजय झाला तर जगाकरिता मला संपूर्ण काळोख दिसत होता. आपण जिंकलो तर चांगल्या जगाची आपल्याकरिता अधिक चांगली संधी असेल असे माझे मत होते.

गां. - या तुमच्या मताशी मी सहमत होऊ शकत नाही. ब्रिटनची भूमिका अनेकदा दांभिकपणाची असते. तो असे अभिवचन देतो की जे तो पाळत नाही. परंतु लोकशाहीवादी जिंकले तर अधिक चांगली संधी आहे हे तुमचे विधान मला मान्य आहे.

लु. फि. - युद्धानंतर शांततेचे काय स्वरूप असेल यावर हे अवलंबून आहे.

दुरुस्ती करत गांधी म्हणाले - युद्धात तुम्ही काय करता यावर हे अवलंबून असेल.

लु. फि. - मी तुम्हाला म्हणेन की अमेरिकेतील राजकीय पुढाऱ्यांना हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याबद्दल फार आस्था आहे. अटलांटिक सनद हिंदुस्थानला लागू होणार नाही असे जे भाषण चर्चिलनी केले होते ते थांबवण्याचा अमेरिकिने बराच प्रयत्न केला होता. वाशिंग्टनमधील महत्त्वाचे लोक पॅसिफिक सनदेकरिता काम करत आहेत, ते मला सांगत होते की या संबंधात आम्ही फार पुढे जाऊ शकलो नाही कारण या सनदेच्या पहिल्या तत्त्वाप्रमाणेच साम्राज्यवादाचा अंत झाला असता, आणि ब्रिटनचा हिंदुस्थानवर ताबा असताना आम्ही हे कसे घोषित करू शकत होतो?

गां. - भविष्यकालीन आश्वासनांत मला रस नाही. मला युद्धानंतरच्या स्वातंत्र्यात रस नाही. मला आताच स्वातंत्र्य हवे आहे. त्यामुळे इंग्लंडला हे युद्ध जिंकण्याकरिता मदत होईल.

लु. फि. - तुम्ही तुमची योजना व्हाईसरायना का सांगितली नाही? मित्र राष्ट्रांनी सैनिकी कार्यवाहीकरिता सैनिकी तळ म्हणून हिंदुस्थानचा उपयोग करण्यावर तुमचा आक्षेप नाही हे तुम्ही त्यांना सांगायला पाहिजे होते.

गां. - मला कोणीही विचारले नाही. लोकांची तयारी करण्याकरिता मी माझ्या सविनय आज्ञाभंगाबद्दल लिहिले आहे. तुम्ही जर यासंबंधात सरळ लिहून मला प्रश्न दिले असते तर मी हरिजनमधून त्याचे उत्तर देईन इतकेच की तुम्ही तुमचे प्रश्न संक्षेपात तयार करा.

लु. फि. - तुम्हाला जर माझ्या लेखनाबद्दल काही माहिती असेल तर मी नेहमीच संक्षेपात, सरळ आणि सारगर्भ लिहिण्याचा प्रयत्न करत असतो हे तुम्हाला माहीत असेल.

गां. - तुम्ही येण्यापूर्वी जवाहरलालने मला तुमच्याबद्दल सांगितले होते. तो म्हणाला होता की तुम्ही प्रामाणिक आहा आणि तुमचा कोणताही वैयक्तिक स्वार्थ नाही. तुम्हाला एकाच वेळी अनेक काम करायचे नाही. तो म्हणाला होता की तुम्ही ठोस माणूस आहा आणि त्यांना (लुई फिशरना) पाहताच तुम्हाला हे कळेल.

लु. फि. - हो, निदान शरीराने तरी.

गां. - मी तुमच्याशी मोकळेपणाने आणि स्पष्टपणे बोललो. मला वाटत होते की तुम्ही साहेब लोक आहा.

लु. फि. - तूम्ही साहेब ब्लोक म्हणाला काय? हा इंग्रजी शब्द ब्लॉकर तर नाही? (स्पष्ट आहे की फिशरनी ब्लोकचा अर्थ सांगितला असावा.)

गांधी हसत म्हणाले नाही, लोक. त्यांच्या एका सचिवाने “दोन सद्गृहस्थ” असा अर्थ लावला. महादेव देसाई तिथे डोक्यावर मातीच्या पट्टीचा लेप लावून बसले होते. कोझॅकच्या टोपीप्रमाणे ती पट्टी दिसत होती. याचा अर्थ ती “अतिशय सुंदर” दिसत होती.

हास्य कल्लोळ थांबल्यानंतर गांधी म्हणाले, “कुमारी कॉथेरीन (‘मदर इंडिया;च्या लेखिका) इथे आल्या होत्या. मी त्यांच्याशी सद्भावपूर्वक वागलो आणि मग त्यांनी केवळ घाण लिहिली. मी तिला काय म्हणत असे तुम्हाला माहीत आहे?

लु. फि. - नाही.

गां. - नाली निरीक्षक. (पाहा खंड ३४ नाली निरीक्षकचा अहवाल)

लु. फि. - मी फार गरीब कुटुंबातून आलो आहे. उपाशी राहावे लागणे म्हणजे काय हे मला माहीत आहे. मला नेहमीच तळागाळाच्या लोकांबद्दल आणि गरिबांबद्दल सहानुभूती वाटत आली आहे. अनेक अमेरिकींमध्ये हिंदुस्थानबद्दल अतिशय मैत्रीभाव आहे. यामुळे इतक्यातच तुम्ही अमेरिकी लोकांना बोचतील असे उद्गार काढले ही अतिशय दुर्दैवी गोष्ट आहे.

मान्य करत गांधी म्हणाले - ते आवश्यक होते. मला धक्का द्यायचा होता. मला माहीत आहे की अनेक अमेरिकींच्या अंतःकरणात माझ्याबद्दल स्नेहभाव आहे. मला त्यांना सांगायचे आहे की तुम्ही जर संपत्तीची पूजा सुरू कराल तर तुम्ही उत्तम जग निर्माण करू शकणार नाही. धुरी राष्ट्रांचा पराभव करून तुम्ही जर्मनी आणि जापान इतकेच वाईट होण्याचा धोका आहे.

लु. फि. - अर्थातच हा धोका आहे. अनेक लोक म्हणायचे की इंग्लंड जर युद्धात सामील झाला तर तर तो फासीवादी होईल. परंतु युद्धापूर्वी इंग्लंड जितका लोकशाहीवादी होता त्याहूनही आता जास्त लोकशाहीवादी आहे.

गां. - नाही, आम्हाल हिंदुस्थानात जे दिसते त्यावरून असे वाटत नाही.

लु. फि. - निदान इंग्लंडमध्ये तरी.

गांधी जोर देऊन म्हणाले, "हे इंग्लंडमध्येही खरे असू शकत नाही आणि साम्राज्यातही हे खरे असू शकत नाही. माझा तुमच्या भविष्यकालीन चांगुलपणावर विश्वास नाही. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरिता मी अनेक दशकांपासून धडपड करतो आहे. आम्ही अजून वाट पाहू शकत नाही. परंतु आमच्याकरिता सद्भावना आहेत हे मला मान्य आहे."

गांधी थांबले आणि विचार करू लागले. मला ते अतिशय अस्वस्थ वाटू लागले. जाणीवपूर्वक ते म्हणाले, "हिंदुस्थानरुपी न फुटलेल्या सुरुंगावर इंग्लंड बसलेला आहे, आणि त्याचा कधीही स्फोट होऊ शकतो. ब्रिटनबद्दलची घृणा आणि चीड इतकी जोरदार आहे की ब्रिटनाला युद्धप्रयत्नाकरिता कोणतीही मदत मिळू शकत नाही. ब्रिटिश सैन्यात हिंदुस्थानी भरती झाले आहेत कारण त्यांना खायला पाहिजे, परंतु त्यांच्या अंतःकरणात इंग्लंडबद्दल अशी कोणतीही भावना नाही की ज्यामुळे त्यांना इंग्लंडला मदत करावीशी वाटेल."

लु. फि. - हिंदुस्थानातील समस्या सोडवण्याकरिता तुम्ही जे उपाय सुचवले आहेत त्याबद्दल थोडक्यात सांगायची जर तुम्ही मला परवानगी दिली तर मी म्हणेन की तुम्ही क्रिप्सचा प्रस्ताव अगदी उलट केला आहे. क्रिप्सने तुम्हाला काही देऊ केले आणि बाकी इंग्लंडकरिता ठेवले आहे. तुम्ही इंग्लंडला काही देत आहा आणि बाकी हिंदुस्तानकरिता ठेवत आहा.

गां. - हे अगदी खरे आहे. मी क्रिप्सचे तोंड मागे वळवले आहे.

त्यांच्या घड्याळावरून माझ्या लक्षात आले की एक तासाची वेळ संपत आली आहे. मी त्यांना म्हणालो की देवजवळ माझे "मेन ऍन्ड पॉलिटिक्स" हे पुस्तक आहे. ते वाचण्याचा मी तुम्हाला आग्रह तर करणार नाही, परंतु तुम्ही ते चाळू शकाल काय? त्यांच्या सचिवाने मला विचारले की "चाळणे"चा तुमचा अर्थ काय आहे?

गां. - यांचा अर्थ आहे आधी शेवटचे पान पाहणे, मग पहिले पाहणे आणि शेवटी मधले पान पाहणे.

लु. फि. - मग पुस्तक बाजूला फेकून द्यायचे आणि ते सुंदर आहे असे सांगायचे. आता मी ठरल्याप्रमाणे १ तास थांबवून ठेवले आहे.

गां. - हो, ठेवले आहे. आता जाऊन लगेच टबात बस.

घरातून बाहेर पडताना माझ्या मनात विचार आला की, हे बरोबर आहे काय? पण तरीही मला वाटले की ही एक चांगली कल्पना आहे, फक्त मी त्यात सुधारणा करण्याचा निर्णय घेतला. मी घरी आल्यावर कपडे काढून टाकले, एका टिनमध्ये एक मजबूत लाकडी पॅकिंग केस ठेवली, ती पाण्याने भरलेल्या आंघोळीच्या

टबमध्ये ठेवली, एक टर्किश टॉवेल दुमडला आणि तो टबबाहेर पॅकिंग केसवर ठेवला आणि त्यावर माझा टाइपरायटर ठेवला. ही व्यवस्था केल्यानंतर आंघोळीच्या टबातील डब्यावर मी बसलो आणि गांधींबरोबर एक तास झालेली चर्चा टाईपरायटरच्या मदतीने लिहून काढली. मी जेव्हा घामाघूम झालेलो असे तेव्हा मी काही मिनिटांचा जो विसावा घेत असे. त्या वेळेत पितळेच्या गडव्यात पाणी भरून ते मी माझ्या पाठीवर आणि हाता-पायांवर ओतत असे. या पद्धतीने विशेष थकवा न येता मी पूर्ण एक तास टंकलेखन करू शकलो.

पाच वाजता सायंकाळचे जेवण. या वेळी मी गांधींच्या आधी पोहोचलो. मला पाहताच ते म्हणाले, “हे चांगले केले.” यामागे संदर्भ दुपारच्या जेवणाच्या वेळी मी उशिरा पोहोचण्याचा होता. मी तुमच्या आधी येणे योग्य राहील की उशिरा हे मला माहीत नव्हते. त्यावर गांधी म्हणाले, “इथे कृत्रिमपणे सौजन्यशील वर्तन वर्ज्य आहे. तुला इच्छा असेल तेव्हा ये.”

त्यांनी मला परत उकळलेले कांदे देण्याचा प्रयत्न केला. मी तितक्याच ठामपणे त्याला नकार दिला.

ते म्हणाले, “अशाने तुझी इथे उपासमार होईल.” मी त्यांना सांगितले दोन जेवणांमध्ये मी ताक आणि चहा घेत असतो हे तुम्हाला माहीत नाही. आता मला टबात बसून लिहिण्याची चांगली सवय झाली आहे. आज मी टबात बसून लिहिले असेही मी त्यांना सांगितले. आणि हे मी कसे केले हेसुद्धा त्यांना सांगितले. ते खळखळून जोरात हसले. मग दिलगिरी व्यक्त करत म्हणाले की आजसुद्धा थकव्यामुळे मी फिरायला येऊ शकणार नाही.

माझे जेवण झाल्याचे जेव्हा त्यांना दिसले तेव्हा ते म्हणाले, “फिशर, तू केव्हाही जाऊ शकतो. औपचारिकतेची आवश्यकता नाही. मी तुला आधीच सांगितले आहे की इथे कृत्रिम सौजन्यशीलतेची आवश्यकता नाही.” मी माझा टोप घेतला आणि बूट घातले. मी जेवणघरातून बाहेर पडलो तेव्हा ते म्हणाले, “फिशर, रविवारी जवाहरलाल येणार आहे हे तुला कोणी सांगितले काय?”

मी म्हणालो, “नाही, आज कोणता दिवस आहे?” कोणता दिवस केव्हा आहे हेसुद्धा लक्षात ठेवणे मी विसरलो होतो.

हसत ते म्हणाले, “शुक्रवार.”

मी विचारले, “तुम्ही माझ्याबरोबर फोटो काढण्याकरिता उभे राहाल काय?”

“तुझ्याबरोबर फोटोत दिसण्यावर माझा मुळीच आक्षेप नाही.”

“हा तर माझा सर्वात मोठा बहुमान आहे.”

तुला प्रशंसेची आवश्यकता आहे काय? त्यांनी विचारले.

“आपणा सगळ्यांनाच तशी अपेक्षा नसते काय?”

“हो, परंतु त्याकरिता आपल्याला काही वेळा फार मोठी किंमत चुकवावी लागत असते.”

मी घरी गेलो, टबात शिरलो आणि गांधींनी ज्या चार प्रश्नांचे उत्तर ‘हरिजन’मधून देण्याचे कबूल केले होते त्यांचे टंकलेखन केले.

मला वाटले की आज गांधींशी माझी जी मुलाखत झाली तिला ऐतिहासिक महत्त्व आहे. हिंदुस्थानकरिता जो महत्त्वाचा मुद्दा होता त्यासंबंधात त्यांनी आपला दृष्टिकोन बदलवला होता. ब्रिटिशांना ‘चले जाव’ म्हणणारे गांधी आता ‘ब्रिटिश राहू शकतात आणि हिंदुस्थानातून युद्धाचे संचालन करू शकतात’ असे म्हणाले होते. वेगळ्या शब्दांत त्यांची युद्धप्रयत्न सहन करण्याची तयारी होती आणि काही विशेष परिस्थितीत त्यांची युद्धाला पाठिंबा देण्याचीसुद्धा तयारी होती. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासंबंधीच्या महत्त्वाच्या प्रश्नावर तडजोड करण्याची त्यांची तयारी होती.

आळसामुळे मी अंथरुणावर लोळत पडलो होतो. अंथरुण उघड्यावर होते आणि विश्रामगृहापासून ते फार दूर नव्हते. रात्रीच्या वेळी अंथरुणाबाहेर पडायचे असेल तर कंदील घेतल्याशिवाय बाहेर जाऊ नका अशी खुरशेदने मला सावधगिरीची सूचना दिली होती. तिने तो कंदील जवळच्याच ओसरीत ठेवला होता. इथे विंचू फिरत असतात.

दुरूनच मला प्रार्थनासभेचा मृदू आवाज ऐकू आला. आणि मग मी अंदाजे नऊ वाजता झोपी गेलो. रात्र शीतल होती.

जून ६, १९४२

मी सकाळी पाच वाजता उठलो, दाढी केली आणि लंडनमध्ये विकत घेतलेला निळा पैजामा असलेला सूट घातला आणि त्यावर आर्यनायकमने उधार दिलेला हातकताईचा पांढरा झब्बा. तो माझ्या गुढग्यापर्यंत पोहोचत होता. आंबे, चहा आणि ब्रेडची न्याहरी. मग मी गांधींच्या झोपडीकडे चालत गेलो. ते बाहेरच्या बाजूला आपल्या अंथरुणावर बसलेले होते आणि खोलगट कटोऱ्यातून मोठ्या चमच्यात भरून आंब्याचा रस खात होते. त्यांची बायको त्यांना वारा घालत होती. गांधींनी केवळ पंचा घातलेला होता.

त्यांनी माझे स्वागत “अरे, वा!” या शब्दांनी केले आणि माझ्या पोषाखावर भाष्य केले. मी म्हणालो, “तुम्हाला पिकॅडली आणि खादीची भेसळ असलेला हा पोषाख कसा वाटतो?”

ते म्हणाले, “छान वाटतो. तू तुला होतील असे नीटनेटके कपडे शिवून घेतले पाहिजे. हा झब्बा आर्यनायमकडून उधार घेतल्याचे मी त्यांना सांगितले. गांधी म्हणाले की त्यांनी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात शिक्षण घतले आहे हे तुला माहीतच असेल.

मी म्हणालो की मला हे माहीत आहे. थोडा थांबून मी विचारले, “माझे प्रश्न तुम्ही पाहिले काय?

ते म्हणाले, “हो, आज सकाळी मी ते हाताळीन”.

लगेच आम्ही सकाळच्या फिरायला निघालो. मी त्यांना विचारले, “तुमच्या दर आठवड्याच्या मौनामागे कोणता सिद्धांत आहे?”

गां. - सिद्धांत या शब्दाचा तुझा काय अर्थ आहे?

लु. फि. - माझा अर्थ आहे - तत्त्व, हेतू.

गां. - हे तेव्हा सुरू झाले जेव्हा माझी अवस्था फार वाईट होती. मी फार मेहनत करत होतो, खूप उकाडा होत असलेल्या आगगाडीतून सतत प्रवास करत होतो, अनेक सभांमधून बोलत होतो आणि ट्रेनमध्ये आणि इतरत्रही माझ्याकडे हजारो लोक येत होते. ते मला प्रश्न विचारायचे, आपली गाऱ्हाणी सांगायचे. त्यांना माझ्याबरोबर प्रार्थना करण्याची इच्छा असायची. मला दर आठवड्याला एक दिवस विश्रांती हवी होती. यामुळे मी मौन दिवसाची सुरुवात केली. नंतर मी अर्थातच त्यात विविध गुण दाखवले आणि त्याला धार्मिक रूप दिले. परंतु यामागे एक दिवसाच्या विश्रांतीचाच हेतू होता.

आमचे फिरणे सुरू होते. आश्रमाच्या स्वयंपाकघरात काम करणाऱ्या एक तरुण स्त्रीच्या खांद्यावर त्यांचे हात होते. जणू काय स्वतःशीच विचार करत ते म्हणाले, “मौनाने फार आराम मिळतो. तसे पाहिले तर मौन मुळात विश्रांती देणारे नाही. परंतु जेव्हा तुम्ही बोलू शकता आणि तरीही बोलत नाही तेव्हा त्यामुळे तुम्हाला फार आराम मिळतो. आणि शिवाय तुम्हाला चिंतन करायला वेळही मिळतो.

मी गांदींच्या बाजूनेच चालून राहिलो होतो, परंतु गांधींना उन्ह लागू नये म्हणून स्वयंपाकघरात काम करणाऱ्या त्या मुलीने गांधींच्या अंगावर छत्री धरली. त्यामुळे आमच्यात थोडे अंतर निर्माण झाले. गांधींनी त्यांच्या छातीवर वा डोक्यावर काहीही घातलेले नव्हते. डॉ. दास आले आणि त्यांनी दुसऱ्या बाजूने गांधीवर आपल्या छत्रीने सावली केली. रस्त्यावर अधूनमधून मेळूचे तुकडे दिसायचे. डॉक्टर दास घाईघाईने पुढे जाऊन ते तुकडे उचलून बाजूच्या शेतात फेकून द्यायचे.

गांधींना मी राजाजींच्या प्रस्तावाबद्दल विचारले. श्री राजगोपालाचारींनी काँग्रेसचे प्रतिनिधी म्हणून सर स्टॅफर्ड क्रिप्सबरोबर झालेल्या वाटाघाटीत एप्रिलमध्ये भाग घेतला होता. हिंदुस्थानी त्यांना राजाजी म्हणतात ते त्यांना हिंदुस्थानातील सर्वात हुशार माणूस मानतात. ते गांधीजींचे जुने मित्र आणि सहकारीही आहेत, तसेच ते त्यांच्या सर्वात लहान मुलाचे, देवदासचे सासरेसुद्धा आहेत. क्रिप्सच्या प्रस्तावांना अपयश आल्यानंतर राजाजींनी अनेक व्याख्याने दिली आणि त्यात त्यांनी काँग्रेसने पाकिस्तानला, वेगळ्या मुस्लिम राष्ट्राला मान्यता देण्याच्या अटीवर काँग्रेसला आणि मुस्लिम लीगला एक होण्याची विनंती केली होती. मी जेव्हा गांधींना राजाजींच्या कार्यक्रमाबद्दल विचारले तेव्हा ते म्हणाले की त्यांचा प्रस्ताव काय आहे हे मला माहीत नाही. त्यांनी माझ्या विरोधात आणि मी त्यांच्या विरोधात युक्तिवाद करावा ही गोष्ट दुर्दैवी आहे असे मला वाटते. जोपर्यंत माझा संबंध आहे यासंबंधाच्या चर्चेला आता पूर्णविराम आहे. परंतु सत्य हे आहे की राजाजींचा खरोखर काय प्रस्ताव आहे हे मला माहीत नाही.

लु. फि. - हिंदू आणि मुसलमानांनी सहकार्य करावे आणि सोबत काम करत असताना कदाचित शांततापूर्ण सहकार्य करण्याचा उपाय सापडू शकेल हाच त्यांच्या योजनेचा सार नाही काय?

गां. - हो, परंतु जोपर्यंत तिसरी शक्ती, इंग्लंड, इथे आहे तोपर्यंत हे अशक्य आहे. आमचे सांप्रदायिक मतभेद आम्हाला त्रस्त करत राहतील. खूप वर्षांपूर्वी लॉर्ड मिंटो, तेव्हा ते व्हाईसराय होते, म्हणाले होते की ब्रिटिशांना जर हिंदुस्थानवरील प्रभुत्व कायम ठेवायचे असेल तर त्यांनी हिंदू आणि मुसलमानांना वेगळे ठेवले पाहिजे.

मी गांधींना म्हणालो की उद्धृत करण्यात आलेले मिंटोंचे हे विधान मी पाहिले आहे.

गां. - तेव्हापासून ब्रिटिश सत्तेचे हेच धोरण राहिले आहे.

लु. फि. - मला असेही सांगण्यात आले आहे की १९३७, १९३८ आणि १९३९ साली जेव्हा काँग्रेसची मंत्रिमंडळे पदावर होती तेव्हा ते मुसलमानांशी भेदभाव करत होते.

गां. - असे काही नसल्याची अधिकृत साक्ष त्या त्या प्रांतांमधील ब्रिटिश राज्यपालांनीच दिली आहे.

लु. फि. - परंतु संयुक्त प्रांतात आपल्याला निश्चित बहुमत मिळेल अशी काँग्रेसला खात्री नसल्यामुळे काँग्रेसने निवडणुकीत मुसलमानांशी तडजोड केली होती. परंतु निवडणुकीत भरघोस बहुमत मिळाल्यानंतर तिने मुसलमानांबरोबर संयुक्त मंत्रिमंडळ तयार करण्याला नकार दिला हे खरे नाही काय?

गां. - नाही, काँग्रेसने तयार केलेल्या संयुक्त प्रांताच्या सरकारमध्ये ४ मुसलमान मंत्री होते. त्यात मुस्लिम लीगचे प्रतिनिधी नव्हते परंतु त्यात मुसलमान होते. नाही, आम्ही नेहमीच मुसलमानांशी सहकार्य करण्याचा केला आहे. असे म्हणतात की मौलाना आमच्या हातातील कचकड्याची बाहुली आहेत. खरे म्हणजे ते काँग्रेसचे हुकुमशहा आहेत. ते अध्यक्ष आहेत. परंतु क्रिप्सच्या प्रस्तावांनी हिंदू आणि मुसलमानांमध्ये पूर्वीपेक्षाही मोठी फळी निर्माण केली आहे. ब्रिटिशांनी या दोन समुदायातील दरी कधी नाही इतकी वाढवली आहे.

लु. फि. - असे म्हणतात की काँग्रेसचे पुढारी आणि मुसलमानांचे पुढारी क्रिप्सशी चर्चा करण्याकरिता दिल्लीला आले होते, ते पुढारी क्रिप्सशी बोलले परंतु आपसात बोलले नाही.

गांधी सहमत होत म्हणाले - हे केवळ दुःखदच नव्हते, तर अपमानास्पदही होते. परंतु हा मुस्लिम लीगचा दोष होता. हे युद्ध सुरू झाल्यानंतर लवकरच व्हाईसरायना भेटण्याकरिता आम्हाला नवी दिल्लीत बोलावण्यात आले होते. राजेंद्र बाबू आणि मी काँग्रेसतर्फे बोलायला गेलो होतो, आणि श्री जिना मुस्लिम लीगतर्फे. जिनांना मी म्हणालो की आपण आपसात चर्चा केली पाहिजे आणि ब्रिटिश सरकारचा सामना आपण एक होऊन करू या. नवी दिल्लीत भेटायचे आमचे ठरले, परंतु आपण दोघांनी मिळून हिदुस्थानच्या स्वातंत्र्याची मागणी करायची असे जेव्हा मी म्हणालो तेव्हा ते म्हणाले की मी तुमच्या गाडीत येऊ शकत नाही, 'मला स्वराज्य नको आहे.' आम्ही सहमत होऊ शकलो नाही. मी म्हणालो की व्हाईसराय सोबत जाऊन निदान आपण ऐक्याचा देखावा तरी करू या; मी म्हणालो की एक तर तुम्ही माझ्या गाडीत चला वा मी तुमच्या गाडीत

चलतो. मला त्यांनी त्यांच्या कारमध्ये येण्याला संमती दिली, परंतु आम्ही व्हाईसरायशी वेगवेगळ्या सुरात बोललो, दोघे वेगवेगळे बोललो आणि वेगवेगळे दृष्टिकोन मांडले.

एवढ्या वेळात परतून आम्ही गांधींच्या घरापर्यंत आलो होतो. ते बाहेरच थांबले. मी घराला आधार देणाऱ्या एका बांबूला धरून उभा राहिलो. परंतु गांधी मात्र पूर्ण जोमात होते. ते आग्रहपूर्वक म्हणाले - प्रत्यक्ष जीवनात आम्हाला वेगवेगळ्या राष्ट्रात विभाजित करता येणे अशक्य आहे. आम्ही दोन राष्ट्र नाही. कौटुंबिक इतिहासात जर आपण पुरेसे मागे गेलो तर प्रत्येक मुसलमानाचे हिंदू नाव असल्याचे आढळून येईल. प्रत्येक मुसलमान हा हिंदूच होता, त्याने केवळ इस्लामचा स्वीकार केला. त्यामुळे राष्ट्रीयत्व निर्माण होत नाही. आणि खरोखरच जर आम्ही दोन राष्ट्र असू तर एखाद्या ख्रिश्चन धर्मगुरूने आम्हा सर्वांना ख्रिश्चन केले तर तेवढ्यामुळे आम्ही एक राष्ट्र होणार नाही, आणि अशाच प्रकारे हिंदुस्थानातील हे दोन धर्म आम्हाला दोन राष्ट्र करू शकत नाहीत. युरोप ख्रिश्चन आहे परंतु जर्मनी आणि इंग्लंड यांच्या संस्कृतीत आणि भाषेत इतके साम्य असूनही ते एकमेकांचे गळे आवळू पाहतात. आम्हा हिंदुस्थानींची एक संस्कृती आहे. उत्तरेकडे हिंदू आणि मुसलमान या दोन्ही समुदायांना हिंदी आणि उर्दू समजते. मद्रासमध्ये हिंदू आणि मुसलमान तमिळ बोलतात, आणि बंगालमध्ये हे दोघेही बंगाली बोलतात, आणि हिंदी वा उर्दू बोलत नाहीत. जेव्हा सांप्रदायिक दंगली होतात तेव्हा त्या नेहमीच गायीवरून आणि धार्मिक मिरवणुकांवरून होतात. याचा अर्थ आमच्या अंधश्रद्धा हा गोंधळ निर्माण करतात, आमचे राष्ट्रीयत्व वेगळे नाही.

लु. फि. - कॅरो (ओल्फ कर्कपट्रिक कॅरो, विदेश विभागाचे सचिव, यांनी पंजाबमध्ये ब्रिटिश अधिकारी म्हणून बरीच वर्षे काम केले होते.) आणि जेन्किन्स (सर इव्हॅन जेन्किन्स, सचिव, पुरवठा विभाग.) मला म्हणाले होते की खेड्यांमध्ये हिंदु-मुसलमान असा भेद मुळीच नाही, आणि खेड्यांमध्ये या दोन समुदायाचे संबंध अगदी शांततापूर्ण आहेत. हे जर खरे असेल तर हे फार महत्त्वाचे आहे कारण ९० टक्के हिंदुस्थान खेड्यातच राहतो.

गां. - हे असे आहे. आणि यातून हेच सिद्ध होते की जनता विभाजित नाही, राजकारणी आपल्यामध्ये भेदभाव निर्माण करत आहेत.

गांधींना मी म्हणालो, “नवी दिल्लीतील माझ्या उपहारगृहातील साकी मला सांगत होता की मी मुस्लिम लीगचा सदस्य आहे आणि पाकिस्तानचाही पुरस्कर्ता आहे. परंतु जिथे मुसलमान अल्पसंख्य असतात तिथेच सांप्रदायिक दंगली होत असतात, हिंदू जिथे अल्पसंख्य असतात तिथे सांप्रदायिक दंगली कधीही होत नाहीत.”

गांधी स्पष्ट करत म्हणाले, “फिशर तू इथे अतिशय अल्पकाळाकरिता आहेस. तू सर्व गोष्टींचा अभ्यास करू शकत नाही. परंतु तू जर शोध घेतला आणि तुला जर आम्ही चूक आणि गुन्हेगार आहो असे आढळले तर तसे जोराच्या आवाजात घोषित कर.

बांबूने तयार केलेल्या एका लांब इमारतीकडे ते चालत गेले. हे माझे रुग्ण आहेत. ते एका स्त्री रुग्णाजवळ थांबले. ती तिच्या खाटेवर बसलेली होती. ती आजारी दिसत होती. गांधी तिच्याशी पाचेक मिनिट बोलले. ती हसली आणि गांधीसुद्धा हसत होते. गांधीजींनी सांगितले, “ही माझ्या सर्वात चांगल्या रुग्णातील एक आहे.”

डॉ. दास आमच्या बरोबर होते. गांधींना डिवचण्यासाठी मी म्हणालो, “हिला डॉक्टरवरच सोपवणे योग्य होणार नाही काय?”

त्यावर गांधीं म्हणाले, “नाही, यात कोणतीही फसवेगिरी वा ढोंग नाही”. ती माझी रुग्ण नाही, मग ते एका अशा खोलीत गेले की जिच्यात लाल रंगाच्या लाकडी पाळण्याशिवाय इतर काहीही नव्हते. गांधी तिथे जाताच त्या बाळाच्या आईने मुलाला पाळण्यातून बाहेर काढले. मुलाचा गालगुच्चा घेत ते म्हणाले, “ही माझी रुग्ण नाही, करमणूक आहे.” गांधींच्या लाडाला प्रतिसाद देत ते मूल खळखळून हसू लागले आणि गांधींनी तिला अजून गुदगुल्या केल्या. गांधी म्हणाले, “या मुलीचे वडील वायव्य प्रांतात ब्रिटिश सैन्यात सार्जंट होते. त्यांना हिंदुस्थानी लोकांवर गोळीबार करण्याचा आदेश देण्यात आला होता. त्यांनी नकार दिला आणि त्यांना १६ वर्षांच्या कैदेची शिक्षा झाली. त्यांनी सहा वर्ष तुरुंगात काढले. परंतु त्यांना सोडावे म्हणून अनेक विनंतीअर्ज करण्यात आल्यामुळे दोन वर्षांपूर्वी त्यांची सुटका झाली. आता ते आमच्याबरोबर राहतात. आम्ही परत चालत गांधींच्या घराजवळ गेलो आणि मग मी त्यांचा निरोप घेतला”.

घरी परतत असताना मी माझ्या घरासमोरील घराजवळ थांबलो. तिथे गांधींचे एक सचिव राहत होते. गांधींशी माझी मुलाखत सुरू असताना ते गांधींच्या सर्वात जवळ बसले होते. ते ठेंगणे आणि काळे होते. त्यांचा चेहरा खोल विचारात गढलेला असल्यासारखा दिसत होता. ते गांधीजींबरोबर चोवीस वर्षांपासून काम करत होते.

काल गांधींनी ब्रिटिशांना हिंदुस्थानात राहू देण्यासंबंधी जे विधान केले होते त्यासंबंधी तुम्हाला काय वाटते असे मी त्यांना विचारले. ते म्हणाले, “ही तर विलक्षण गोष्ट आहे. असे विधान त्यांनी पहिल्यांदाच केले

आहे, ते आमच्याकरिता धक्कादायक होते. युद्धातून काही चांगले बाहेर पडू शकते असे मला वाटत नाही.“ त्यांनी हे विधान किती तरी वेळा केले. आपल्या सेनापतीच्या महात्म्यावर ही फार कठोर टीका होती. गांधीजींचे सहकारी त्यांच्या दहशतीच्या वातावरणात राहत होते असे मला सूचित करायचे नाही. या सचिवाचे नाव मी नंतर विचारले. ते होते किशोरीलाल घनश्यामलाल मश्रूवाला. मधले नाव देवाचे आहे.

जेवणाची वेळ होईपर्यंत मी टबमध्ये टंकलेखन करत होतो.

जेवणाच्या वेळी गांधी म्हणाले, “फिशर, तुझी वाटी दे, मी तुला काही भाजी देतो. तुला भाज्या आवडत नाहीत?” मी त्यांना सांगितले की मी पालकाचा सूप दोन दिवसात चार वेळा खाल्ला. आता अजून तो खाण्याची इच्छा नाही. ते म्हणाले, “म्हणजे तुला भाज्या आवडत नाहीत”

मी उत्तर दिले,”मला या भाज्यांची चव आवडत नाही.”

गां. - तू त्यात भरपूर मीठ आणि लिंबू घातले पाहिजे.

लु. फि. - तुम्हाला माझी चव मारायची आहे?

गां. - नाही, चव वाढवायची आहे.

लु. फि. - तुम्ही अहिंसक आहा. तुम्ही चव मारणार नाही.

गां. - लोक जर इतकीच गोष्ट मारणार असतील तर मला त्याचे काही वाटणार नाही.

मला घाम येत होता. मी माझा चेहरा आणि मान रुमालाने पुसले. मी म्हणालो, पुढील वेळी मी जेव्हा हिंदुस्थानात येईन तेव्हा . . . तुम्ही एक तर वातानुकलक ठेवले पाहिजे वा व्हाईसराय भवनात राहायला जायला पाहिजे.

मी जेव्हा असे म्हणालो तेव्हा ते घास चावत होते. त्यामुळे माझ्या बोलण्याकडे त्यांचे लक्षच नाही असे वाटत होते. मी गप्प बसलो.

गांधींना जणू काय असे करायचेच आहे अशा प्रकारे माझ्याकडे मान न वळवता ते म्हणाले - “ठीक आहे, पुढील वेळी हिंदुस्थानात येशील तेव्हा”. जणू काय त्यांना तसे करायचेच होते.

जेवण करून मी झोपलो. नंतर सकाळी माझी गांधींशी जी चर्चा झाली होती तिचे मी टिपण तयार केले. नंतर मे १९३० मध्ये संसदेत सादर करण्यात आलेला सायमन वैधानिक आयोगाचा लांब अहवाल मी वाचला. या अहवालाच्या खंड एक पृष्ठ ५९वर पुढील परिच्छेद आढळतो -

***इंडियन स्टॅट्युटरी अहवालातील खंड १ मधील तो परिच्छेद असा होता : सिंधमधील ब्रिटिश उच्चायुक्ताला फार अधिक मोकळीक देणयात आली आहे अशी भावना तेथील हिंदू अल्पसंख्याकांमध्ये आहे, तर मुसलमानांमध्ये मुंबई प्रांतामधून वेगळे होण्याची भावना जगजाहीर आहे. सिंधमधील मुसलमान शेतकऱ्यांमध्ये वा तेथील सर्वसामान्य मुसलमानांच्या घरात ही भावना इतकी तीव्र नाही. हिंदुस्थानभरातील मुसलमान पुढाऱ्यांमध्ये ही भावना जास्त आहे असे वाटते कारण मुसलमान बहुसंख्य असलेले पंजाब, बलुचिस्तान, वायव्य सरहद्द प्रांत यांच्याजवळ असलेला हा प्रांत झाला तर स्वाभाविकपणेच हिंदूंच्या वर्चस्वाची भीती राहणार नाही असे त्यांना वाटते.***

गांधींशी माझ्या मुलाखतीची सुरुवात मी हा परिच्छेद वाचून केली. मी म्हणालो की मुसलमान पुढाऱ्यांना देशाच्या विभाजनात जितका रस आहे तितका सर्वसामान्य मुसलमानांना नाही असे जे तुम्ही सकाळी म्हणाला होता त्यावर हा परिच्छेद शिक्कामोर्तब करतो.

गांधी मान डोलवत म्हणाले, - अर्थातच.

लु. फि. - परंतु मुसलमान पुढाऱ्यांची वाटणारी ही भीती कितपत खरी आहे? हिंदूंची प्रभुत्व गाजवण्याची इच्छा आहे हे मुसलमान जनतेपेक्षा कदाचित त्यांच्या पुढाऱ्यांच्या लक्षात अधिक आले असावे. हिंदूंनी आपला वरचष्मा ठेवण्याचा प्रयत्न केला नाही असे तुम्ही वस्तुनिष्ठपणे म्हणू शकता काय?

गां. - इकडेतिकडे काही लोकांच्या मनात हे निषेधार्ह विचार असूही शकतील. परंतु काँग्रेसच्या आंदोलनात आणि सर्वसामान्य जनतेत मुसलमानांवर नियंत्रण स्थापित करण्याची वृत्ती नाही. प्रांतांना व्यापक प्रमाणात स्वायत्तता असली पाहिजे. माझा स्वतःचा हिंसेला वा प्रभुत्वाला विरोध आहे आणि जनतेवर वा इतर राज्यांवर जुलूम करणाऱ्या शक्तिसंपन्न सरकारवरही माझा विश्वास नाही. यामुळे माझा प्रभुत्वावर विश्वास कसा असू शकतो? आपल्या जनतेवर अधिक चांगली पकड निर्माण करता यावी म्हणून ही आरडाओरड आहे.

लुई फिशर म्हणाले की मला तुम्हाला काँग्रेस पक्षाबद्दल अनेक प्रश्न विचारायचे आहेत. अतिशय उच्च पदावर असलेल्या ब्रिटिशांनी मला सांगितले आहे की काँग्रेसला मोठ्या व्यावसायिकांचा पाठिंबा आहे आणि गांधीला मुंबईच्या गिरणीमालकांचा पाठिंबा असून ते त्याला हवा तितका पैसा देतात. या विधानांमध्ये कितपत सत्य आहे?

गां. - दुर्दैवाने हे खरे आहे. काँग्रेसजवळ आपले काम करण्याकरिता पुरेसा पैसा नाही. प्रत्येक सदस्याकडून दरवर्षी चार आणे गोळा करण्याचा आणि त्यावर काम चालवण्याचा विचार आम्ही सुरुवातीला केला होता. परंतु तसे करता येणे शक्य झाले नाही.

लु. फि. - काँग्रेसच्या एकूण अंदाजपत्रकात श्रीमंत हिंदुस्थानींच्या पैशाचे प्रमाण किती असते?

गा. - जवळपास सर्व असे म्हणायला हरकत नाही. उदाहरणार्थ या आश्रमात आज आम्ही राहतो त्यापेक्षा अजून किती तरी गरिबीने आम्ही राहू शकतो आणि कमी पैसा खर्च करू शकतो. परंतु आम्ही राहत नाही आणि आमच्या श्रीमंत मित्रांकडून पैसा येतो.

लु. फि. - काँग्रेसला श्रीमंत हितसंबंधांकडून पैसा मिळतो आणि त्याचा काँग्रेसच्या धोरणावर परिमाम होतो हे खरे नाही काय? यामुळे नैतिक दडपण येत नाही काय?

गां. - त्यामुळे नकळत कर्ज निर्माण होते. परंतु खरे म्हणजे श्रीमंतांच्या विचारसरणीचा आमच्यावर फार कमी प्रभाव पडतो. अनेकदा तर त्यांना आमच्या संपूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीची भीती वाटते.

लु. फि. - परवापरवाच ‘हिंदुस्तान टाईम्स’मध्ये मी वाचले की श्री बिर्ला यांनी आपल्या कापडगिरण्यांमधील मजुरांना जीवननिर्वाहाकरिता वाढत्या खर्चाशी तोंड मिळवणी करता यावी म्हणून त्यांचे पगार वाढवले आहेत, या वर्तमानपत्रात पुढे असेही लिहिले आहे की यासंबंधात इतर गिरणी मालकांनी अजून काहीही केले नाही. ‘हिंदुस्तान टाईम्स’ तर काँग्रेसचे वर्तमानपत्र आहे.

गांधी प्रतिवाद करत म्हणाले, “नाही, ते पूर्णपणे बिर्लांचे वर्तमानपत्र आहे. मला हे माहीत आहे कारण माझा मुलगा तिथे संपादक आहे. तथ्य बरोबर आहेत, परंतु याचा काँग्रेसशी काहीही संबंध नाही. तुम्ही बरोबर आहा, परंतु तरीही काँग्रेसचे श्रीमंतांवर अवलंबून राहणे दुर्दैवी गोष्ट आहे. ‘दुर्दैवी’ हा शब्द मी वापरला आहे. त्याचा धोरणावर दुष्परिणाम होत नाही.”

लु. फि. - याचा परिणामी सामाजिक आणि आर्थिक समस्यांवर लक्ष केंद्रित करणे सोडून देण्यात आणि जवळपास सगळे लक्ष राष्ट्रीयत्वावर केंद्रित करण्यावर होऊन राहिला नाही काय?

गां. - नाही. काँग्रेसने वेळोवेळी विशेषतः पंडित नेहरूंच्या प्रभावाने प्रगत सामाजिक सुधारणांचा आणि आर्थिक योजनांचा स्वीकार केला आहे. मी ती माहिती तुमच्याकरिता गोळा करून ठेवली असती.

लु. फि. - परंतु हे खरे नाही काय की या सर्व सामाजिक सुधारणा स्वातंत्र्य मिळाल्यानंतर करण्याचे ठरवण्यात आले आहे?

मतभेद व्यक्त करत गांधी म्हणाले - नाही, प्रांतांमध्ये जेव्हा काँग्रेसचे सरकार होते (१९३७-३९) तेव्हा काँग्रेसच्या मंत्रिमंडळाने अनेक सुधारणा केल्या, परंतु नंतर त्या ब्रिटिश प्रशासनाने रद्द केल्या. आम्ही गावाकरिता, शाळांकरिता आणि इतर क्षेत्रांकरिताही सुधारणा केल्या होत्या.

लु. फि. - मला सांगण्यात आले आहे आणि सायमन अहवालातही मी वाचले आहे की हिंदुस्थानला ग्रामीण सावकारांचा फार मोठा शाप आहे. यांच्यामुळे शेतकरी जन्मापासून तर मृत्यूपर्यंत कर्जाच्या विळख्यात अडकलेले असतात. अशाच परिस्थितीत शेतकऱ्यांना लुबाडणाऱ्या सावकारांना हटवण्याकरिता युरोपमध्ये खाजगी परोपकारी संस्था आणि सरकार यांनी भूमी अधिकोष सुरू केला. तुमचे काही श्रीमंत मित्र शुद्ध व्यावसायिक पद्धतीवर असा भूमी अधिकोष का तयार करत नाहीत? यामुळे त्यांना ४० ते ७० टक्के व्याज मिळण्याऐवजी २ वा ३ टक्के व्याज मिळू शकेल? या योजनेत त्यांचा पैसा सुरक्षित राहील आणि त्यांना थोडेसे व्याजही मिळेल. इतकेच नाही तर ते देशाला मदतही करतील.

गां. - अशक्य. सरकारी कायद्याशिवाय असे करता येऊ शकत नही.

लु. फि. - का?

गा. - कारण शेतकरी कर्जाची परतफेड करणार नाहीत.

लु. फि. - आयुष्यभर सावकाराच्या कर्जात राहण्याऐवजी या तीन टक्के व्याजदराच्या कर्जाची परतफेड करणे योग्य आहे असे शेतकऱ्यांच्या निश्चितच लक्षात येईल. ही गोष्ट त्यांच्या लक्षात आल्याशिवाय राहील काय?

गां. - व्याजबट्ट्याने पैसा देणे ही प्राचीन पद्धत आहे आणि ती खेड्यांमध्ये खोलवर रुजली आहे. तुम्ही ज्याचा पुरस्कार करता ते स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी करता येऊ शकत नाही.

लु. फि. - स्वतंत्र हिंदुस्थानात काय होईल? शेतकऱ्यांच्या जीवनात सुधारणा करण्याकरिता तुमची काय उपाययोजना आहे?

गां. - शेतकऱ्यांची जमीन होईल. ती घेण्याकरिता आम्हाला सांगावे लागणार नाही. ते ती स्वतःहोऊन घेतील.

लु. फि. - जमीनदारांना नुकसानभरपाई दिली जाईल काय?

गा. - नाही. ते आर्थिक दृष्टीने अशक्य आहे. आमच्या करोडपती मित्रांबद्दलची कृतज्ञता आम्हाला असे सांगण्यापासून परावृत्त करत नाही हे तुमच्या लक्षात आलेच असेल. आपले जीवन जगणारी खेडी स्वयंशासित घटक होतील.

लु. फि. - परंतु तेव्हा अर्थातच राष्ट्रीय सरकार असेल.

गा. - नाही.

लु. फि. - रेल्वे, तारा वगैरेंच्या संचालनाकरिता तुम्हाला निश्चितच राष्ट्रीय प्रशासन लागेल.

गां. - हिंदुस्थानात रेल्वे नसली तरी मी एक अश्रूही ढाळणार नाही.

लु. फि. - परंतु त्यामुळे शेतकऱ्यांचे हाल होतील. शेतकऱ्याला शहरी वस्तूंची गरज असते आणि त्याने आपले उत्पादन देशाच्या विविध भागात आणि विदेशात विकले पाहिजे. खेड्यांना वीज आणि सिंचनाची व्यवस्था पाहिजे. कोणतेही एक गाव जलविद्युत योजना केंद्र बांधू शकणार नाही वा सिंधमधील सक्कर धरणासारखी सिंचनव्यवस्था करू शकणार नाही.

गांधीजी मध्येच हस्तक्षेप करत म्हणाले. - हे तर मला माहीत आहे, परंतु ही फार निराशाजनक गोष्ट आहे. यामुळे संपूर्ण प्रांत कर्जबाजारी झाला.

लु. फि. - मला माहीत आहे, परंतु त्यामुळे किती तरी नवीन जमीन लागवडीखाली आली आहे, आणि जनतेकरिता हा बांध वरदान ठरला आहे.

गां. - मला माहीत आहे की माझा दृष्टिकोन काहीही असला तरी केंद्रीय सरकारचे प्रशासन राहणार आहे. असे असले तरी पाश्चिमात्य देशात मान्य असलेल्या लोकशाहीपद्धतीवर आणि त्यातील संसदेच्या प्रतिनिधित्वाकरिता सर्वांनी मत देण्याच्या पद्धतीवर माझा विश्वास नाही.

लु. फि. - मला ही चर्चा पुढे नेण्याची इच्छा होती. यामुळे मी विचारले, “हिंदुस्थानात काय व्हावे अशी तुमची इच्छा आहे?”

गां. - हिंदुस्थानात सात लाख खेडी आहेत. प्रत्येक गावाला त्याच्या नागरिकांच्या इच्छेप्रमाणे संघटित केले जाईल, त्या सर्वांना मतदानाचा अधिकार असेल. मग सात लाख मते असतील, ४० कोटी नाही. वेगळ्या शब्दांत प्रत्येक गाव एक मत असेल. गाव आपल्या जिल्ह्याचे प्रशासन निवडील आणि जिल्हा प्रशासन प्रांतिक प्रशासन निवडील आणि हे सर्व मिळून अध्यक्ष निवडतील. तो राष्ट्रीय कार्यकारी अधिकारी असेल.

लु. फि. - हे बरेचसे सोव्हिएत व्यवस्थेप्रमाणे होईल.

गां. - मला हे माहीत नव्हते. मला त्याचे काही वाटत नाही.

लु. फि. - श्रीयुत गांधी आता मला तुम्हाला काँग्रेससंबंधी दुसरा प्रश्न विचारायचा आहे. काँग्रेस हुकुमशाही संस्था आहे असा तिच्यावर आरोप आहे. या संबंधात शुश्टर आणि विंट या दोन ब्रिटिश लेखकांनी ‘इंडिया ऍन्ड डेमॉक्रसी’ या नावाचे एक नवीन पुस्तक लिहिले आहे. त्यांनी लिहिले आहे की १९३९ साली काँग्रेसच्या प्रांतिक मंत्रिमंडळांनी जेव्हा राजीनामा दिला तेव्हा त्यांनी स्वतःहोऊन राजीनामा दिला नव्हता तर जिल्ह्यातील (मुळात आहे त्याप्रमाणे) काँग्रेसच्या हुकूमशहांच्या आदेशानुसार दिला होता.

गां. - हा वाह्यातपणा आहे. सर्व निर्णय हाऊस ऑफ कॉमन्समध्ये घेतले जातात वा पक्षातील सत्ताधारी गट (कॉकस) घेतात वा क्लब ऑफ लंडनमध्ये घेतले जातात हे तुम्हाला माहीत नाही काय? काँग्रेसचे सदस्य काँग्रेसचे पदाधिकारी निवडतात, आणि मंत्री काँग्रेसचे सदस्य असल्यामुळे ते काँग्रेसच्या तत्त्वांचे पालन करत असतात. सर सॅम्युअल यांनी मला ब्रिटनमध्ये लोकशाही कसे काम करते त्यासंबंधी काही गोष्टी सांगितल्या होत्या.

लु. फि. - असे दिसते की तुमचे ते आवडते ब्रिटिश राजकारणी आहेत. यावर आम्ही खूप हसलो.

गां. - यामुळे निदान ते कुठे उभे आहेत ते मला कळते. सांसदीय लोकशाही भ्रष्टाचारापासून मुक्त नाही, तुम्हाला जर टॅमी हॉल आणि मेयर ऑफ शिकॅगो आठवत असतील तर तुम्हाला हे कळायलाच पाहिजे. स्वतंत्र हिंदुस्थान जगातील इतर देशांप्रमाणे वागेल असे मी म्हणू शकत नाही. आमच्याजवळ देण्याकरिता वेगळ्या पद्धती असतील.

मी म्हणालो की मला तुमच्याशी सुभाषचंद्र बोससंबंधी काही मिनिट बोलायला आवडेल, ते इथून निसटून धुरी राष्ट्रांच्या प्रदेशात गेले. विमान अपघातात बोसचा मृत्यू झालेला ऐकून, जी बातमी नंतर खोटी

असल्याचे सिद्ध झाले ही गोष्ट वेगळी, परंतु बोसच्या आईला तुम्ही सांत्वनपर तार पाठवली हे ऐकून मला थोडा धक्काच बसला होता.

गां. - नंतर खोट्या ठरलेल्या बातमीला मी प्रतिसाद दिला म्हणून तुम्ही असे म्हणता काय?

लु. फि. - नाही, फासीवादी जर्मनीकडे जाऊन त्यांच्यात सामील झालेल्या माणसाबद्दल तुम्ही शोक व्यक्त केल्याबद्दल आणि त्यांच्याबद्दल सहानुभूती व्यक्त केल्याबद्दल.

गां. - मी तसे केले कारण बोस देशभक्ताहूनही श्रेष्ठ देशभक्त होते. त्यांचा मार्ग चुकलेला असू शकतो. मला वाटते की त्यांचा मार्ग चुकला होता. मी अनेकदा बोसना विरोध केलेला आहे. मी त्यांना दोनदा काँग्रेसचा अध्यक्ष होण्यापासून अडवले आहे. अखेरीस माझ्याशी त्यांचे मतभेद असूनही ते अध्यक्ष झाले. परंतु कल्पना करा की ते रशियाकडे वा अमेरिकेकडे मदत मागण्याकरिता गेले असते तर त्यामुळे फरक पडला असता काय? ते अधिक चांगले झाले असते काय?

लु. फि. - तुम्ही कोणाकडे जाता यामुळे अर्थातच फरक पडतो.

गां. - हिंदुस्थानला स्वतंत्र करण्याकरिता मला कोणाचीही मदत नको. हिंदुस्थानने स्वतःच स्वतःचा बचाव करावा असे मला वाटते.

लु. फि. - इतिहासात नेहमीच देशांनी आणि व्यक्तींनी विदेशांना मदत केलेली आहे. ब्रिटनपासून अमेरिकेला स्वातंत्र्य मिळावे म्हणून मदत करण्याकरिता लफायट फ्रान्समधून अमेरिकेत गेले होते. स्पेनचे गणतंत्र वाचावे म्हणून हजारो अमेरिकी आणि इतर विदेशी लोक मरण पावले होते.

गां. - व्यक्ती, होय. परंतु अमेरिका त्यांचा मित्र आहे ज्याने आम्हाला गुलाम केले आहे. आणि लोकशाहीवादी जेव्हा फासीवाद्यांना जिंकतील तेव्हा ते अधिक चांगले जग निर्माण करतील याची मला खात्री नाही. तेसुद्धा फासीवाद्यांसारखेच होतील.

लु. फि. - मी कालपरवाच तुम्हाला सांगितले होते की यासंबंधात आपल्यात मतभेद आहेत यावर आपण सहमत होऊ या. मी जेव्हा पाहतो की लोक हिंदुस्थानातील सामाजिक समस्या सोडून स्वातंत्र्यावर लक्ष केंद्रित करतात तेव्हा मी निराश होतो आणि मला त्यातील उणिवा दिसू लागतात. बोस तरुण गृहस्थ आहेत आणि त्यांच्यात नाट्यमय कृती करण्याची प्रवृत्ती आहे, आणि जर्मनीच्या फासीवादाच्या मोहात पडून

हिंदुस्थानला त्यांनी जरी स्वतंत्र केले असते तरी त्यांनी त्याला फासीवादी केले असते. अशा परिस्थितीत हिंदुस्थानची परिस्थिती ब्रिटनच्या सत्तेत असताना जी आहे त्याहूनही वाईट झाली असती.

हळू आवाजात आपले बोलणे सुरू ठेवत गांधी पुढे म्हणाले, ब्रिटिशांच्या राजवटीतही फासीवादी महत्त्वाचे घटक आहेत, आणि हिंदुस्थानात या घटकांचे आम्हाला प्रत्यही दर्शन होत असते. ब्रिटिशांना जर पुरावे देऊन हे युद्ध जिंकण्याचे आपण अधिकारी आहो आणि हे युद्ध आपण जिंकले तर आपण हे जग अधिक चांगले करू असे सिद्ध करायचे असेल तर त्यांनी हिंदुस्थानला सत्ता सोपवून स्वतःला शुद्ध केले पाहिजे. तुमचे अध्यक्ष चार स्वातंत्र्याबद्दल बोलतात. त्यात स्वतंत्र होण्याच्या अधिकाराचा समावेश आहे काय? लोकशाही वाचवण्याकरिता आम्हाला जर्मनी, इटाली आणि जपानशी लढण्याकरिता सांगितले जाते, आम्हाला स्वतःलाच जर स्वातंत्र्य मिळालेले नाही तर आम्ही कसे लढू शकू?

याच वेळी इंटरनॅशनल न्यूज सर्व्हिसचे चॅपलीन आणि टाईम आणि लाईफचे बाल्डेन आले. त्यांनी चीनमध्ये अनेक वर्ष घालवली होती, आणि नुकताच सेनापती स्टिलवेलबरोबर ते बर्मात फिरून आले होते. ते शर्ट, गुढग्यापर्यंत पोहचणारी पॅन्ट आणि जोडे घालून गांधीच्या झोपडीत आले. गांधींच्या मुलाखतीची त्यांची ही वेळ ठरलेली होती. गांधी म्हणाले की तुला जर ऐकायचे असेल तर तू थांबू शकतो. आणि नंतर त्यांच्याकडे वळून ते म्हणाले, “तुम्ही जमिनीवर मांडी घालून बसू शकाल काय?” ते बसल्यानंतर गांधी म्हणाले, “एक अमेरिकी आधीच माझी चिरफाड करत होता. आता मी तुमच्या ताब्यात आहे.” गांधी त्यांच्याबरोबर अर्धाएक तास बोलले आणि नंतर मी त्यांना माझ्या झोपडीत घेऊन गेलो, त्यांना थंड पाणी दिले आणि त्यांना माझ्या न्हाणीत आंघोळ करायचाही मी आग्रह केला.

मी गांधींना दिलेल्या प्रश्नांचे उत्तर घेऊन गांधींचे सर्वात महत्त्वाचे सचिव श्री महादेव देसाई दुपारी आले. गांधींनी केलेल्या विनंतीवरून मी ते त्यांना काल दिले होते. उत्तर दोन पानांवर टाईप केलेले होते आणि गांधींनी त्यात स्वतःच्या हाताने दुरुस्त्या केलेल्या होत्या. मी गांधींना दिलेले प्रश्न पुढील पत्रात याप्रमाणे होते -

गेल्या काही दिवसात आपण जी काही चर्चा केली तिच्या आधारावर मी तुमच्यासमोर पुढील प्रश्न मांडतो आहे आणि तुमच्याकडून त्यांचे पूर्ण उत्तर मिळेल अशी अपेक्षा आहे.

गांधीजीनी त्यासंबंधी असे लिहिले आहे -

एक मित्र (लुई फिशर) नवीन प्रस्तावाच्या परिणामांविषयी चर्चा करत होते. चर्चा दिशाहीन होऊ नये म्हणून मी त्यांना त्यांचे प्रश्न तयार करण्याकरिता सांगितले आणि त्यांचे उत्तर हरिजनमधून देण्याचे मी त्यांना कबूल केले. त्यांनी ते कबूल केले आणि त्यांनी मला पुढील प्रश्न लिहून दिले. पत्र असे होते -

**प्रिय श्री गांधी,**

**गेल्या काही थोड्याशा दिवसात आपली जी चर्चा झाली तिच्या आधारावर मी तुमच्यासमोर पुढील प्रश्न ठेवण्याचे स्वातंत्र्य घेतो आणि आपण त्यांचे पूर्ण उत्तर द्याल अशी अपेक्षा करतो -**

**प्रश्न १ - ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानातून ताबडतोब निघून जावे असे तुम्ही म्हणता. मग हिंदुस्थानी जनता राष्ट्रीय सरकार तयार करील काय, आणि अशा हिंदुस्थानी सरकारमध्ये कोणते गट वा पक्ष सहभागी होतील?**

**प्रश्न २ - हिंदुस्थानचे राष्ट्रीय सरकार धुरी राष्ट्र आणि जपान यांच्या विरोधात मित्र राष्ट्रांना हिंदुस्थानात सैनिकी अड्डे बनवू देईल काय?**

**प्रश्न ३ - या युद्धात आक्रमक फासीवादी शत्रूंच्या विरोधात हे राष्ट्रीय सरकार मित्र राष्ट्रांना अजून कोणती मदत करू शकेल?**

**प्रश्न - ४ हिंदुस्थान आणि मित्रराष्ट्र यांच्यामधील या सहकार्याचे हिंदुस्थान आणि मित्र राष्ट्रांनी परस्परांना मदत करणाऱ्या करारात रूपांतर करता येईल काय वा केले पाहिजे काय?**

**अतिशय आदरपूर्वक सादर करत आहे,**

**लुई फिशर**

**गांधीजींनी उत्तरांना शीर्षक दिले होते - "काही महत्त्वाचे प्रश्न आणि त्यांचे उत्तर".**

**प्रश्न १ - ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानातून ताबडतोब निघून जावे असे तुम्ही म्हणता. मग हिंदुस्थानी जनता राष्ट्रीय सरकार तयार करील काय, आणि अशा हिंदुस्थानी सरकारमध्ये कोणते गट वा पक्ष सहभागी होतील?**

उत्तर - हिंदुस्थानी काय करतील वा करणार नाही याचा मुळीच विचार न करता ब्रिटिश सरकारने काय केले पाहिजे हे सांगणारा माझा प्रस्ताव एकतर्फी आहे. परंतु ब्रिटिश जर व्यवस्थितपणे निघून गेले तर येथील पुढारी आपल्यामधून एक अस्थायी सरकार स्थापन करण्याची शक्यता आहे. परंतु दुसरी गोष्टसुद्धा घडू शकते. ज्या लोकांच्या मनात देशाचा मुळीच विचार नाही आणि जे केवळ स्वतःचाच विचार करतात ते एकत्र होऊन कोणत्या ना कोणत्या प्रकारे आणि काहीही करून सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न करू शकतील आणि त्याकरिता जमेल तितक्या उपद्रवी शक्तींना आपल्याबरोबर घेऊ शकतील. मी आशा करतो की ब्रिटिश सत्ता

जर पूर्णपणे, कायमची आणि प्रामाणिकपणे निघून गेली तर येथील सुज्ञ पुढाऱ्यांना आपल्या जबाबदारीची जाणीव होईल, काही काळ तरी ते आपसातील मतभेद विसरतील आणि ब्रिटिश सत्तेने इथे सोडलेल्या साधनांद्वारे अस्थायी कार्यकारी परिषेदेची स्थापना करतील. कोणत्या पक्षाचा वा व्यक्तींचा कार्यकारी परिषेदेत प्रवेश व्हावा वा होऊ नये हे ठरवणारी कोणतीच सत्ता इथे नसल्यामुळे केवळ संयम हेच त्या वेळी मार्गदर्शक तत्त्व असेल. जर तसे झाले तर काँग्रेस, लीग आणि संस्थानांचे प्रतिनिधी त्या सरकारमध्ये बहुधा काम करतील आणि अस्थायी राष्ट्रीय सरकार तयार करण्याकरिता ते आपसात काही तरी तडजोड करतील. हा सर्व केवळ माझा अंदाज आहे, यापेक्षा अधिक काहीही नाही.

**प्रश्न २ - हिंदुस्थानचे राष्ट्रीय सरकार धुरी राष्ट्र आणि जपान यांच्या विरोधात मित्र राष्ट्रांना हिंदुस्थानात सैनिकी अड्डे बनवू देईल काय?**

उत्तर - फासीवादी प्रवृत्तींना दूर ठेवणे हे आम्हा दोघांचेही समान उद्दिष्ट असल्यामुळे जर राष्ट्रीय सरकार स्थापन झाले असे गृहीत धरले आणि ते माझ्या अपेक्षेनुरूप असले तर त्याचे पहिले काम आक्रमक राष्ट्रांविरुद्ध मित्र राष्ट्रांशी संरक्षण विषयक करार करणे असेल.

**प्रश्न ३- या युद्धात आक्रमक फासीवादी शत्रूंच्या विरोधात हे राष्ट्रीय सरकार मित्र राष्ट्रांना अजून कोणती मदत करू शकेल?**

उत्तर - आपण कल्पना करत असलेल्या या राष्ट्रीय सरकारला मार्गदर्शन करण्यात जर माझा हात असेल तर आधीच निश्चित करण्यात आलेल्या अटींवर मित्र राष्ट्रांना हिंदुस्थानच्या भूमीचा उपयोग सहन करण्यापलीकडे इतर कोणतीही मदत केली जाणार नाही. कोणी हिंदुस्थानी जर सैन्यात भरती होऊन वा आर्थिक वा इतर प्रकारे मित्र राष्ट्रांना मदत करत असेल तर त्याकरिता स्वाभाविकच मनाई नसेल. हे लक्षात घेतले पाहिजे की ब्रिटिश सत्ता निघून गेल्याबरोबर हिंदुस्थानी सैन्य रद्द केले जाईल. तसेच माझे म्हणणे जर परिषदांमध्ये आणि राष्ट्रीय सरकारमध्ये ऐकले जाईल तर त्यांच्या संसाधनांचा उपयोग जागतिक शांतता प्रस्थापित करण्याकरिता होईल. परंतु लक्षात ठेवा की राष्ट्रीय सरकार स्थापन झाल्यानंतर माझा आवाज कदाचित अरण्यरुदनासारखा असेल आणि राष्ट्रवादी हिंदुस्थानला युद्धवेड लागलेले असू शकेल.

**प्रश्न ४ - हिंदुस्थान आणि मित्रराष्ट्र यांच्यामधील या सहकार्याचे हिंदुस्थान आणि मित्र राष्ट्रांनी परस्परांना मदत करणाऱ्या करारात रूपांतर करता येईल काय वा केले पाहिजे काय?**

उत्तर - मला वाटते की हा प्रश्न विचारण्याची वेळ अजून आलेली नाही, आणि हे संबंध कराराने किंवा सहमतीने बांधलेले आहेत काय याला महत्त्व नाही. मला तर यात कोणतेसद्धा अंतर वाटत नाही.

मी माझी भूमिका थोडक्यात सांगतो. माझ्याकरिता एक गोष्ट आणि केवळ एक गोष्ट तर्कसंगत आणि सुसंगत आहे ती म्हणजे मित्र राष्ट्रांचा विजय जर सुनिश्चित करायचा असेल तर या महान राष्ट्राचे - हे ना तर राष्ट्रे आहे ना विविध वंशाचे वा समुदायाचे लोक आहेत - अस्वाभाविक पद्धतीने जे खच्चीकरण केले जात आहे ते थांबवले पाहिजे. मित्र राष्ट्रांजवळ नैतिक अधिष्ठान नाही. फासीवादी शक्ती, नाझी, आणि मित्र राष्ट्रे यांच्यात मला कोणतेही अंतर दिसत नाही. सर्व शोषक आहेत, आपला हेतू साध्य करण्याकरिता ते कोणत्याही टोकाला जाऊन क्रूरपणा करू शकतात. अमेरिका आणि ब्रिटन ही महान राष्ट्रे आहेत, परंतु आशिया वा आफ्रिकेच्या मूक मानवतेच्या न्यायासनासमोर त्यांना उभे केले तर त्यांची महत्ता धुळीला मिळेल. त्यांच्यात आणि केवळ त्यांच्यातच हा अन्याय दूर करण्याची क्षमता आहे. ते जोपर्यंत या घाणीने बरबटलेले हात धुऊन स्वच्छ करत नाहीत तोपर्यंत त्यांना मानवी स्वातंत्र्याबद्दल बोलण्याचा कोणताही अधिकार नाही. शोषणाच्या घाणीने भरलेले आपले हात स्वच्छ धुण्यातच त्यांच्या विजयाची निश्चिती आहे. असे केले तर आशियायी आणि आफ्रिकी देशातील मूक लोकांच्या सदिच्छा त्यांना मिळतील. त्या सदिच्छा त्यांना अभिव्यक्त कदाचित करता येणार नाहीत, पण त्या असतील निश्चित. मग, आणि मगच, त्याआधी नाही, ते नवीन व्यवस्थेकरिता लढत असतील. हे वास्तव आहे. बाकी सर्व अंदाज आहेत. असे असले तरी आतापर्यंत मी यात भाग घेतला कारण मला माझा हेतू प्रामाणिकपणा तपासून पाहायचा होता आणि माझ्या प्रस्तावाचा काय अर्थ आहे हे मला नीट शब्दांत सांगायचे होते.

(ही प्रश्नोत्तरे जून १४, १९४२ च्या हरिजनमध्ये प्रकाशित झाली होती.)

तू अप्टन सिंक्लेअरना ओळखतोस काय असे गांधींनी आज जेवणाच्या वेळी मला विचारले. सिंक्लेअर काय करतात हे जाणून घेण्याची त्यांना इच्छा होती. ते म्हणाले की मला अधूनमधून सिंक्लेअरची पुस्तके मिळत असतात, परंतु मला वाचायला क्वचितच वेळ मिळत असतो. आमचा एकमेकांशी पत्रव्यवहार झाला आहे. अमेरिकेतील जनतेच्या सामाजिक विचारांवर सिंक्लेअरचा भरपूर प्रभाव असावा असे त्यांना वाटत होते.

गांधींचे माझ्या खाण्याकडे लक्ष होते. नंतर ते म्हणाले, “तुला माझ्या भाज्या अजूनही आवडत नाही?”

माझे तुमच्याशी माणूस म्हणून, पुढारी म्हणून आणि मुत्सद्दी म्हणूनही मतभेद आहेत, परंतु स्वयंपाकी म्हणून नाही. सेवाग्राममधील प्रत्येक जेवणात असताना या खाणावळीत मला दरवेळी पालकाचा रस्सा आणि स्क्वॅश वाढण्यात आले आहेत, आणि आता मला त्यांचा अगदी वीट आला आहे.

त्यांनी मला माझ्या दोन मुलांबद्दल विचारले. यावरून ते माझे “मेन एँड पॉलटिक्स” हे पुस्तक चाळत असावे असे मला वाटले. काही मांजरी आल्या आणि त्या अन्नाने भरलेली स्वयंपाकाची भाडी असलेल्या टेबलखाली खेळू लागल्या. मी गांधींना म्हणालो, “१९३८साली मी श्रीयुत लॉईड जॉर्ज यांची चर्ट येथे भेट घेतली होती आणि त्यांनी मला तुमच्याबद्दल सांगितले होते.”

गां. -“असं काय? काय म्हणाले ते?”

“ते म्हणाले की चर्ट येथे आल्यानंतर तुम्ही सोफ्यावर मांडी घालून बसला होता आणि तेवढ्यात कधीही न आलेली एक काळी मांजर खिडकीतून आली आणि तुमच्या मांडीवर बसून ती आराम करू लागली.”

“हे बरोबर आहे.”

आणि तुम्ही गेल्यानंतर लॉईड जॉर्ज म्हणाले, “ती मांजर अदृश्य झाली आणि परत कधीही आली नाही.”

गांधी म्हणाले, “अरे, हे तर मला माहीतच नव्हते.”

मी पुढे म्हणालो, “कुमारी स्लेड जेव्हा चर्टला आल्या तेव्हाच ती मांजर परत आली होती.”

गांधी म्हणाले, “हेसुद्धा मला माहीत नव्हते.” लॉईड जॉर्जबद्दल ते अतिशय आदराने बोलले.

मी त्यांना सांगितले की लॉईड जॉर्जनी मला एकदा सिगार की सिगारेट दिली असता मी सिगारेट ओढत नसतो असे त्यांना सांगितले. त्यानंतर त्यांनी माझ्यासमोर मद्याचा पेग ठेवला. तेव्हाही मी मद्य घेत नसतो असे त्यांना सांगितले. त्यावर ते म्हणाले, “म्हणजे तुम्हाला कोणतेही व्यसन नाही!”

“दिसावे असे कोणतेही नाही.”

मला दिसतात ती आणि दिसत नाही ती अशी सर्व व्यसने आहेत आणि म्हणूनच पंचाहत्तराव्या वर्षीसुद्धा माझी प्रकृती इतकी ठणठणीत आहे. गांधी दीर्घ काळ खळखळून हसत होते.

मग मी गांधींना सांगितले की लॉईड जॉर्जबरोबर जेवण केल्यानंतर घरातील अरुंद वाटेने आम्ही परत बैठकीच्या खोलीत गेलो. तिथे फ्रांसमधील ग्रेट ब्रिटनचे सेनाप्रमुख सेनापती हेग यांचा मोठा केलेला एक फोटो होता. लॉईड जॉर्जनी मला सेनापटी हेग यांच्या पायातील जोडे दाखवले आणि म्हणाले, “यातून हेगचे चातूर्य दिसते.”

गांधी परत हसले. त्यांनी मला विचारले, “लॉईड जॉर्जचे चर्चिलबद्दल काय मत होते?”

लुई फिशर - लॉईड जॉर्जना मी परत जेव्हा १९४१ च्या उन्हाळ्यात भेटलो तेव्हा मी त्यांना हा प्रश्न विचारला होता. मी त्यांना विचारले होते की चर्चिलमध्ये साहसीवृत्ती का नाही? त्यांची जोखीम पत्करण्याची तयारी का नसते? लॉईड जॉर्जनी एकाच शब्दात उत्तर दिले - फालतूचा साहसीपणा (Gllipoli)! जोखीम पत्करण्याच्या चर्चिलच्या अतिरेकी सवयींमुळे त्यांचा जखीम पत्करण्यातील रसच निघून गेला आहे.

गांधी म्हणाले की एका सकाळी आमच्या चर्चेनंतर आम्ही त्याच दिवशी परत सायंकाळी भेटलो होतो, कारण त्यांच्याकरिता तीच वेळ सोयीची होती. लॉईड जॉर्जनी मला अभिवादन करण्याकरिता घरातील सर्व नोकरचाकरांना बोलावले होते.

कालची वर्तमानपत्रे वाचल्यानंतर मी रात्री आठ वाजता झोपायला गेलो. वर्तमानपत्रे वाचण्यात इथे कोणालाही विशेष रस नाही आणि सेवाग्राममध्ये एकही रेडिओ नव्हता. नेहरूंसारखे काही सन्माननीय अपवाद जरी असले तरी सामान्यपणे हिंदुस्थानी आपल्या देशातच राहतात. युद्ध आणि बाहेरचे जग त्यांच्यापासून फार दूर असते. ब्रिटिश राज्याचा हा एक तोटा आहे. हिंदुस्थानी ब्रिटन आधी पाहतात आणि हे चित्र त्याच्या डोळ्याच्या इतके काही भरलेले असते की मग ते डोळे मिटून घेतात. त्यामुळे त्यांना उर्वरित जग आणि युद्धात काय सुरू आहे हे जाणून घेण्याची इच्छाच नसते. मी दीर्घ झोप घेतली. रात्र शीतल आणि थकवा नाहिसा करून तरतरी आणणारी होती. डोक्यावर एक चतुर्थांश चंद्र आणि दुधाळ आकाशगंगा दिसत होती.

## जून ७, १९४२

काल कनो गांधींनी, गांधींच्या पुतण्याने जे फोटो घेतले ते फिल्म जुनाट असल्यामुळे चांगले आले नाही. यामुळे आज अगदी सकाळीच मी परत दाढी केली आणि गांधींच्या घराकडे निघालो. मी त्यांना परत खोलगट वाडग्यातून आंब्याचा रस खाताना आणि त्यांची बायको त्यांना पंख्याने हवा घालतअसताना पाहिले.

तुझी झोप कशी झाली असे गांधींनी मला विचारले. मी सांगितले मला छान झोप लागली आणि मग मी त्यांना विचारले की तुमची झोप कशी झाली. ते म्हणाले की मी सामान्यपणे ९.३० ते ४.३० पर्यंत झोपत असतो.

मी विचारले, “मध्ये खंड न पडता?”

गां. - नाही, दोनतीव वेळा अगदी थोड्यावेळेकरिता मला जाग येते. परंतु झोप लागायला मला त्रास होत नाही. आणि शिवाय मी दररोज दुपारी अर्ध तास झोपतो.

मी त्यांना सांगितले की चर्चिलही असेच करत असतात.

गां. - मी ऐकले आहे की युरोपमध्ये ही प्रथा अधिकाधिक रूढ होऊ लागली आहे. विशेषतः म्हातारपणात हे फार महत्त्वाचे असते.

मी त्यांना सांगितले की रुझवेल्टना अंरुणावर पडल्याबरोबर झोप येते असे मी त्यांच्याबद्दल ऐकले आहे. गांधींनी रुझवेल्टच्या प्रकृतीबद्दल चौकशी केली आणि मग त्यांनी मला श्रीमती रुझवेल्टचे वर्णन करण्याकरिता सांगितले.

गां.. - म्हणजे त्यांचा अमेरिकेच्या राजकारणावर प्रभाव असला पाहिजे?

नवीन धोरणाच्या (न्यू डील) अंतर्गत (अमेरिकेला आर्थिक मंदीतून सावरण्याकरिता आणि तिच्या डळमळीत आर्थिक-सामाजिक व्यवस्थेला सुदृढ करण्याकरिता अवंलंबिण्यात आलेले धोरण.) सामाजिक कायदे, कामगार संघटना आणि सामाजिक विचारांसंबंधी मी त्यांना समजून सांगण्याचा प्रयत्न केला. अमेरिकी सरकार विदेशी सरकारांना आणि आंतरिक युद्धसाहित्य तयार करणाऱ्या उद्योगांना आर्थिक मदत करत असल्याबद्दलही मी त्यांना जोर देऊन सांगितले. या आर्थिक मदतीची तुलना मी पहिल्या महायुद्धाच्या वेळी विदेशी सरकारांना आणि खाजगी उद्योगांना अमेरिकी जी मदत करत होते तिच्याशी केली.

गां - निग्रोंबद्दल काय?

मी त्यांना उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील निग्रोंबद्दल सांगितले. मी त्यांना सांगितले की निग्रोंना देण्यात येत असलेल्या वागणुकीचे मी समर्थन करू शकत नाही, परंतु हिंदुस्थानातील अस्पृश्यतेइतकी ती क्रूर नाही.

गां. - तुला माहीतच आहे की अस्पृश्यतेच्या विरोधात मी अनेक वर्षांपासून लढा देत आहे. आमच्या या आश्रमात अनेक अस्पृश्य आहेत. आश्रमातील बहुतेक काम अस्पृश्य करत असतात आणि कोणीही हिंदू सेवाग्रामला आला तर त्याने अस्पृश्याच्या हातचे अन्न खाल्लेच पाहिजे आणि त्याच्या सहवासात राहिले पाहिजे असा नियम आहे.

अस्पृश्यांबद्दल केल्या जाणाऱ्या भेदभावात काही प्रमाणात सुधारणा झाली काय म्हणून मी त्यांना विचारले.

गां. - हो, झाली आहे, परंतु तरीही परिस्थिती फार वाईट आहे.

खुरशेद आली आणि ती हिंदुस्थानीत काही तरी म्हणाली, त्यामुळे त्यांना हसू आले. ती काय म्हणाली म्हणून मी त्यांना विचारले आणि ती काय म्हणाली होती ते तिने मला सांगितले. मी तुमच्या पाया पडते असे ती त्यांना म्हणाली होती. हे तर व्हिएन्नामधील माणसांसारखे झाले. “मी तुमच्या हाताचे चुंबन घेतो असे ते म्हणतात पण चुंबन घेत नाहीत.” गांधींना हसू आले. गांधी उभे राहताच तिथे एकदम दोन मुले आली. गांधींना त्यांच्या खांद्यावर हात ठेवून चालता येईल अशा प्रकारे ते उभे राहिले. या सन्मानाकरिता किती तरी लोकांमध्ये स्पर्धा असायची. एका सायंकाळी आम्ही फिरून परतलो तेव्हा एक मुलगी आमच्या गटाला भेटण्याकरिता आपल्या खेड्यातून आली. तिने मोठ्या कौशल्याने असे काही केले की गांधींच्या बाजूला असलेल्या इतर मुलींना बाजूला सरकावे लागले आणि त्या मुलीला बरोबर गांधींच्या बाजूला जागा मिळाली.

लु. फि. - मी परत अस्पृश्यतेच्या विषयाकडे वळलो. ते दररोजप्रमाणे फिरायला निघताच मी म्हणालो, “वरदाचारीसारखे (हिंदुस्थानच्या सर्वोच्च न्यायालयाचे एक न्यायाधीश. ते उच्च जातीचे ब्राह्मण होते.) अतिशय विचारवंत आणि एरव्ही पुरोगामी विचार असलेले लोकही माझ्याशी झालेल्या चर्चेत अस्पृश्यतेच्या प्रथेचे समर्थन करत होते; स्पष्ट आहे की याचे मूळ पुनर्जन्माच्या विश्वासात आहे, आणि तो निश्चितच हिंदू धर्माचा भाग आहे असे त्याना वाटते.

आत्मा एका देहाचा त्याग करून दुसऱ्या देहात जातो यावर तुमचा विश्वास आहे?

गां. - लगेच त्यांनी उत्तर दिले, "अर्थातच आहे. शरीराबरोबर आत्मा मरतो यावर माझा विश्वास नाही. माणसाचे घर जेव्हा नष्ट होते तेव्हा तो नवीन घर तयार करतो. जेव्हा आत्म्याचा देह घेतला जातो तेव्हा तो नवीन देह धारण करतो. देहाचे जेव्हा भूमीत दफन वा दहन केले जाते तेव्हा आत्मा आपल्या अपराधाची कबुली देण्याकरिता न्यायदिवसांपर्यंत वाट पाहत असतो हेसुद्धा मला मान्य नाही, तो ताबडतोब नवीन घर शोधतो.

लु. फि. - हेच ते कारण आहे. मला माहीत आहे की हा युक्तिवादाचा विषय नाही. माझा यासंबंधी काय दृष्टिकोन आहे ते सांगायची मला इच्छा झाली म्हणून मी सांगितले. "मला वाटते की आपण सर्व अमरत्वाकरिता जी धडपड करत असतो तिचेच हे एक वेगळे रूप आहे. दुबळ्या मर्त्य माणसाला मृत्यूची जी भीती वाटते तिच्यातूनच ही कल्पना उद्भवली नाही काय? टॉलस्टॉय जोपर्यंत वार्धक्यावस्थेत पोहोचले नाही तोपर्यंत त्यांना मृत्यूची भीती वाटत नव्हती, आणि ते अधार्मिक होते.

गां. - मला मृत्यूची भीती वाटत नाही. मी तर त्याच्याकडे सुटका आणि समाधानाची गोष्ट म्हणूनच पाहतो. परंतु तोच अंत आहे असा विचार मी करू शकत नाही. माझ्याजवळ पुरावा नाही. देहाच्या मृत्यूनंतर आत्म्याने नवीन घर शोधले असे सिद्ध करण्याचा लोकांनी प्रयत्न केला आहे. ही गोष्ट सिद्ध करता येऊ शकते असे मला वाटत नाही. परंतु माझा त्यावर विश्वास आहे.

लु. फि. - मला वाटते की आपणा सर्वांना अमरत्व पाहिजे, काहीच लोकांना वाटते की आपण आपल्या मुलांच्या माध्यमातून वा आपण केलेल्या कामाच्या माध्यमातून जगत असतो, आणि काहींना वाटते की आपण देह बदलवून वेगळ्या स्वरूपात एखाद्या प्राण्यात जगतो वा इतर कोणत्या तरी प्रकारे जगतो. काही लोक दीर्घ काळ जगतात कारण त्यांचे काम दीर्घकाळ टिकते, परंतु माझा विश्वास आहे की अमरत्वावरील विश्वास - जर माणसाच्या आचरणापेक्षा तो वेगळा काही असेल तर - मला वाटते की तो मृत्यूच्या भीतीचाच एक प्रकार असून माणूस त्या भ्रमात राहून समाधान मिळवण्याचा प्रयत्न करतो.

यावर गांधींनी आपले विचार अतिशय भावनापूर्ण भाषेत आणि प्रवाही इंग्रजी गद्यात मांडले; त्यांची इंग्रजी नेहमीच संपन्न आणि प्रवाही असायची आणि तिचे उच्चार ब्रिटिश इंग्रजी पद्धतीचे असत.

लु. फि. - मी त्यांना सांगितले की उच्चवर्णीय हिंदू आणि अस्पृश्य यांच्यात वा हिंदू आणि मुसलमानात भेद करण्याकडे हिंदुस्थानातील नव्या पिढीचा म्हणजे विद्यार्थ्यांचा कल फार कमी आहे तसेच त्यांना धर्मातही रस कमी आहे असल्याचे विद्यार्थ्यांनी मला सांगितले आहे.

गां. - पहिली गोष्ट बरोबर आहे. परंतु हिंदुत्व धर्म नाही. विद्यार्थी धार्मिक कर्मकांड करत नाहीत. परंतु हिंदुत्व जीवन आहे. ती एक जीवनपद्धती आहे. धर्माच्या कर्मकांडांचे पालन न करणाऱ्या काही लोकांपेक्षाही असे जीवन जगणारे या जीवनपद्धतीच्या जवळ असू शकतात.

ते पुढे म्हणाले की अस्पृश्यतेच्या मला खोलवर वेदना होतात आणि हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याने अस्पृश्यतेची ही समस्या अधिक जलद गतीने सुटू शकेल अशी मला आशा आहे. यामुळे ते परत आपल्या आवडत्या विषयाकडे वळले. त्यांनी  दिलेल्या 'आव्हाना'बद्दल ते म्हणाले की "ब्रिटिशांना मी जे "चले जाव" म्हणून मी सांगितले ते एक आव्हानच आहे. ते निघून गेले तर ते शुद्ध होतील आणि नवीन जग घडवण्याकरिता ते अधिक पात्र ठरतील. जर असे झाले नाही तर त्यांच्या सर्व घोषणा पाखंडीपणाच ठरतील." एव्हाना आम्ही गांधींच्या झोपडीजवळ पोहोचलो होतो आणि मी गांधींचा निरोप घेतला

समाजवादी पुढारी नरेंद्र देव हे गांधींच्या घराजवळीलच एका लहानशा खोलीत राहत होते. ते आणि धिप्पाड सिलोनी आर्यनायकम आज सकाळी परत विश्रांतीगृहात आले आणि बराच काळ थांबले. फासीवाद आणि साम्राज्यवादवर आमची गरमागरम चर्चा झाली. ते म्हणाले की हिंदुस्थानात ब्रिटिशांच्या फासीवादाचा नेहमीच सामना करावा लागत असतो, परंतु जर्मनीतील फासीवाद कसा आहे आहे याचा आम्हाला ना तर अनुभव आहे ना त्याबद्दल आम्हाला फारशी माहिती आहे. हं, हुशार लोकांना मात्र नाझीवाद किती भयानक आहे ते माहीत आहे, परंतु लोकांना मात्र माहीत नाही. "प्रिंस ऑफ वेल्स" आणि "रिपल्स" ही जहाजे बुडवण्यात आल्यामुळ लोक मात्र प्रभावित झाले आहेत. नौदल हे नेहमीच हिंदुस्थानातील ब्रिटिश सत्तेचा आधार राहिलेले आहे. ब्रिटिशांचे दूरपूर्वेत जे कोणते सैनिकी पराभव झाले आहेत त्यामुळे जनता प्रभावित झाली आहे. आर्यनायकम म्हणाले की जपानचे जीवावर उदार झालेले वैमानिक आपले विमान सरळ ब्रिटिशांच्या नौदलातील जहाजावर घालतात. परंतु ब्रिटिशांमध्ये असे काही करण्याची क्षमता नाही. मी त्यांना सांगितले की ब्रिटिशाजवळसुद्धा असे जिवावर उदार झालेले वैमानिक आहेत. त्यावर ते म्हणाले की आम्ही कधी असे ऐकले नाही. मी त्यांना आर. ए. एफ.च्या स्वर्डफिश वैमानिकांची आठवण करून दिली. त्यांनी नुकताच "जिनाऊशिनाऊ" आणि "शरनहॉर्स्ट" या या दोन जर्मन युद्धनौका बुडवल्या होत्या. या युद्धनौकांनी इतक्यातच इंग्लिश चॅनेलवर यशस्वी हल्ला केला होता. मी स्पष्ट करत म्हणालो की जपानी वैमानिक ज्याप्रमाणे मृत्यूच्या वेदीवर उभे राहायला घाबरत नव्हते त्याचप्रमाणे हे वैमानिकही मृत्यूच्या वेदीवर सहजपणे

उभे राहू शकणारे होते. जगातील सर्वच सैन्यात असे नरवीर असतात. आणि लोकशाहीवादी राष्ट्रांच्या अशा वीर पुरुषांमध्ये काही उणीव आहे असे म्हणण्याकरिता काही कारण आहे असे मला वाटत नाही.

आमच्या संभाषणाच्या अखेरीस मी सुचवले की फासीविरोधी हिंदुस्थानींना दोन पातळ्यांवर लढावे लागेल - पहिले धुरी राष्ट्रांविरुद्ध आणि दुसरे ब्रिटिश साम्राज्यवादाविरुद्ध. माझ्याकडे आलेले पाहुणे म्हणाले की आम्ही दोन तर सोडाच एकाही शत्रूशी लढाई करू शकत नाही.

देव म्हणाले की "आमच्याजवळ शस्त्र नाहीत. यामुळे जपानविरुद्ध आघाडीवर आम्ही लढू शकत नाही. ब्रिटिशांनी जाणूनबुजून आम्हाला निःशस्त्र केले आहे. तसेच ज्या ब्रिटिशांनी आम्हाला सदैव दाबून ठेवले, ज्यांनी आम्हाला निःशस्त्र केले आणि ज्यांनी आम्हाला स्वातंत्र्य देण्याला नकार दिला त्यांच्याबाजूने आम्ही लढू शकत नाही.

डॉ. दासच्या पुतणीला सहा वर्षांचा एक गोड लहान मुलगा आहे. तो विश्रांतीगृहाच्या आजूबाजूलाच खेळत असतो. तो इंग्रजीचे काही शब्द बोलू शकतो. तू तुझ्या सवंगड्यांशी कोणत्या भाषेत बोलतो असे मी त्याला विचारले.

तो म्हणाला की मी त्यांच्याशी बंगालीत बोलतो, पण मला हिंदी आणि गुजरातीही येते.

आश्रमातील बहुतेक मुलांना दोन वा तीन भाषा येत होत्या.

देव आणि आर्यनायकम गेल्यानंतर थोड्याच वेळात माझ्याकडे एक हिंजू राजा आले. त्यांनी एका फ्रेंच स्त्रीशी विवाह केला होता. ते किती तरी वर्ष फ्रांसमध्ये राहिलेले होते आणि त्यांची फ्रेंच इंग्रजीपेक्षाही चांगली होती. त्यांचा चेहरा एखाद्या नटासारखा सुंदर होता. त्यांचे दोन्ही बाजूचे कल्ले आणि मोठ्या धनुष्याकृती भुवया उठावदार होत्या आणि त्यांच्या काळ्या उठावदार डोळ्यांना त्या शोभून दिसत होत्या. आपल्या आत्म्याचे नूतनीकरण करण्याकरिता ते आश्रमात अनेक महिने राहणार होते. त्यांचे पालनपोषण हिंदुस्थानातील मुसलमानांनी केले होते आणि एका मुसलमानी शाळेत ते शिकले होते. ते म्हणाले मुसलमान हिंदूपेक्षा अधिक ओजस्वी, चैतन्यशाली आणि क्रांतिकारक असतात. ते म्हणाले की हिंदुस्थानातील निम्मे साम्यवादी मुसलमान आहेत. हिंदुस्थानचे सर्वोत्तम कवी मुसलमान आहेत. त्यांचे म्हणणे होते की हिंदू नम्र आहेत आणि त्यांच्यात कल्पनाशक्तीचा अभाव आहे. मी त्यांना विचारले की हिंदू आणि मुसलमान एकाच वंशाचे असताना त्यांच्या व्यक्तिमत्वात इतके अंतर का. "असे अन्नामुळे तर होत नाही?" त्यांचे म्हणणे होते की जीवनाकडे पाहण्याच्या

भिन्न दृष्टिकोनामुळे असे होते. मुसलमान जीवनाचा खराखुरा आनंद घेतात. हा फरक अन्नामुळे नाही. उत्तर हिंदुस्थानात अनेक हिंदू मांसाहार करतात. मुसलमान डुकराचे मांस खात नाहीत पण गोमांस खातात. हिंदू चिंतनशील आहेत, त्यांची स्मरणशक्ती चांगली आहे. ते चांगले व्यावसायिक आहेत. परंतु तुम्हाला जर वेळ चांगला घालवायचा असेल आणि चांगले खायचे असेल, चांगले नृत्य करायचे असेल, पोहायचे असेल तर मुसलमानाला शोधा असा सल्ला मी देईन.

जेवणाच्या वेळी गांधी फार खुशीच्या मनःस्थितीत होते. ते जेवणघरात आले आणि त्यांची नजर दोनतीन वर्षांच्या दोन गोड मुलांकडे गेली. प्रवेशद्वाराशीच ते जमिनीवर बसलेले होते आणि शांतपणे वाढले जाण्याची वाट पाहत होते. जेवायला बसण्यापूर्वी जो कोणी जवळ असेल त्याच्याशी गांधींनी काही थट्टाविनोद केला आणि त्यांना चेहऱ्यावर हास्य फुलवून त्यांना खुश केले. जेवण सुरू असताना गांधींनी मला बॅटलक्रीक, मिशिगन येथील डॉ. केलॉगना तू ओळखतो काय असे मला विचारले. मी म्हणालो की मला केलॉग फुड कंपनी माहीत आहे परंतु डॉ. केलॉग माहीत नाहीत. गांधी आठवण करत म्हणाले की त्यांचा डॉ. केलॉगशी आहारविषयक प्रश्नासंबंधी काही पत्रव्यवहार झाला होता. गांधी म्हणाले, “परंतु असे बरेचदा होत असते. काही लोकांना गावातील लोकापेक्षा बाहेरचे लोक अधिक चांगले ओळखत असतात. लेपजिंगमध्ये कुन्हे नावाचे एक आहारशास्त्रज्ञ होते. किती तरी वर्षांपूर्वी त्यांच्या पुस्तकांचे जर्मन भाषेतून हिंदुस्थानातील अनेक भाषांमध्ये अनुवाद झाले होते आणि त्याच्या शेकडो आवृत्त्या निघाल्या होत्या. परंतु कुन्हेंचा शोध घेण्याकरिता मी जेव्हा माझ्या मित्राला लेपजिंग येथे पाठवले तेव्हा मोठ्या मुश्किलीने कुन्हेंचा एक मुलगा सापडला. कुन्हे वारलेले होते.”

आश्रमात तुला पुरेसे अन्न मिळते की नाही असे गांधींनी मला विचारले. मी म्हणालो, “मला कधीही उपाशी राहावे लागत नाही. परंतु आहारात वेगळेपणा नसतो ही गोष्ट मला अखरते. तसेच जेवणात डोळ्यांना आणि चवीला फार महत्त्व असते. मला इतक्या दिवसात इथे जे जे जेवण मिळाले ते अगदी सारखे होते.” मी तक्रार करत म्हणालो, “त्यात पूर्णपणे तोच तोपणा होता. स्वयंपाकी म्हणून मी तुमच्यावर जाहीर हल्ला करणार आहे.“

तेवढ्यातच पांढरा शुभ्र हातकताईचा पोषाख करून हसतमुख चेहऱ्याने जवाहरलाल नेहरू जेवणघरात आले. ते फार सुंदर होते. प्रत्येकजण त्यांच्यावर किती प्रेम करत होता हे कोणालाही स्पष्ट दिसू शकत होते. ते माझ्या बाजूला जमिनीवर बसले आणि हिंदुस्थानी अन्न हिंदुस्थानी पद्धतीने आपल्या बोटांनी

खाऊ लागले. जेवण सुरू असतानाच आम्ही एकदा पॅरीसमधील नावाजलेल्या एका हॉटेलमध्ये घेतलेल्या जेवणाची मला आठवण झाल्याशिवाय राहिली नाही. जेवणापूर्वी गांधीशी नेहरूंच्या थोड्याशा गप्पागोष्टी झाल्या. क्षणातच गांधी माझ्याकडे वळले आणि म्हणाले - मला उद्या जवाहरलालशी बोलता यावे म्हणून मी माझे मौन सोमवारी दिवसभर ठेवणार नाही, मी वेळ बदलणार आहे. आणि म्हणून उद्याऐवजी आज दुपारीच मौन सुरू करण्याचा माझा विचार आहे. परंतु असे केल्याने मला गांधींनी जो दररोज दुपारी एक तास मुलाखतीकरिता दिला होता तो रद्द करावा लागणार होता. तसे होऊ नये म्हणून त्यांनी दुपारी दोन वाजून चाळीस मिनिटांनी मौन सुरू करायचे ठरवले आणि माझ्या मुलाखतीचा वेळ दुपारी दीड ते अडीच वाजताची ठरवली.

जेवणानंतर नेहरू आणि मी विश्रांतीगृहात दोन वेगवेगळ्या खाटांवर बसलो. तेसुद्धा त्याच विश्रामगृहात थांबले होते. आम्ही तासेकभर जगातील सर्वच विषयांवर गप्पा मारल्या. एका विषयावर ते म्हणाले, “जगात जे काही तिरस्करणीय आहे ते सर्व हिंदुस्थानात आहे आणि जगात जे काही उदात्त आहे तेसुद्धा हिंदुस्थानात आहे. तुम्हाला हवे असेल ते तुम्ही घेऊ शकता.”

“नाही, तुम्हीच दोन्ही घ्या.”

नेहरूंनी मला गांधींबरोबरच्या एक तासाच्या मुलाखतीकरिता साडेबाराच्या दरम्यान सोडले. मुलाखतीकरिता मी जेव्हा साडेबारा वाजता गांधींच्या झोपडीत पोहोचलो तेव्हा नेहरू तिथे जमिनीवर बसलेले होते. ते नाराज दिसत होते. मी त्यांच्या बाजूला बसलो. नेहमीच्या “आता?” या शब्दाने गांधींनी मला प्रश्न विचारण्याकरिता आमंत्रित केले.

ब्रिटिश कायदा आणि ब्रिटिश राजकीय रीतिरिवाजानुसार ब्रिटिश संसद आणि राजा यांच्याकडे सत्तेचे फार केंद्रीकरण झालेले असले पाहिजे. उलट अमेरिकेची राजकीय संकल्पना संघराज्यावर आधारलेली आहे. मी विचारले, “हिंदुस्थानातील विविधता पाहिली तर तुम्हाला संस्थानिक आणि मुसलमानांचेही समाधान करू शकेल असे संघराज्य पाहिजे असे तुम्हाला वाटत नाही काय?”

गां. - कोणती व्यवस्था आमच्याकरिता अधिक चांगली राहील हे मी सांगू शकत नाही. आधी ब्रिटिशांनी जायला पाहिजे. आम्ही नंतर काय करू हा केवळ अंदाजाचा प्रश्न आहे. ज्या क्षणी ब्रिटिश जातील त्याक्षणी धार्मिक अल्पसंख्याकांचा प्रश्न नाहीसा होईल. ब्रिटिश गेले आणि इथे गोंधळ माजला तर या गोंधळातून

अखेरीस कोणते रूप बाहेर पडेल हे मी सांगू शकत नाही. तुम्हाला काय पसंत आहे असे जर मला कोणी विचारले तर मी म्हणेन की संघराज्य, केंद्रीकरण नाही. कोणत्या तरी प्रकारची संघराज्य व्यवस्था येणे भाग आहे. परंतु आमच्याकडे संघराज्य राहील की अजून काही या प्रश्नाने मी अस्वस्थ होत नाही. एवढ्या उत्तराने तुमचे समाधान झाले पाहिजे. पोलादी साच्यात ढाळलेला तुमचा मेंदू कदाचित याची चेष्टा करील. तुम्ही कदाचित असा विचार करत असाल की या करोडो निःशस्त्र लोकांना शतकांपासूनच्या विदेशी शासनाची सवय झालेली आहे. अशा या लोकांच्या बळावर मी जो सविनय आज्ञाभंग आंदोलन सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे त्यात मला यश मिळणार नाही.

लु. फि. - नाही, मी असा विचार करून राहिलेलो नाही. माझे वेगळे मत आहे. माझा विश्वास आहे की इतिहास वेगात पुढे चालला आहे आणि चीनप्रमाणे तुम्हीही लवकरच स्वतंत्र देश होणार आहा. वर्षांपूर्वी तुम्ही सुरू केलेल्या या संघर्षाचा वेगळा काही अंत होऊच शकत नाही.

गां. - मला चीनसारखे स्वतंत्र्य नको. च्यांग काई शेक असूनही चीन आज असहाय आहे. असे असले तरी चीनची आपले शौर्य आणि सर्व काही या युद्धात पणाला लावण्याची तयारी असूनही चीन अजून पूर्णपणे स्वतंत्र झालेला नाही. चीनमध्ये ब्रिटन आणि अमेरिकेला सांगण्याची हिंमत असली पाहिजे की आमच्या स्वातंत्र्याचा लढा आम्ही तुमच्या मदतीशिवाय एकट्याने लढू.' याला मी स्वातंत्र्य म्हणेन.

मी त्यांना विचारले, तुमची च्यांगबरोबर जी दीर्घ मुलाखत झाली ती कशी राहिली?

गां. - फार चांगली.

लुई फिशर स्मित करत म्हणाले, "इतकेच की तुम्ही त्यांना समजून घेऊ शकला नाही आणि ते तुम्हाला समजून घेऊ शकले नाही."

गां - मला ते गूढ वाटले. कदाचित भाषेमुळे तसे झाले असावे. आम्ही मॅडम च्यांग यांच्या माध्यमातून बोललो. परंतु केवळ तेच कारण आहे असे मला वाटत नाही.

लु. फि. - चीन अर्थातच पूर्णपणे स्वतंत्र नाही, परंतु स्वातंत्र्य एका दिवसात येत नसते. या युद्धाच्या माध्यमातून, जर आम्ही हे युद्ध जिंकले तर, चीन स्वतंत्र होईल. आम्ही आशियायी कदाचित शतकाकडे वााटचाल करत असू. येत्या काही दशकात हिंदुस्थान आणि चीन इतिहासाला बराच काही आकार देतील. परंतु ब्रिटिशांना याची जाणीव झालेली असल्याचे मला कोणतेही चिन्ह दिसत नाही. तुम्ही म्हणता तसे ते

जाणार नाहीत. ते जर त्यांच्या शस्त्राने सिंगापूर आणि मलेशियात स्वतःला वाचवू शकले नाही तर स्वतःच्या बुद्धीने ते हिंदुस्थानातही स्वतःला वाचवू शकणार नाहीत.

गांधी स्पष्ट करत म्हणाले, "तुम्ही लक्षात ठेवा की मी चीनवर टीका करून राहिलेलो नाही. चीनचे अनुकरण करण्याचीही मला इच्छा नाही. मला केवळ इतक्याच गोष्टीवर भर द्यायचा आहे. चीनची ही जी परिस्थिती झाली आहे असे म्हणतात ती हिंदुस्थानचीही व्हावी अशी माझी इच्छा नाही. म्हणूनच ब्रिटिश आणि अमेरिकी सैनिक इथे नको असे माझे म्हणणे आहे. मला जपानी आणि जर्मन सैनिकही इथे नको आहेत. जपानी दररोज रेडिओवरून प्रसारित करत असतात की आम्हाला हिंदुस्थानला ठेवून घेण्याची इच्छा नाही, स्वातंत्र्य मिळावण्याकरिता आम्हाला केवळ त्याला मदत करायची आहे. मला त्यांची सहानुभूतीही नको आणि मदतही नको. मला माहीत आहे की ते परोपकारी लोक नाहीत. मला सर्व विदेशी सत्तांच्या प्रभुत्वापासून हिंदुस्थानची मुक्ती हवी आहे. मी अधीर झालो आहे. मी अजून वाट पाहू शकत नाही. आमची परिस्थिती चीन वा पर्शियापेक्षाही वाईट आहे. मी कदाचित काँग्रेसची समजूत घालू शकणार नाही. जे लोक काँग्रेसमध्ये पदाधिकारी आहेत ते कदाचित प्रसंगोचित वागू शकणार नाही. असे असले तरी मी पुढे जाईन आणि सरळ जनतेशी संवाद साधेन. परंतु काहीही जरी झाले तरी आम्ही वाकणार नाही. आम्ही कदाचित अशी नवीन व्यवस्था निर्माण करू की ज्यामुळे संपूर्ण जग स्तंभित होऊन जाईल. मी तुम्हाला म्हणेन की पूर्वग्रह टाकून द्या आणि माझ्या सविनय आज्ञाभंगाच्या आंदोलनाच्या नवयुगात प्रवेश करा आणि त्यात जर काही दोष असतील तर ते शोधण्याचा प्रयत्न करा. मग तुम्ही आमच्या उद्दिष्टाकरिता मदत करू शकाल आणि त्याला अजून उच्च धरातलावर पोहोचवू शकाल, मग तुम्ही लेखक म्हणून स्वतःलाही न्याय करू शकाल. हिंदुस्थानवर जे साहित्य प्रकाशित होत आहे ते क्षुल्लक दर्जाचे आहे. आणि त्याचा कोणताही परिणाम होत नाही. त्यातील बहुतेकात मौलिकता नाही. ते सर्व ओतीव कामासारखे आहे. मी तुम्हाला या  खाईतून प्रयत्नपूर्वक बाहेर पडण्याकरिता सांगेन. माझी इच्छा आहे की तुम्ही माझ्या भाषेच्या आतील अर्थाचा शोध घेऊन मी काय सांगायचा प्रयत्न करतो आहे ते समजून घेण्याचा प्रयत्न करावा. मला माहीत आहे की हे कठीण आहे; तुम्ही इथे ब्रिटिश आणि अमेरिकी संस्कृतीची भव्यता, तेजस्विता आणि शस्त्रशक्ती या सर्वांची मानसिकता घेऊन आला आहा. तुमच्या साच्यात जे नीट बसत नाही वा त्या साच्याच्या दृष्टीने जे वांछनीय नाही त्याचे तुम्हाला आकलन होऊ शकणार नाही हे मी समजू शकतो. परंतु तमचे मन जर त्या मळलेल्या वाटेवरून बाहेर पडू शकत नसेल तर मग तुम्ही सेवाग्राममधील तुमचे दिवस वाया घालवले असेच म्हणावे लागेल ".

थोडा थांबून मी “हो” म्हणालो. त्यांच्या या बोलण्यातील माझ्याकरिता काय आहे आणि नेहरूंकरिता काय हे मी वेगवेगळे करण्याचा प्रयत्न करत होतो. मी म्हणालो, “परंतु तुम्ही ज्या नवीन व्यवस्थेबद्दल बोलत आहा तिचा कवडसा मला दाखवायला तुम्ही मला मदत करू शकाल काय? मला माझ्या नवीन व्यवस्थेची इतकी खात्री नाही की ज्यामुळे मी तुमची नवीन व्यवस्था ताबडतोब झिडकारून टाकेन. मला वाटते की हिंदुस्थान बरेच काही योगदान करू शकतो, परंतु भविष्यकालीन घटनाक्रमाकडे तुम्ही कोणत्या दृष्टीने पाहता?”

गां. - आता सत्ताकेंद्र दिल्लीत वा कलकत्त्यात वा मुंबईत म्हणजे मोठ्या शहरात केंद्रित झाले असल्याचे तुम्हाला दिसेल. मी ते हिंदुस्थानातील सात लाख खेड्यात विकेंद्रित केले असते. याचा अर्थ होईल कोणाचीच सत्ता नाही. वेगळ्या शब्दांत सागायचे तर इंग्लंडच्या इंपेरियल बँकेत आज जे सात लाख डॉलर गुंतवण्यात आले आहेत ते काढून घ्यायचे आणि ते हिंदुस्थानातील सात लाख खेड्यात प्रत्येकी एक एक डॉलर असे वाटून टाकायचे, मग ते गमावले जाण्याचा धोका नाही.

हिंदुस्थानच्या इम्पेरियल बँकेत गुंतवलेले सात लाख डॉलर जपानी विमानाच्या बॉम्ब हल्ल्यात नष्ट होऊ शकतात, उलटपक्षी ते जर सात लाख भागधारकांमध्ये वाटले तर त्या संपत्तीपासून त्यांना कोणीही वंचित करू शकत नाही. मग हे सात लाख घटक परस्परांमध्ये स्वतःहोऊन सहकार्य करतील, नाझीं पद्धतीने प्रेरित केलेले सहकार्य नाही. स्वतःहोऊन केलेल्या या सहकार्यातून खरे स्वातंत्र्य निर्माण होईल आणि ही नवीन व्यवस्था रशियातील नवीन व्यवस्थेपेक्षा किती तरी उच्च दर्जाची असेल. काही लोक म्हणू शकतात की रशियात निर्दयीपणा आहे, परंतु तो निर्दयीपणा अगदी तळाच्या लोकांकरिता आणि गरिबांकरिता करण्यात येतो आणि या कारणाकरिता तो चांगला आहे असे म्हणतात. परंतु माझ्याकरिता त्यात फार कमी चांगले आहे. केव्हा तरी या निर्दयीपणातून अराजक निर्माण होईल, आणि आपण पाहतो त्या अराजकापेक्षाही ते अराजक अधिक वाईट असेल. माझी खात्री आहे की इथे अराजकापासून आपली सुटका होईल. मला मान्य आहे की हिंदुस्थानातील भविष्यकालीन समाज कसा असेल याचे मला आकलन नाही. परंतु मी तुमच्यासमोर ज्या व्यवस्थेची रूपरेषा मांडली आहे ती निश्चितच कधीकाळी अस्तित्वात होती, परंतु तिच्यात दोषही होते यात काही शंका नाही. तसे नसते तर ती मोगल आणि ब्रिटिश येण्यापूर्वीच नाहीशी झाली नसती. तिचे काही भाग टिकाव धरून आहेत आणि ब्रिटिश सत्तेने केलेल्या नासधुसीनंतरही तिची मुळे टिकून आहेत असा विचार मला आवडतो. अंकुरित होण्याची वाट पाहत असलेली ती मुळे आणि तो बुंधा ब्रिटिश सत्ता हिदुस्थानींकडे

हस्तांतरित होण्याच्या स्वरूपातील पावसाच्या पाण्याच्या काही थेंबांची वाट पाहत आहे. ते रोपटे कसे असेल हे मला माहीत नाही. परंतु आपल्याला माहीत आहे त्यापेक्षा ते केव्हाही चांगलेच असेल. दुर्दैवाने अहिंसेचे आवश्यक रूप आज इथे अस्तित्वात नाही, परंतु नवीन व्यवस्था निर्माण करण्याकरिता गत पंचवीस वर्षांपासून जी मेहनत करण्यात आली आहे ती वाया जाणार नाही असा विश्वास मी बाळगतो. त्या नवीन व्यवस्थेला आकार देण्याइतका काँग्रेस पक्षाचा प्रभाव निश्चितच असेल आणि मुस्लिम लीगचाही तितकाच परिणाकारक प्रभाव असेल.

लु. फि. - तुम्ही सात लाख डॉलरची ही जी प्रतिकात्मक कल्पना मांडली ती तुम्ही पुढे न्यावी अशी माझी इच्छा आहे. इंग्लंडच्या इम्पेरियल बँकेतून परत आलेल्या डॉलरचे खेडी काय करतील?

गां. - एक गोष्ट होईल. आज भागधारकांना काहीच परतावा मिळत नाही. मध्यस्थ तो घेऊन जातात. शेतकरी जर आपल्या डॉलरचे मालक असतील तर ते उत्तम वाटेल त्या पद्धतीने त्यांचा उपयोग करतील.

लु. फि. - शेतकरी आपला पैसा जमिनीत गाडून ठेवत असतो.

गां. - ते आपले डॉलर जमिनीत गाडून ठेवणार नाहीत कारण त्यांना जगायचे आहे. ते अधिकोषात जातील, आपल्या स्वतःच्या अधिकोषात आणि त्यांच्या मार्गदर्शनानुसार त्यांना ज्या कारणाकरिता तो पैसा खर्च करणे योग्य वाटेल त्या कारणाकरिता तो ते खर्च करतील. ते मग पवचच्क्की सुरू करतील वा वीज निर्माण करतील वा त्यांना इतर जे काही आवडेल ते करतील. केंद्र सरकार विकसित होईल, परंतु ते जनतेच्या इच्छेप्रमाणे काम करील आणि त्याचे स्वरूप जनतेच्या इच्छेप्रमाणे व्यापक असेल.

लु. फि. - मला वाटते की अशा परिस्थितीत राज्य अधिक उद्योगांची बांधणी करील आणि देशातील उद्योग विकसित करील.

गां. - तुम्ही ब्रिटिश सैन्याशिवाय केंद्र सरकारची कल्पना केली पाहिजे. सैन्याशिवाय ते जर एक राहू शकले तर ही नवीन व्यवस्था असेल. काम करण्यालायक हे उद्दिष्ट आहे. हे काही दिवास्वप्न पाहणे नाही. ते व्यवहार्य आहे. हे उद्दिष्ट मारक नाही. व्यवहार्य आहे.

लु. फि. - मला मान्य आहे. १० वर्षांपूर्वी मी सहमत झालो नसतो, परंतु रशिया आणि इतरत्र आलेल्या अनुभवानंतर मला वाटते की आज जगाला सर्वात मोठा धोका सर्वशक्तीसंपन्न राज्यांचा आहे. यांच्यामुळे व्यक्तिगत स्वातंत्र्य अशक्य होते. स्पष्ट आहे की भांडवलशाही अर्थव्यवस्थेने आर्थिक बाबींमध्ये राज्यांचा

हस्तक्षेप अजून आणि अजून आवश्यक झाला आहे. त्यामुळे राज्याला अधिक सत्ता मिळते. पुढील पिढीची खरी समस्या अशा राज्यावर नियंत्रण ठेवण्याचा मार्ग शोधण्याची समस्या असेल. एक प्रश्न असा आहे : सरकार जिथे सर्वशक्तिशाली आहे तिथे आपण वैयक्तिक स्वातंत्र्याचे जतन करू शकतो काय? दुसरा प्रश्न असा आहे : आंतरराष्टीय संघटनेच्या अंतर्गत राज्ये सहकार्य करतील काय की अजून काही युद्धे होतील?

गां. - माझा प्रश्न असा असेल: अशा अवाढव्य राज्याचा उदय कसा थांबवावा? यामुळेच मित्र राष्ट्रांनी फासीवादी राष्ट्रांची भूमिका वठवू नये असे मला वाटते. यामुळे हिंदुस्थान जे म्हणतो ते बरोबर आहे असे घोषित करावे अशी त्यांच्याकडे माझी मागणी आहे. त्यांनी ही उडी मारावी आणि हिंदुस्थानला स्वातंत्र्य द्यावे आणि आवश्यक असेल तर हिंदुस्थानच्या अटींवर आणि हिंदुस्थान म्हणेल तितके दिवस हिंदुस्थानात राहावे. जनतेचे आपल्याला मुक्तपणे सहकार्य मिळते काय हे आपण पाहू या.

लु. फि. - मला खात्री आहे की तुम्हाला तुमचे स्वातंत्र्य मिळेल. मला वाटते की ते तुमच्याकरिता चांगले असेल आणि आम्हा सर्वांकरिताही चांगले असेल. ब्रिटिशांनी आपल्या साम्राज्याचे रक्षण करण्याची वा साम्राजातील जनतेची सहानुभूती मिळवण्याची कोणतीही विशेष क्षमता दाखवली नाही.

गांधी आर्जव करत म्हणाले - तुम्ही हे अमेरिकेला सांगायला पाहिजे.

लु. फि. - मी हे सांगेन, परंतु या शब्दांत नाही. ब्रिटनच्या दारूगोळ्याच्या खरेदीकरिता आता आम्ही अर्थसहाय्य देत आहो. या वर्षी आम्ही ६०,००० विमान तयार करणार आहो. जेव्हा की १९४३ साली आम्ही १,४३,००० विमान तयार करणार आहो. हिंदुस्थानात अमेरिकेची जी भूमिका आहे तिचा जोपर्यंत संबंध आहे मी म्हणेन की हे संकट काहीसे वेळेपूर्वीच आले आहे. आम्ही जर एक लाख त्रेचाळीस हजार विमान तयार करत असू आणि आमचे २० लाख सैनिक आघाडीवर असतील तर लंडनला हिंदुस्थानसंबंधीच्या आमच्या दृष्टिकोनाकडे अधिक लक्ष द्यावेच लागेल. हिंदुस्थानात आज काय सुरू आहे हे ब्रिटिशांना कळत नाही. अमेरिकेच्या मदतीने कदाचित त्यांना हे उद्या कळू शकेल.

गां. - तर मुख्य मुद्द्यावर येऊन मी म्हणेन की आमचा प्रस्ताव किती अधिक न्याय्य आणि व्यवहार्य आहे हे समजावून सांगितल्याने ब्रिटिश समजणार नाहीत, आम्ही जेव्हा कृती करू तेव्हाच त्यांना हे कळू शकेल. हा ब्रिटिशांचा इतिहास आहे. त्यांच्यावर कृतीचा प्रभाव पडतो, आणि आता तीच कृती करण्याची वेळ आली आहे. असे असले तरी सध्या तरी हिंदुस्थानच्या राष्ट्रीय सरकारची कल्पना लोकप्रिय करण्याचा प्रयत्न

केला पाहिजे आणि यात अशक्यप्राय वा स्वप्नाळूपणाचे काहीही नाही हे दाखवून दिले पाहिजे. हा विचार जरी अहिंसेवर आधारलेला असला तरी माझे उद्दिष्ट न्याय्य वा योग्य आहे हे सिद्ध करण्याकरिता मी अहिंसेच्या तत्त्वाचा आधार घेण्याची आवश्यकता नाही. माझा कल हिंसेकडे जरी असता तरी हेच उद्दिष्ट विकसित झाले असते. माझा अहिंसेकडे कल असता तर मी कदाचित म्हणालो असतो, 'जा, हिंदुस्थानचा सैनिकी तळ म्हणून तुम्ही उपयोग करू नका.' परंतु आज मी म्हणतो, 'हिंदुस्थानचा कोणी ताबा घेऊ नये म्हणून आज जर तुम्हाला हिंदुस्थानचा उपयोग सैनिकी तळ म्हणून करायचाच असेल तर तो करा, परंतु इथे सन्माननीय अटीवर राहा आणि हिंदुस्थानचे नुकसान करू नका.' पुढे जाऊन मी म्हणेन की हिंदुस्थानमध्ये तयार झालेले सरकार जर सैनिकी प्रवृत्तीचे असेल तर ब्रिटिश त्याची मदत घेऊ शकतील.

लु. फि. - ब्रिटिश जर दडपणाखाली तुमचा प्रस्ताव मान्य करत असतील तर तुम्ही तुमच्या सात लाख खेड्यांचे गणतंत्र कसे उभाराल?

गां. - मी तुम्हाला निश्चित योजना सांगू शकत नाही. आजच मी ती योजना तयार करू शकत नाही. ही सर्व गोष्ट सध्या तरी सैद्धांतिक पातळीवर आहे. ही सर्व योजना प्रातिनिधिक संघटनेने तयार करायची आहे, माझ्यासारख्या स्वप्नाळू म्हणवल्या जात असलेल्या एकट्या माणसाच्या डोक्यातून ती निघायला नको.

लु. फि. - ठीक आहे, कापसापासून घरीच सूत काढण्याचे महत्त्व कळू नये इतका काही मी ठरीव साच्यातून विचार करणारा माणूस नाही.

गा. - पण तुम्हाला भाज्या तर कळत नाहीत.

लु. फि. - सकाळ संध्याकाळच्या जेवणात मला दररोज तीच ती भाजी आवडत नाही.

त्यांना हसू आले, आम्ही सर्व हसू लागलो. मी उठलो आणि निघून आलो.

यानंतर तीन तास नेहरू आणि मी विश्रांतीगृहाच्या खोलीत एकत्र बसलो होतो. ते त्यांच्या बिछान्यावर बसले होते तर मी तिथे जी एकच खुर्ची होती तिच्यावर. आम्ही मानवी सुख, संस्कृती, माणसाला प्रामाणिकपणे जीवन जगता येण्याकरिता समाजाची प्रगती कशा प्रकारे झाली पाहिजे, अमेरिका, रशिया, हिंदुस्थान अशा किती तरी विषयांची चर्चा केली. ते जितके आधी रशियावादी होते तितके ते आता दिसत नव्हते. परंतु ते चीनच्या बाजूने मात्र पूर्णपणे होते आणि आज ते गांधींशी चीनबद्दलच बोलत होते. गांधी आणि त्यांच्यात आज विचारांची देवाणघेवाण होणार होती. आणि सविनय आज्ञाभंगाच्या आंदोलनासंबंधात गांधी नेहरूंवर विजय

मिळवतील. नेहरू इथे आले तेव्हा त्यांच्या मनात याबद्दल संशय होता. अमेरिकी अध्यक्ष रुझवेल्ट हिंदुस्थानच्या परिस्थितीत परत हस्तक्षेप करण्याची ब्रिटनला तडजोड करण्याकरिता भाग पाडण्याची ते वाट पाहत होते. परंतु ब्रिटनची युद्धकाळात हिंदुस्थानच्या समस्यासंबंधी कोणतीही तडजोड करायची तयारी नसल्यामुळे अहिंसक आदोलनासंबंधी गांधीचा युक्तिवाद नेहरूसारख्या राष्ट्रवाद्याकरिता अमान्य करणे कठीण होते.

अमेरिकेत जाऊन अध्यक्ष रुझवेल्टशी सरळ चर्चा करण्याबद्दल नेहरूंना विनवणी केली. मी त्यांना सांगितले की एखाद्या राष्ट्राला स्वातंत्र्य मिळण्यासंबंधी आकांक्षा असेल तर अमेरिकी त्याला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देतात आणि अमेरिकेचे हिंदुस्थानात जे आर्थिक हितसंबंध आहेत ते ब्रिटनपेक्षा वेगळे आहेत.

आम्ही हिंदू धर्माबद्दलही चर्चा केली. नेहरू म्हणाले की हिंदूधर्म मूलतत्त्ववादी नाही. यामुळे कोणी हिंदू जर परंपरेहून वेगळे वर्तन करत असेल तरी त्याला शिक्षा करता येत नाही वा जातीबाहेर काढता येत नाही. ते म्हणाले की आज सकाळी गांधी म्हणाल्याप्रमाणे तुम्ही नास्तिक असला तरी हिंदू असू शकता. तुमचा जातीवर वा अस्पृश्यतेवर विश्वास नसला तरी तुमचे हिंदुत्व जात नाही. तुम्ही जरी येशू ख्रिस्ताचे चित्र तुमच्या भिंतीवर लावले आणि तुमचा जरी त्याच्या शिकवणुकीवर विश्वास असला तरी तुम्ही हिंदू राहता.

## जून ८, १९४२

माझ्या बिछान्यापासून तीन फूट अंतरावर असलेल्या बिछान्यावर नेहरू झोपले. ते म्हणाले की रात्री आवाजामुळे मला स्वस्थ झोप लागली नाही. मला मात्र कोणताही आवाज ऐकू आला नव्हता. ते म्हणाले की मी आश्रमातील काही मित्रांशी गप्पा मारून रात्री सव्वानऊ वाजता आलो होतो. मला असे वाटत होते की सायंकाळी तुझ्याशी काही गप्पा मारता येतील. परंतु मी (नेहरू) आलो तेव्हा तू (फिशर) गाढ झोपलेला होता.

आज सकाळी सहा वाजता पांढऱ्या पोषाखातील आपल्या नेहमीच्या आठदहा लोकांच्या गटासह गांधी फिरायला गेले. हा त्यांचा मौनाचा दिवस आहे. त्यांनी मला पोर्चमध्ये पाहिले आणि मला अभिवादन करण्याकरिता आपला हात डोक्यावर उचलला.  मी सकाळ टंकलेखन करण्यात आणि नेहरूंशी बोलण्यात घालवली.  दुपारी आर्यनायकम आले. त्यांनी कोलंबिया विद्यापीठात डिवे आणि थॉर्नडाईकबरोबर अभ्यास केला होता आणि एडिंबरो, कॅम्ब्रीज आणि ऑक्सफर्डमधून पदव्या घेतल्या होत्या. त्यांनी माझ्याकरिता हातकताईच्या खादीचा पांढराशुभ्र सूट आणि चपलाही आणल्या होत्या, कारण सेवाग्राममधील वाळू आणि खड्यांवरून चालत असताना घरात घालायच्या माझ्या ज्या सपात्या होत्या त्यांना छिद्रे पडू लागली होती हे त्यांच्या लक्षात आले होते. अमेरिकेत शिकत असतानाच ते एकदा एस. एस. बरेंगरिया या जहाजाने न्यूयॉर्कला गेले होते. परंतु त्यांचा रंग करडा असल्यामुळे तेथील कर्मचाऱ्याने त्यांना वाढायला नकार दिला होता. ती गोष्ट त्यांच्या अंतःकरणात खुपून राहिली होती. त्यांचा खास अभ्यास बुनियादी शिक्षणाचा म्हणजे शेतकऱ्यांच्या मुलाना हस्तोद्योग शिकवण्याचा होता. यात कताई, विणाई आणि शेतीकामाचा समावेश होता.  ते म्हणाले की काँग्रेस १९३७ ते १९३९ च्या दरम्यान सत्तेवर होती तेव्हा तिने या शिक्षणाचा पुरस्कार केला होता, परंतु काँग्रेसने राजीनामे दिल्यानंतर ब्रिटिश सरकारने याकडे दुर्लक्ष केले. त्यांनी मला ब्रिटिश कार्यालयाच्या अधिकृत अहवालातील उतारे दाखवले. त्यात ब्रिटिश शिक्षणपद्धतीला अपयश आल्याचे दाखवण्यात आले होते. त्यांचे म्हणणे होते की ब्रिटिश शिक्षण पद्धतीचा एकमेव उद्देश ब्रिटिशांकरिता कारकून आणि अधिकारी प्रशिक्षित करणे इतकाच आहे. यामुळे खालच्या वर्गाच्या शिक्षणात सरकारला रस नव्हता. त्याची सेवा करील अशा केवळ मध्यमवर्गियांच्या काही लोकांनाच शिकवण्यात त्यांना रस होता. याची परिणती मध्यमवर्गियांच्या राष्ट्रवादात झाली. इतक्यातच ब्रिटिश सरकारने शिक्षकांना प्रशिक्षण देणाऱ्या काही संस्थांच्या इमारती ताब्यात घेतल्या आहेत.

नेहरूंनी आर्यनायकमचे हे सर्व बोलणे ऐकलेही आणि आर्यनायकमशी ते सहमतसुद्धा झाले. ते म्हणाले की ब्रिटिश सैन्यावर जितका खर्च करतात त्याचा लहानसा भाग जरी त्यांनी शिक्षणावर खर्च केला असता तरी आज शेतकरी इतके अशिक्षित राहिले नसते. आर्यनायकम म्हणाले की पुरेशा शाळा न काढण्याकरिता ब्रिटिश नेहमीच निधीच्या अभावाचे कारण सांगत असतात. त्यांनी मला १९२१ च्या जनगणनेची अधिकृत आकडेवारी दाखवली. हिंदुस्थानातील केवळ सात टक्के लोक शिकलेले होते. १९३१ साली ही संख्या आठ टक्क्यांपर्यंत गेली. आर्यनायकम सखेद आश्चर्य व्यक्त करत म्हणाले, “दहा वर्षात केवळ एक टक्का वाढ! किती लाजिरवाणी गोष्ट!” १९४१ च्या जनगणनेतील आकडेवारी विश्वासार्ह नाही असे घोषित करण्यात आले आहे.

मला नेहमीच्या वेळी म्हणजे दुपारी तीन वाजता मुलाखत देता यावी म्हणून गांधींनी आपले मौन लवकर संपवले. अजून आपण हिंदुस्थानच्या अशा सर्वात मोठ्या समस्येचा उल्लेखसुद्धा केला नाही की जी सोडवणे फार कठीण आहे असे म्हणून मी चर्चेची सुरुवात केली.

गां. - ती कोणती आहे?

लु. फि. - हिंदुस्थानची लोकसंख्या दरवर्षी ५० लाखांनी वाढते आहे. ब्रिटिशाची अधिकृत आकडेवारी सांगते की १९३१ साली हिंदुस्थानची लोकसंख्या ३३ कोटी ८० लाख होती. ती वाढून १९४१ साली ३८ कोटी ८० लाख झाली. म्हणजे ५ कोटी अधिक तोंडांकरिता खाण्याची, कपड्यांची आणि निवाऱ्याची व्यवस्था करावी लागेल. हे तुम्ही कसे करणार आहा?

गां. - याचे एक उत्तर संततिनियमन असू शकेल. परंतु माझा संततिनियमनाला विरोध आहे.

लु. फि. - माझा विरोध नाही, परंतु हिंदुस्थानसारख्या मागासलेल्या देशात तसेही संततिनियमनाचा फारसा प्रभाव पडू शकत नाही.

गांधी हसत म्हणाले. - मग आम्हाला काही चांगले साथीचे रोग लागतील.

लु. फि. - वा जबरदस्त गृहयुद्ध. परंतु सोव्हिएत रशियात दुष्काळ, साथीचे रोग आणि गृहयुद्ध हे सर्व होते आणि तरीही त्यांची लोकसंख्या वेगात वाढते आहे, आणि बोल्शेव्हिकना १९२८साली काही आर्थिक उपाययोजना करावी लागली.

गां. - आम्ही तीव्र गतीने उद्योगीकरण करावे असे मी कबूल करावे अशी तुझी इच्छा आहे असे दिसते. मी हे कबूल करणार नाही. आमची पहिली समस्या ब्रिटिश सत्तेपासून मुक्ती मिळवण्याची आहे. मग आम्ही बाह्य नियंत्रणापासून मुक्त होऊन हिंदुस्थानकरिता जे करणे आवश्यक असेल ते करू. आम्ही काही कारखाने चालवण्याकरिता पात्र आहो असे ब्रिटिशांना वाटते तर इतर काही कारखाने सुरू करण्यासंबंधी आमच्यावरील बंदी कायम आहे. नाही ! माझ्याकरिता सर्वात मोठी समस्या आमच्यावरील ब्रिटिशांचे प्रभुत्व संपवणे हीच आहे.

बहुधा हीच गोष्ट असावी की ज्याबद्दल त्यांना सर्वाधिक बोलायचे असावे. अनिश्चित भूतकाळात त्यांना फार कमी रस होता.

लु. फि. - तर तुमच्या आगामी सविनय आज्ञाभंग आंदोलनाचे नेमके स्वरूप काय असेल? ते कसे असेल?

गां. - खेड्यांमध्ये शेतकरी कर भरणे बंद करतील, कायद्याने बंदी असल्यानंतरही ते मीठ तयार करतील. ही लहान गोष्ट दिसते. मिठाच्या करापासून ब्रिटीश सरकारला फार क्षुल्लक रक्कम मिळते. परंतु तो देण्याला नकार दिल्यामुळे आपण स्वतंत्रपणे कृती करू शकतो अशी हिंमत शेतकऱ्यामध्ये येईल. दुसरे पाऊल असेल जमीन ताब्यात घेणे.

लु. फि. - हिंसेने?

गां. - हिंसा होऊ शकते, परंतु जमीनदार सहकार्यही करू शकतात.

लु. फि. - तुम्ही आशावादी आहा.

गां. - ते पळून जाऊन सहकार्य करू शकतात.

यावर माझ्या बाजूला बसलेले नेहरू म्हणाले, “ते आपल्या पायांनी जप्तीकरिता मतदान करू शकतात. लेनीन म्हणाला होता की रशियातील सैनिकांनी १९१७ साली खंदकातून उठून पळत जाऊन आपल्या पायांनी शांततेच्या बाजूने मतदान केले होते म्हणजे युद्धातून पळून जाऊन आपण शांततेच्या बाजूने असल्याचे सांगितले होते असे तू तुझ्या “मेन ॲन्ड पॉलिटिक्स” या पुस्तकात लिहिले आहे. असेच इथेही आहे. हिंदुस्थानी जमीनदारही आपल्या पायांनी पळून जाऊन जमिनीच्या जप्तीवर सही करू शकतील.”

लु. फि. - वा, ते हिंसक प्रतिकार संघटित करू शकतील.

गांधी अंदाज करत म्हणाले - पंधराएक दिवस गोंधळ होऊ शकेल, परंतु तो लवकरच नियंत्रणात आणता येईल असे मला वाटते.

लु. फि. - म्हणजे कोणतीही नुकसानभरपाई न देता ती जप्ती असेल असे मला वाटते?

गां. - अर्थातच. कोणाकरिताही जमीनदारांना नुकसानभरपाई देणे आर्थिक दृष्टीने शक्य होणार नाही.

लु. फि. - ही तर गावांची गोष्ट झाली. परंतु हे संपूर्ण हिंदुस्थानकरिता शक्य नाही.

गां. - नाही. शहरातील कामगार कारखान्यातील काम सोडतील. रेल्वे चालणे थांबेल.

लु. फि. - सार्वत्रिक संप. मला माहीत आहे की मागे मोठ्या संख्येत शेतकरी तुमचे अनुसरण करत होते, परंतु शहरी कामगारांचा तुम्हाला फारसा पाठिंबा नव्हता.

गां. - नाही, इतका मोठा नव्हता. परंतु या वेळी कामगार वर्गही सहभागी होईल कारण देशाच्या मनःस्थितीची मला कल्पना आहे. प्रत्येकाला म्हणजे हिंदू, मुसलमान, शीख, कामगार, शेतकरी, उद्योगपती, नागरी सेवेतील लोक आणि संस्थानिक या सर्वांनासुद्धा स्वातंत्र्य हवे आहे. नवीन वारे वाहत आहेत हे संस्थानिकांना माहीत आहे. गोष्टी जशा आहेत तशा राहू शकत नाहीत. ब्रिटिशांचे प्रभुत्व कायम राहील अशा युद्धाला आम्ही पाठिंबा देऊ शकत नाही. जपान, जर्मनी आणि इटालीमध्ये आम्ही लोकशाहीकरिता संघर्ष करू शकतो? मला चीनला वाचवायचे आहे. चीनचे कोणतेही नुकसान होऊ नये अशी माझी इच्छा आहे. परंतु सहकार्य करण्याकरिता आम्ही स्वतंत्र असलो पाहिजे. गुलाम स्वातंत्र्याकरिता संघर्ष करत नसतात.

लु. फि. - तुमच्या सविनय आज्ञाभंगाच्या आंदोलनात मुसलमान तुमचे अनुसरण करतील असे तुम्हाला वाटते काय?

गां. - सुरुवातीला बहुधा नाही. परंतु आंदोलनाला यश मिळत असल्याचे जेव्हा ते पाहतील तेव्हा ते आत येऊ शकतील.

लु. फि. - आंदोलनात हस्तक्षेप करण्याकरिता वा आंदोलन थाबवण्याकरिता मुसलमानांचा उपयोग केला जाण्याची शक्यता नाही काय?

गां. - दुर्दैवाने याकरिता त्यांचे पुढारी वा सरकार प्रयत्न करू शकते, परंतु करोडो मुसलमानांचा स्वातंत्र्याला विरोध नाही, आणि म्हणून स्वातंत्र्य मिळवण्याकरिता करण्यात येत असलेल्या उपाययोजनेलाही त्यांचा विरोध असू शकत नाही. सर्वसामान्य मुसलमानांना काँग्रेसच्या सर्वोपरी ध्येयाबद्दल, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याबद्दल सहानुभूती वाटते. ही अशी शिळा आहे की जिच्यावर हिंदूमुसलमानांच्या ऐक्याचा इमला उभारता येऊ शकतो.

अतिरिक्त लोकसंख्येच्या समस्येच्या रुळावर ही चर्चा नेण्याचा मी शेवटचा प्रयत्न केला. मी गांधींकडून इतकेच उत्तर काढू शकलो - "मोठ्या प्रमाणात जर उद्योगीकरण झाले तर या प्रक्रियेचे नेतृत्व शासनाला करावे लागेल."

सायंकाळी मी महादेव देसाईंच्या झोपडीत गेलो आणि ते कताई करत असताना त्याना पाहत बसलो. गांधीजींच्या इंग्रजी साप्ताहिकाचे, हरिजनचे ते संपादक आहेत. आणि त्यांनी गांधींना आत्मकथा लिहिण्यातही मदत केली आहे. ते म्हणाले की मी वयाच्या पंचविसाव्या वर्षी वकिली सोडली आणि तेव्हापासून म्हणजे गत पंचवीस वर्षांपासून मी गाधींच्या निकटच्या संपर्कात आहे. ते म्हणाले की गांधीनी १९३९ पासून ज्या विदेशी लोकांशी चर्चा केली त्या सर्वात तुम्ही गांधींची घेतलेली मुलाखत सर्वात महत्त्वाची आहे. गांधी जे काही म्हणतात त्याचे ते पूर्ण टिपण ठेवतात. त्यांच्याजवळ माझ्या संभाषणाचीही टिपणे आहेत. आम्ही जेव्हा जमिनीवर बसलो तेव्हा कताई करताना चरख्याच्या चाकाची गती पाहून ती किती आरामदायक आणि मनःशांती देणारी असू शकते हे माझ्या लक्षात आले.

देसाईंना मी म्हणालो, इतके सगळे दिवस मी गांधींचे म्हणणे काळजीपूर्वक ऐकून घेत होतो आणि मुलाखत संपल्यानंतर ते जे बोलत ते नोंदवून ठेवत असे. नंतर मी जेव्हा ते परत वाचत असे तेव्हा गांधीच्या प्रभाव किती खोलवर पसरलेला आहे याची मला जाणीव होत असे. गांधींच्या या प्रभावामागे त्यांची उत्कट भावनाशीलता आहे अशा निष्कर्षावर तात्पुरता का होईना मी पोहोचलो.

देसाई म्हणाले हे अगदी बरोबर आहे.

लु. फि. - त्यांच्या या उत्कट भावनाशीलतेचे रहस्य काय आहे?

या भावनोत्कटतेचे कारण माणसाच्या मनात ज्या काही वासना निर्माण होत असतात त्या सर्वांचे उदात्तीकरण आहे.

“कामवासना?”

“कामवासना, क्रोध आणि वैयक्तिक आकांक्षा.”

गांधी मान्य करतील की त्यांनी चूक केली आहे. ते इतरांची चूक स्वतःच्या माथी घेऊ शकतात आणि स्वतःला कठोर शिक्षा करू शकतात. अशाच प्रकारे सविनय आज्ञाभंगात हिंसा शिरली तेव्हा त्यांनी आंदोलन मागे घेतले होते. गांधींचे स्वतःवर पूर्ण नियंत्रण असते. त्यातून प्रचंड ऊर्जा बाहेर पडते आणि भावनोत्कटताही.

माझ्या मनावर ठसा उमटला आहे की हे हिंदुस्थानी पाश्चात्यांपेक्षा किती तरी प्रामाणिक आहेत. ते स्वतःबद्दल बोलतात तेव्हा ते अधिक प्रामाणिकपणे बोलतात. ते जास्त आत्मचिकित्सक आणि आत्मसमीक्षक आहेत.

गां. - हेच अंतर आहे. ब्रिटिशांच्या जेवणातील भाज्यातही फार वैविध्य नसते. त्यांच्या जेवणातही नेहमीच गोबी आणि बटाटे असतात.

## जून ९,१९४२

उद्या सकाळी हैदराबाद संस्थानाची राजधानी असलेल्या हैदराबादला जाण्याकरिता मी निघेन. जगातील सर्वात श्रीमंत माणूस निझाम तिथे ब्रिटिशांच्या मदतीने एक कोटी साठ लोकांवर राज्य करत असतो. मी इथे अजून किती तरी दिवस राहू शकतो आणि काल गांधी मला अजून काही दिवस राहण्याकरिता म्हणालेही होते. परंतु मी सेवाग्रामला दोनतीन दिवस राहण्याच्या विचारानेच आलो होतो. यामुळे आता मी माझ्या मार्गाने जायलाच पाहिजे. सकाळी साडेपाच वाजता मी दाढी आणि न्याहरी केली. गांधी म्हणाले, “एके काळी बंगालमध्ये मी फार मेहनत करत होतो आणि त्या वेळी मी केवळ आंब्यावर राहत होतो.”

लु. फि. - इंग्रज वा अमेरिकी माणूस फार कठोर परिश्रम करून केवळ गोमांसाच्या भाजलेल्या मोठ्या तुकड्यावर राहू शकेल. भरपूर मेहनत करून मीसुद्धा केवळ भाजलेल्या गोमांसाच्या मोठ्या तुकड्यावर राहू शकेन.

गां. - हेच अंतर आहे. ब्रिटिशांच्या जेवणातील भाज्यातही फार वैविध्य नसते. त्यांच्या जेवणातही नेहमीच गोबी आणि बटाटे असतात.

आम्ही बोलत असतानाच कनू गांधींनी - गांधींच्या पुतण्याने आमचे फोटो घेतले.

लु. फि. - आम्ही फिरायला सुरुवात केल्यानंतर मी म्हणालो, तुम्ही तुमच्या कामासंबंधी आणि जगासंबंधी वस्तुनिष्ठ असल्याचे मला आढळलेले असल्यामुळे तुम्ही स्वतःबद्दलही वस्तुनिष्ठ असायला असे मला वाटते. हा वैयक्तिक प्रश्न नाही तर राजकीय प्रश्न आहे : इतक्या सगळ्या लोकांवर तुमचा जो प्रभाव आहे त्याचे काय कारण आहे?

गां. - तुमच्या या प्रश्नामागील भावना मी समजू शकतो. मला वाटते की मी सत्याचे जे अनुसरण करतो ते माझ्या लोकप्रियतेचे कारण आहे. ते माझे ध्येय आहे.

लु. फि. - मी सत्याची शक्ती कमी लेखत नाही. परंतु तुमचे हे स्पष्टीकरण मला अपूर्ण वाटते. हिटलरसारख्या पुढाऱ्यांनी खोटे बोलून सत्ता मिळवली आहे. याचा अर्थ तुम्ही खरे बोलूनच प्रभावी होऊ शकता असे नाही. परंतु इतरत्र वा या देशात सत्यामुळे फार काही साध्य झाले असे म्हणता येत नाही. मग तुमच्या मागे सत्तेचा कोणताही लवाजमा नसताना, सरकार नसताना वा तुमच्या पाठीशी पोलीस नसताना, समारंभ

नसताना वा घट्ट बांधणी असलेली संघटना नसताना — कारण काँग्रेस शिस्तबद्ध, घट्ट बांधणी असलेली संघटना आहे असे मी समजत नाही — तुम्ही करोडो लोकांना कसे प्रभावित करू शकता आणि त्यांना आपल्या सुखसमाधानाचाच काय जीवनाचाही त्याग करायला कसे काय लावू शकता?

गां. - सत्य काही केवळ शब्दात नसते. खरे म्हणजे ही गोष्ट सत्यमय जीवन जगण्याची आहे.

लु. फि. - ते थोडा वेळ थांबलो आणि मला वाटले की ते जे साधेपणाचे जीवन जगत असतात त्याबद्दल मी विचार करावा अशी त्यांची इच्छा होती. ते म्हणाले, “हे खरे आहे की माझ्याजवळ फारशी संसाधने नाहीत. मी काही फारसा शिकलेलोही नाही आणि मी फारसे वाचतही नाही”.

लु. फि. - असे तर नाही की तुम्ही जेव्हा स्वातंत्र्याची मागणी करता तेव्हा तुम्ही अनेक हिंदुस्थानींच्या अंतःकरणाची तार छेडता? संगीतकार आपल्या श्रोत्यांकरिता काही तरी करतो. हिंदुस्थानी जनता जी लय वा जो ताल ऐकण्याकरिता उत्सुक आहे तीच लय वा ताल तुम्हीसुद्धा छेडता. जनतेने जे अनेकदा ऐकलेले असते आणि जे तिला आवडले त्यालाच जनतेचा जास्तीतजास्त प्रतिसाद मिळताना मी पाहिला आहे. श्रोते त्याच व्याख्यात्यांच्या दृष्टिकोनाशी सहमत होतात ज्यांचे दृष्टिकोन त्यांना पटलेले असतात. तुमच्या लोकांना जे हवे असते आणि जे करायला त्यांना आवडते तेच तुम्ही करत वा बोलत असता काय?

गां. - हो, शक्य आहे की असेही असू शकेल. माझ्या मनात आधी ब्रिटिशांबद्दल निष्ठा होती, नंतर मी बंडखोर झालो. मी १८९६पर्यंत निष्ठावंत होतो.

लु. फि. - १९१४ ते १९१८च्या दरम्यानही तुम्ही निष्ठावंत नव्हता काय?

गां. - हो, एका अर्थाने, परंतु खरोखरी नाही. १९१८ साली मी म्हणालो होतो की हिंदुस्थानातील ब्रिटिश सत्ता विदेशी आहे आणि ती संपलीच पाहिजे. मी ब्रिटिशांना जाण्याची विनंती कशी केली ते मी तुम्हाला सांगतो. ते १९१६ साल होते. मी लखनौमध्ये काँग्रेसकरिता काम करत होतो. माझ्याकडे एक शेतकरी आला. तो हिंदुस्थानातील इतर शेतकऱ्यांच्यासारखाच दिसत होता - गरीब आणि कृष. तो म्हणाला, ‘माझे नाव राजकुमार शुक्ला आहे, आणि मी चंपारण जिल्ह्यात राहत असतो. तुम्ही माझ्या जिल्ह्यात यावे अशी माझी इच्छा आहे.’ त्याने आपल्या आणि इतर शेतकरी भावंडांच्या व्यथा सांगितल्या. तुम्हाला चंपारण जिल्ह्यात नेण्याची माझी इच्छा आहे. त्याकरिता मला परवानगी द्या असे विनवणी करत तो म्हणाला. चंपारण लखनौपासून शेकडो मैल दूर होते. त्याने इतक्या कळवळून आणि आग्रहपूर्वक विनंती केली होती की मला त्याला वचन द्यावे लागले.

परंतु मी तारीख निश्चित करावी अशी त्याची इच्छा होती. मी तसे करू शकत नव्हतो. त्यानंतर हिंदुस्थानच्या पाठीवर मी कुठेही गेलो तरी राजकुमार आठवडे अन आठवडे सारखा माझा पाठलाग करत होता. मी जिथे थाबायचो तिथे तो थांबायचा. १९१७च्या सुरुवातीला मी कलकत्त्याला जाणार होतो. राजकुमार माझ्या मागेमागेच असायचा. अखेरीस कलकत्त्याहून चंपारणला जाणाऱ्या गाडीतून जाण्याचे मला कबूल करावेच लागले. चंपारण तो जिल्हा आहे की जिथे निळीचे उत्पादन होते. मी सांगितले की मी हजारो शेतकऱ्यांशी बोलेन, परंतु दुसरी बाजू कळावी म्हणून मला त्या भागातील ब्रिटिश उच्चायुक्तांशीही बोलावे लागेल. मी जेव्हा उच्चायुक्तांना भेटायला गेलो तेव्हा त्यांनी मला दमदाटी केली आणि ताबडतोब चंपारण सोडून जायला सांगितले. मी त्यांचा सल्ला मान्य केला नाही आणि हत्त्यावर बसून एका गावात गेलो. पोलिसांच्या एका संदेशवाहकाने आम्हाला मध्येच अडवले आणि ताबडतोबत चंपारण सोडण्याचा आदेश माझ्यावर बजावला. मी राहत होतो त्या घरापर्यंत सोबत येण्याची मी त्याला परवानगी दिली आणि मग मी सविनय आज्ञाभंग करण्याचे ठरवले. मी जिल्हा सोडणार नाही. घराभोवती प्रचंड जमाव गोळा झाला होता. जमाव नियंत्रित करण्याकरिता मी पोलिसांना सहकार्य दिले. माझ्यात आणि पोलिसात एक प्रकारे मैत्रीबंध निर्माण झाले. चंपारणमधील तो दिवस माझ्या जीवनात सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखा झाला होता. माझ्यावर खटला भरण्यात आला. सरकारी वकिलाने दंडाधिकाऱ्याला खटला पुढे ढकलण्याची विनंती केली परंतु मी खटला सुरू ठेवण्याची विनंती केली. चंपारण सोडण्याच्या आदेशाची मी अवमानना केली असे मला घोषित करायचे होते. मी त्यांना सांगितले की मी स्थानिक परिस्थितीची माहिती गोळा करण्याकरिता आलो आहे आणि एका उच्च कायद्याचे पालन करण्याकरिता मी इथे आलेलो असल्यामुळे मला माझ्या सदसद्विवेकबुद्धीनुसार ब्रिटिश कायद्याचा भंग करणे भाग आहे. ब्रिटिशांच्या विरोधात हा माझा पहिला सविनय आज्ञाभंग होता. मी जर देशाच्या कोणत्याही भागात शांततापूर्ण कामाकरिता गेलो असेन तर तो भाग सोडून जा असे सांगण्याचा कोणत्याही इंग्रजाला अधिकार नाही हे तत्त्व मला स्थापित करायचे होते. सरकारतर्फे मी अपराधी आहे हे कबूल न करण्याकरिता मला विनंती करण्यात येत होती. अखेरीस दंडाधिकाऱ्यांनी खटला बंद केला. सविनय आज्ञाभंगाचा विजय झाला. हिंदुस्थानला स्वतंत्र करण्याची तीच पद्धत ठरली.

लु. फि. - हिंदुस्थानात तुमचे जे विशेष स्थान निर्माण झाले आहे त्याकरिता कदाचित हे दुसरे कारण असावे.

मला मध्येच अडवत गांधी म्हणाले, "मी जे केले ती अगदी सामान्य गोष्ट होती. माझ्या देशात मी कुठे जायचे आणि कुठे जाऊ नये यासंबंधी ब्रिटिश मला आदेश देऊ शकत नाही इतकेच मी घोषित केले होते."

भाष्य करत लुई फिशर म्हणाले, "ती सामान्य गोष्ट होती, पण ती करणारे तुम्ही पहिले होता. ही गोष्ट कोलंबस आणि अंड्यासारखी आहे." (ही गोष्ट सहाव्या शतकातील आहे. कोलंबसने नवीन व्यापारी मार्गाचा शोध लावल्याचे घोषित केले होते. त्यावर टीकाकार म्हणाले की या मार्गाचा शोध लागणे अपरिहार्च होते आणि हा काही फार मोठा शोध नाही. त्यामुळे कोलंबस त्यांना म्हणाला तुम्ही अंडे तयार करा आणि त्याच्या टोकावर उभे राहा. - गुगलवरून)

गां. - ती काय आहे?

लु. फि. - कोलंबस आणि अंड्याची गोष्ट तुम्ही कधीच ऐकली नाही?

गां. - नाही, मला सांगा.

लु. फि. - मी त्यांना ती गोष्ट सांगितली, ते खूप हसले.

गां. - हे बरोबर आहे. माझ्या देशात मी कुठेही जाऊ शकतो हे म्हणणे योग्य होते, परंतु माझ्यापूर्वी तसे कोणीही म्हणाला नव्हता.

या वेळेपर्यंत आम्ही गांधींच्या घरापर्यंत पोहोचलो होतो.

मुलाखतीच्या नियोजित वेळी मुलाखत घेण्याकरिता मी (फिशर) परत तीन वाजता गेलो. त्यावेळी तिथे गांधी नेहरूंशी एक तासापासून बोलत होते. ते म्हणाले, माफ कर, मला केवळ दहा मिनिट दे. स्पष्ट करत ते म्हणाले, "मला लघ्वी करण्याकरिता जायचे आहे." परतल्यानंतर ते त्यांच्या गवताच्या बिछान्यावर पहुडले. तोच त्यांच्या एका सचिवाने डाकेने आलेले पत्र त्यांना दिले. गांधींनी ते घेतले आणि ते वाचून त्यांनी स्मित केले. मग त्यांनी दोन पाने उलटली आणि त्यांना संगिताचा घडी केलेला कागद मिळाला. तिथे असलेल्या खुरशेदकडे वळून हसत हसत ते म्हणाले, "खुरशेद माझ्याकरिता तू हे म्हण" तिने ते कागद चाळले आणि ती दोनतीन गाणे गुणगुणली. मग मी त्यांना ते पत्र आणि संगिताचे पान मागितले. तिने मला ते दिले आणि मी ते माझ्याबरोबर अमेरिकेत आणले. पत्रावर तारीख आणि पत्ता पुढीलप्रमाणे होता -

संयुक्त राज्य अमेरिका,

हॉलीवुड, कॅलिफोर्निया,

१५३५, नॉर्थ होबर्ट बुलेवार्ड,

मार्च १०, १९४२.

ते पत्र “महात्मा गांधी, हिंदुस्थान राष्ट्रीय कॉंग्रेस, हिंदुस्थान.” या पत्त्यावर आले होते आणि खाली सही होती - मॉरीस मॉनिक.

पत्र असे होते -

“प्रिय महात्मा गांधी,

मी तुम्हाला हे गाणे लोकशाहीच्या भावनेने पाठवत आहे. आणि तुम्ही ते त्याच भावनेने स्वीकाराल अशी मला आशा आहे. दीर्घ काळापासून मी तुमचा प्रशंसक आहे.

अतिशय प्रामाणिकपणे तुमचा.”

गाणे होते -”धुरी राष्ट्रांना आपण पराभूत करू या.” आणि ते डग्लस मॅकॉर्थर आणि त्यांच्या फौजेला समर्पित केले होते. गाणे असे होते -

“So let us grind our axes to beat the cruel cruel Axis.

Qur faith and the work and taxes must stay the foe

That whacks us;

Tren let us grind our Axes and beat the cruel Axis

Till the tyranny relaxes from Nome to old Damascus.”

जेव्हा हसू निवळले गांधी माझ्याकडे वळले आणि म्हणाले,

“आता तुझ्या गोळ्यांचा भडिमार सुरू कर.”

लुई फिशर म्हणाले,.”श्रीयुत गांधी ती हिंसा होईल.”

गां. - तुझा हिंसेला काही आक्षेप आहे काय?

लु. फि. - परंतु मी हिंसेच्या बाजूने आहे की विरोधी हे तुम्ही माझ्या तोंडून शब्दानेसुद्धा ऐकले नाही.

हसत गांधी म्हणाले - ते तू सांगण्याची आवश्यकता नाही. मी तुझ्याकडे पाहतो आणि ओळखतो.

लु. फि. - ते काहीही असले तरी तुमचे होऊ घातलेले सविनय आज्ञाभंग आंदोलन जर हिंसेत परिवर्तित झाले तर, जसे की पूर्वी गत काही वर्षात झाले होते, तुम्ही ते परत घ्याल काय? तुम्ही पूर्वी असे केले आहे.

गां. - सध्याच्या माझ्या मनःस्थितीत कशी परिस्थिती निर्माण झाली तर मी आंदोलन मागे घेईन हे सांगणे कठीण आहे. भूतकाळात मी फार सावधगिरीने वागत होतो. माझ्या स्वतःच्या प्रशिक्षणाकरिता आणि माझ्या सहकाऱ्यांच्या प्रशिक्षणाकरिता ते आवश्यक होते. परंतु मी भूतकाळात जसा वागलो तसा कदाचित मी वागणारही नाही.

लुई फिशरनी सुरुवात केली. - आता मी लवकरच तुमच्या गावापासून दूर जाणार असल्यामुळे तुमच्या कल्पना मला पूर्णपणे कळल्या असल्याची मला पूर्णपणे खात्री करून घ्यायची आहे. मला तुमचे विचार पूर्णपणे कळले. तुम्हाला जे हवे आहे आणि ब्रिटिश अधिकाऱ्यांची जे देण्याची तयारी आहे त्यात काही तडजोड होऊ शकते काय? शक्य आहे की थोडा सुधारित क्रिप्स प्रस्ताव तुम्हाला मान्य होऊ शकेल?

गां. - नाही. क्रिप्सच्या प्रस्तावासारखी कोणतीही गोष्ट नाही. त्यांनी पूर्णपणे आणि कायमचे निघून जावे. मी नेहमीच तडजोडीच्या बाजूने असतो कारण मीच बरोबर आहे याची मला कधीही पूर्णपणे खात्री नसते. परंतु या वेळी माझा ताठरपणा वरचढ आहे. निघून जाणे आणि न निघून जाणे यात मध्ये कोणताही टप्पा नाही. येथून प्रत्येक इंग्रजाने निघून जावे असे अर्थातच माझे म्हणणे नाही. ब्रिटिशांकडून हिंदुस्थानी जनतेकडे राजकीय सत्तांतराकरिता माझा आग्रह आहे.

लु. फि. - वेळेच्या घटकाबद्दल काय? तुम्ही तेव्हा सविनय आज्ञाभंग आदोलन सुरू कराल तेव्हा जर ब्रिटिश वाकले तर ब्रिटिशांना ताबडतोब राजकीय सत्तेचे हस्तांतरण करावे लागेल काय?

गां. - नाही, ब्रिटिशांना दोन दिवसात म्हणा की दोन आठवड्यात म्हणा सत्ता सोडावी लागणार नाही. परंतु ब्रिटिशांचे हे निघून जाणे अंतिम पूर्ण राजकीय कृती असले पाहिजे.

लु. फि. - समजा की ब्रिटिश म्हणाले की आम्ही पूर्णपणे जाऊ परंतु युद्धानंतर?

गां. - नाही, असे झाले तर माझ्या प्रस्तावाचे बरेचसे महत्त्व निघून जाईल. रशिया आणि चीनला मदत करता यावी म्हणून त्यांनी आताच जायला पाहिजे असे माझे मत आहे. आज मी त्यांच्या बाजूने पूर्ण वजन टाकू शकत नाही. ती परोपकारी वृत्तीच होती की ज्यामुळे मी प्रस्ताव मांडला आहे. काही काळ हिंदुस्थान माझ्या

दृष्टिपथात नाही असे समजा. केवळ हिंदुस्थानकरिता मला कधीही स्वातंत्र्य नको होते. मला कधीही कूपमंडूक व्हायचे नव्हते.

लु. फि. - पण श्रीयुत गांधी, आधी तर तुमचे हे असे विचार जाणवले नव्हते.

गां. - माझ्या आत हे विचार पूर्णपणे विकसित होत असतात. ब्रिटिशांनी जायला पाहिजे हा विचार माझ्या मनात अकस्तात प्रस्फुटित झाला होता. क्रिप्सच्या अपयशातून मला ती कल्पना सुचली होती. ते जाताच ही  सुचली आणि या विचाराने मी भारावून गेलो.

लु. फि. - हा विचार तुम्हाला केव्हा सुचला?

गां. - क्रिप्स निघाल्यानंतर लगेच. होरेस अलेक्झांडरचे मला जे पत्र आले होते त्याचे उत्तर म्हणून मी पत्र लिहिले होते. त्यानंतर या विचाराने माझ्या मनाची पकड घेतली. मग प्रचाराला सुरुवात झाली. मग मी प्रस्ताव तयार केला. माझी पहिली भावना ही होती की आम्हाला क्रिप्सच्या अपयशाचे उत्तर मिळाले पाहिजे. क्रिप्सच्या प्रस्तावात काही शामक गोष्टी नसत्या तर तो इतका भयानक प्रस्ताव झाला असता. कल्पना करा की आता मी इंग्रजांना जाण्याकरिता सांगितले. हा विचार त्या चिरडलेल्या आशांमधून निर्माण झाला आहे ज्या आमच्या मनात खोलवर रुजलेल्या आहेत. जवाहरलाल नेहरू आणि इतरांकडून क्रिप्सबद्दल आम्ही बऱ्याच चांगल्या गोष्टी ऐकल्या आहेत. परंतु संपूर्ण मिशनला अपयश आले. मी स्वतःलाच विचारले, "या परिस्थितीतून मार्ग कसा काढायचा? ब्रिटिशांच्या उपस्थितीने आमच्या मार्गात अडथळा आला आहे. माझ्या उपवासाच्या मौन सोमवारी ही कल्पना मला सुचली. त्या मौनातच माझे डोके किती तरी विचारांनी भरून गेले होते आणि माझ्या लक्षात आले की मला रशिया, चीन आणि हिंदुस्थानकरिता काम करायचे आहे. माझे हृदय चीनकरिता कळवळते. मी च्यांग काई शेक आणि त्यांच्या आकर्षक पत्नीला विसरू शकत नाही. केवळ चीनकरिता तरी मी हे केलेच पाहिजे. माझे मन जगाच्या दुःखाने व्याकूळलेले आहे."

लु. फि. - युद्धाचा शेवट होईपर्यंत तुम्ही का वाट पाहू शकत नाही.?

गां. - कारण मी आता कृती केली पाहिजे आणि युद्ध सुरू असताना माझा उपयोग झाला पाहिजे.

लु. फि. - हा संघर्ष सुरू ठेवण्याकरिता तुमच्याजवळ एखादी संघटना आहे काय?

गां. - ही संघटना कॉंग्रेस पक्ष आहे. परंतु तिने जरी साथ दिली नाही तरी माझ्याजवळ जी संघटना आहे ती स्वतः.मीच आहे. या कल्पनेने भारला गेलेला माणूस मीच आहे. अशा माणसाला जर संघटनेची साथ मिळणार नसेल तर तो स्वतःच संघटना होतो.

लु. फि. - देशाच्या सध्याच्या मनःस्थितीबद्दल तुम्हाला पूर्ण खात्री आहे काय? तो तुमचे अनुसरण करील काय? या सविनय आज्ञाभंग आंदोलनात जनतेला फार मोठे बलिदान करावे लागणार आहे. तुमच्या कल्पनेला कोणाचा विरोध आहे काय?

गां. - आज मला राजगोपालाचारींचे पत्र मिळाले. केवळ त्यांचा विरोध आहे. मला त्यांचा दृष्टिकोन माहीत आहे. परंतु त्यांची इच्छा जर पाकिस्तान नष्ट करण्याची आहे, आणि पाकिस्तान नष्ट करण्याकरिता जर त्यांची इच्छा मुस्लिम लीगबरोबर काम करण्याची आहे तर मुस्लिम लीग त्यांची ती इच्छा पूर्ण करील अशी अपेक्षा ते कसे करू शकतात?

लु. फि. - जिना पाकिस्तानबद्दल कटिबद्ध आहेत असे तुम्हाला वाटते काय? कदाचित ही त्यांची सौदेबाजीकरिता चाल असू शकेल आणि हिंदू आणि मुसलमानांची सहकार्याची परिस्थिती निर्माण झाली तर ते ही मागणी सोडूनही देऊ शकतील.

गां. - मी तुम्हाला आधीच सांगितलेले असल्यामुळे ते ती कल्पना तेव्हाच सोडतील जेव्हा ब्रिटिश गेलेले असतील आणि त्यांच्याशी सौदा करण्याकरिता कोणीही नसेल.

लु. फि. - तर तुम्ही तुमचे आंदोलन केव्हा सुरू करणार आहा हे तुम्ही ब्रिटिशांना सांगणार आहा?

गा. - हो.

लु. फि. - तुम्ही त्यांना हे फार आधीच सांगायला नको. आणि मी हसलो.

गां. - ही मला तुमची पूर्वसूचना आहे काय?

लु. फि. - नाही.

गां. - त्यांना भरपूर वेळ असताना हे कळेल.

लु. फि. - तुम्ही जर याकडे ऐतिहासिक परिप्रेक्षातून पाहिले तर तुम्ही अगदी अभूतपूर्व आणि विलक्षण गोष्ट करणार आहा. तुम्ही साम्राज्याचा शेवट घोषित करणार आहा.

गां. - हे तर एक मूलसुद्धा करू शकते. मी जनतेच्या सहजप्रेरणेला आवाहन करणार आहे. मी तिला जागी करेन.

लु. फि. - आपण प्रयत्न करू या आणि त्याची जागतिक प्रतिक्रिया काय होते ते पाहू या. चीन आणि अमेरिका हे तुमचे मित्रच कदाचित सविनय आज्ञाभंगाचे हे आंदोलन तुम्ही करू नका असे तुम्हाला आवाहन करतील.

गां. - त्यांना मला आवाहन करू द्या. शक्य आहे की माझी समजूत पटेल. परंतु मी जर त्यांना वेळेवर आवाहन करू शकलो तर शक्य आहे की मीच त्यांना माझी भूमिका पटवून देईन. तुमचा जर येथील अधिकारी वर्गात शिरकाव असेल तर त्यांना हे सांगा. तुम्ही चांगले श्रोते आहा. तुम्ही सरळ आहा, डावपेच करणारे नाही. त्यांच्याशी याची चर्चा करा आणि माझ्या प्रस्तावात काही दोष असतील तर त्यांनी तो मला सांगावे.

लु. फि. - हे व्हाईसरायना सांगण्याकरिता तुमची परवानगी आहे काय?

गांधी ठामपणे म्हणाले - हो, माझी परवानगी आहे. त्यांनी माझ्याशी बोलावे; कदाचित माझे मतपरिवर्तन होऊ शकेल. मी विवेकी माणूस आहे. मला असे कोणतेही पाऊल उचलायचे नाही की ज्यामुळे चीनची हानी होईल.

लु. फि. - वा अमेरिकेची?

गां. - अमेरिका जर दुखावली तर सर्व दुखवले जातील.

लु. फि. - तुमची ही भूमिका अध्यक्ष रुझवेल्ट यांना कळावी अशी तुमची इच्छा आहे काय?

गां. - हो. मला प्रत्येकाला आवाहन करण्याची इच्छा नाही. परंतु माझ्या योजना, माझे दृष्टिकोन, आणि तडजोड करण्याची माझी तयारी या सर्व गोष्टी अध्यक्ष रुझवेल्ट यांना कळाव्या अशी माझी इच्छा आहे. या विचारापासून मला परावृत्त करण्याकरिता त्यांनी माझी समजूत घालावी अशी माझी इच्छा आहे हे अध्यक्षांना सांगा.

लु. फि. - तुम्ही जेव्हा आंदोलन सुरू कराल तेव्हा कोणतीही मोठी कारवाई होऊ शकते काय?

गां. - हो. ती कोणत्याही क्षणी होऊ शकेल अशी आशा आहे. त्याकरिता मी कधीही तयार आहे. मला माहीत आहे की मला केव्हाही अटक होऊ शकते. मी तयार आहे.

मला निरोप देण्याकरिता गांधींचे सचिव महादेव देसाई माझ्याकडे आले. त्यांनी माझ्याकरिता गांधींच्या आत्मकथेची प्रत आणली होती. ते म्हणाले की फिशर गेल्यानंतर तो काय करील याबद्दल तो

माझ्याशी बोलला. पुढे जाऊन ते म्हणाले की फिशर आणि माझ्यात जी चर्चा झाली तिच्यातील कोणताही भाग रुझवेल्ट आणि व्हाईसरायना सांगण्याची फिशरला परवानगी आहे अशी सहमती आमच्यात झाली आहे. देसाईंनी सांगितले की परिस्थितीसंबंधी व्हाईसरायशी चर्चा करण्याची गांधींची इच्छा आहे.

जेवणाच्या वेळी गांधी म्हणाले की फिशर गेल्यानंतर दोन गोष्टी होण्याची शक्यता आहे. "खुरशेद बेनला तुझी आठवण येईल कारण तिला सेवा करता येईल असा इथे कोणीही नाही. तसेच तुझ्याकरिता दररोज दुपारी जो एक तास मी राखून ठेवला आहे त्या वेळी मला तुझी आठवण येईल."

मी गांधींना सांगितले की मला इथे दीर्घ काळ राहणे आवडले असते आणि सविनय आज्ञाभेग आंदोलन करण्यासंबंधी निर्णय घेण्याकरिता जेव्हा वर्ध्यात सभा होईल तेव्हा मी इथे परत येण्याची शक्यता आहे. गांधींनी मला सांगितले की "ती सभा एका पंधरवाड्यातच होणार आहे, परंतु तुला यायचे असेल तेव्हा तू येऊ शकतो. मग मला त्यांनी विचारले, सेवाग्राममध्ये तुला चांगली झोप लागली की नाही. मी म्हणालो, "मला अनेक वर्ष जितकी चांगली झोप लागली नाही तितकी इथे चांगली झोप लागली."

ते म्हणाले की चांदण्यांच्या खाली चांगली झोप लागत असते. मला वाटते की ती सर्वोत्तम गोष्ट आहे." ते पुढे म्हणाले, "रशियात हे शक्य नसेल." मी त्यांना म्हणालो की "रशियाच्या काही भागातही फार उकाडा असतो."

ते म्हणाले, "असं, मला तर वाटत होतं की रशियात बाराही महिने थंडी असते."

विश्रांतीगृहात खुरशेद आणि नेहरूबरोबर मी बसलो होतो. ते दोघेही अनेकदा हिंदुस्थानातील तुरुंगात गेलेले होते. मी त्यांना तुरुंगातील जीवनाबद्दल बोलते केले. ते म्हणाले की महत्त्वाच्या पुढाऱ्यांना तिथे राहायला चांगली खोली मिळते, आणि गांधींना तर तिथे नेहमीच चांगली वागणूक मिळत असे आणि ते त्यांना हवे ते अन्न मिळवू शकत असत. तसेच तुरुंगाबाहेरील लोकांशी गांधींच्या पत्रव्यवहारातही अडथळा आणला जात नसे. इतरांना मात्र मोकळ्या असलेल्या लोकांबरोबर मुक्तपणे पत्रव्यवहार करता येत नसे. काँग्रेसच्या लोकांनी अटक होण्याकरिता उघडपणे सविनय आज्ञाभंग केलेला असल्यामुळे काँग्रेसचे जे लोक तुरुंगात होते ते कधीही निसटून जाण्याचा प्रयत्न करत नसत. ब्रिटिश राज्याच्या विरोधात गांधीं जे आंदोलन करत असत त्यात भूमिगत होण्याला वा गुप्तपणाला मुळीच वाव नसायचा. काँग्रेस आधीच प्रतिकार आंदोलन करणार असल्याचे घोषित करत असे आणि त्यानंतरच ती प्रतिकार आंदोलन करत असे.

आणि एखाद्या कॉंग्रेसीने जर निसटून जाण्याचा प्रयत्न केलाही तर तो लगेच परत सविनय आज्ञाभंग आंदोलन करून अटक करवून घेण्याकरिता तयार असायचा आणि त्याला परत अटक करून तुरुंगात टाकले जात असे.

आता गांधीच्या येऊ घातलेल्या आंदोलनासंबंधात नेहरू गांधींशी पूर्णपणे सहमत होते. रुझवेल्ट वा चँग काई शेक वा इतर कोणी हिंदुस्थानच्या परिस्थितीसंबंधात हस्तक्षेप करील अशी आशा त्यांना वाटत असल्यामुळे नेहरू गांधीचे अनुसरण करण्यासंबंधात कचरत होते. ब्रिटिश-हिंदुस्थानमधील गतिरोध तोडील आणि ब्रिटिशांना संघटित विरोध करण्याची आवश्यकता राहणार नाही असेही नेहरूंना वाटत होते. लोकशाहीवादी राष्ट्रातील अनेक उच्चाधिकाऱ्यांच्या बऱ्याच आधी नेहरू धुरी राष्ट्रांच्या विरोधात होते. लोकशाहीवादी राष्ट्रांनी तुष्टिकरणाचे जे धोरण अवलंबिले होते त्याच्या ते विरोधात होते, आणि ते जापानविरोधी, मुसोलिनीविरोधी आणि हिटलरविरोधी होते यासंबंधी अधिकृत अहवाल आहेत. धुरी राष्ट्राच्या विरोधात ब्रिटनचे जे युद्ध सुरू होते त्यात ब्रिटनची संकुचित अवस्था करण्याची त्यांची इच्छा नव्हती. परंतु त्यांना वाटत होते की ज्याप्रमाणे ब्रिटनला दूरपूर्वेत माघार घ्यावी लागली होती त्याप्रमाणेच हिंदुस्थानात माघार घेण्याची वेळ ब्रिटनवर येणार नाही असे पाऊल टाकायला ब्रिटनला भाग पाडायला पाहिजे. ब्रिटनजवळ जी सैनिकी शक्ती आहे तिच्या बळावर तो हिंदुस्थानला वाचवू शकेल असे त्यांना वाटत नव्हते. यामुळे आपल्या देशावर आलेल्या संकटात त्याचे रक्षण करण्याकरिता हिंदुस्थानी जनतेचा पाठिंबा मिळेल अशा प्रकारचे पाऊल उचलण्याची सुबुद्धी ब्रिटनला मिळावी अशी अपेक्षा ते करत होते.

# जून १०, १९४२

सेवाग्राममधील हा माझा शेवटचा दिवस आहे. मी सकाळी पाच वाजताच उठलो. नेहरूंनी आधीच अंथरुण सोडले होते आणि ते गांधींशी चर्चा करण्याकरिता गेले होते. ते सात वाजता परतले आणि म्हणाले की मी आणि काँग्रेस अध्यक्ष आझाद वर्ध्याकरिता आज निघणार आहो आणि काही खाजगी चर्चा करण्याकरिता गांधीही तिथे येतील. मी त्यांच्याबरोबर वर्ध्याला जाऊन तिथून हैदराबादकरिता गाडी पकडावी अशी व्यवस्था करण्यात आली होती. आश्रमाचे सदस्य मला निरोप देण्याकरिता येऊ लागले. ते अतिशय गोड लोक होते आणि मला वाटते की ते माझ्याशी फारच सौजन्याने वागले होते. महादेव देसाई आले, मला त्यांनी थोडे बाजूला घेतले आणि गांधींना अटक होऊ शकण्यासंबंधी माझ्याशी बोलले. ते म्हणाले की गांधींना १७ जूनला अटक होईल अशा अफवा मी ऐकल्या आहेत. मी म्हणालो की मला याबद्दल शंका आहे. काँग्रेस सविनय आज्ञाभंगाचा ठराव मंजूर करण्याची ब्रिटिश वाट पाहतील असे मला वाटते. देसाई म्हणाले की गांधींना व्हाईसरायची भेट घेण्याची इच्छा आहे आणि मी त्यांची मुलाखत ठरवू शकतो आणि या मुलाखतीत काही तरी तडजोड होऊ शकेल अशी आशा त्यांना आशा वाटते आहे असे असूनही मी ताबडतोब दिल्लीला जाऊ शकत नाही याचा मला खेद होतो.

दुपारच्या वेळी उष्णतामान बहुधा ११० अंश फॅरनहाईट असावे. आझाद, नेहरू आणि मी गाडीत बसलो आणि धुळीने भरलेल्या रस्त्याने वर्धा येथील काँग्रेसच्या वसतिगृहात जाण्याकरिता निघालो. तो पाच मैलांचा प्रवास होता. आझाद लठ्ठ होते आणि त्यांचे शरीर धष्टपुष्ट होते, त्यांचे डोके मोठे होते, त्यांच्या हनुवटीवर लहानशी टोकदार दाढी होती, त्यांचे केस करड्या रंगाचे होते आणि ते कापून लहान केलेले होते. त्यांचा आवाज कणखर होता. बहुतेक हिंदुस्थानींपेक्षा त्यांचा रंग गोरा होता. चारशे वर्षांपूर्वी त्यांचे कुटुंब अरेबियामधून हिंदुस्थानात आले होते. ते हिंदुस्थानातील प्रख्यात मुसलमान होते. त्यांनी कुराणचा उर्दूत अनुवाद केला आहे. त्यांनी अरेबिक साहित्यात विद्वत्ता प्राप्त केलेली असून प्रत्येकजण त्यांना मौलाना म्हणून संबोधत असतो. मौलाना म्हणजे मुलमानांमधील विद्वान आणि दैवीपुरुष.

वसतिगृहातील थंड खोलीत आम्ही तिघे थांबलो. आठ दिवसात पहिल्यांदाच मी विजेवर चालणाऱ्या पंख्याच्या ताजेतवाने करणाऱ्या हवेचा आनंद घेतला. सायंकाळच्या जेवणानंतर मी आझादची मुलाखत घेतली. नेहरूंनी हस्तक्षेप केला. आझादना इंग्रजी समजते पण बोलायला ते कचरतात. यामुळे नेहरू माझ्या

प्रश्नांचा अनुवाद करत नव्हते परंतु आझादनी दिलेल्या उत्तरांचा केवळ अनुवाद करत होते. आझादनीच क्रिप्सबरोबर बहुतांश वाटाघाटी केल्या होत्या. क्रिप्सनी माझी निराशा केली असे त्यांचे म्हणणे होते. क्रिप्स हिंदुस्थानचे मित्र आहेत असे त्यांना वाटत होते. क्रिप्सनी त्यांना निश्चितपणे सांगितले होते की हिंदुस्थानात नवीन राष्ट्रीय सरकार असेल आणि ते नियमानुसार काम करील आणि इंग्लंडचा राजा ज्याप्रमाणे इंग्लंडच्या सरकारच्या कामात किमान हस्तक्षेप करतो त्याप्रमाणे किमान हस्तक्षेप करील. या गृहितकाच्या आधारावर सर स्टॅफर्ड क्रिप्सबरोबर वाटाघाटींना सुरुवात झाली होती. हिदुस्तानी सैन्याचे विभाजन करू एक भाग ब्रिटिश सेनापतीच्या आणि एक भाग हिंदुस्थान संक्षण मंत्र्याच्या अंतर्गत राहील असेसुद्धा त्यांच्यात ठरले होते. मग अकस्मात नऊ एप्रिलला आझादनी सांगितले की क्रिप्सनी मला सांगितले आहे की ब्रिटिश सरकारला व्हाईसरायचा नकाराधिकार रद्द करणे मान्य नाही. यामुळे क्रिप्सबरोबरच्या वाटाघाटी मोडल्या. आझादना वाटत होते की क्रिप्सने जरी वचन दिले होते तरी लंडनची इच्छा क्रिपस्ने ते आश्वासन पाळावे अशी नव्हती. आझादनी घोषित केले की हिंदुस्थान आणि इंग्लंडमधील कराराची किल्ली हिंदुस्थानचे अंतरिम संयुक्त सरकार तयार करण्यात होती. या संयुक्त मंत्रिमंडळात आपले बहुमत असेल अशी काँग्रेस पक्षाची अपेक्षा नव्हती.

मी आझादना विचारले की क्रिप्सच्या अपयशानंतर हिंदुस्थानी जनतेची मनस्थिती कशी होती. “काही अंशी ती निराशेची होती. तसेच त्यात निषेधाचाही अंश होता. परंतु ब्रिटिश सरकारशी वाटाघाटीचा प्रयत्न करण्यात काही अर्थ नाही अशीत भावना प्रामुख्याने होती. काहीही द्यायचे नाही असे ब्रिटिनी ठरवले होते. अनेक मुसलमानांच्या मनावरसुद्धा हाच ठसा उमटला होता.”

आझाद म्हणाले की हिंदुस्थानच्या सध्याच्या राजकीय वातावरणात मुसलमान पुढारी स्वातंत्र्याला विरोध करू शकतात. ते म्हणाले की मुस्लिम लीग प्रतिगामी आहे आणि ती प्रामुख्याने जमीनदारांच्या पाठिंब्यावर विसंबून आहे. हिंदुस्थानातील पंचाण्णऊ टक्के मुसलमान हिंदूंचे वंशज आहेत. बाकीचे मुसलमान विजेत्यासोबत आले. परंतु माझ्या कुटुंबाप्रमाणे ते सर्वसुद्धा हिंदू समाजात मिसळून गेले आहेत. गांधी माझ्याजवळ जे म्हणाले होते त्याचीच पुनरावृत्ती करत ते म्हणाले बंगालमध्येसुद्धा हिंदू आणि मुसलमान हे दोघेही बंगाली भाषाच बोलत असतात आणि सारखाच पोषाख घालत असतात आणि राहतातही सारखेच. मद्रासमध्ये ते सर्व तमिळ बोलतात. खेड्यापाड्यात या दोन समाजात फार कमी अंतर आहे. आझाद म्हणाले

की जिनांना पाकिस्तान नको आहे, पाकिस्तानचा उपयोग ते हिंदूंच्या विरोधात केवळ हुकुमाचा एक्का म्हणून करत आहेत आणि इंग्लंडने त्यांच्यावर कृपा करत ते अधिकार दिले आहेत.

नेहरू आणि आझाद या दोघानीही आश्वासत मला सांगितले की मुसलमानांना खरोखरच जर हिंदुस्थानात राहायचे नसेल तर त्यांना बळजबरीने ठेवण्याची कोणाचीही इच्छा नाही. आझाद म्हणाले की असे जरी असले तरी विवाहापूर्वीच घटस्फोटावर माझा विश्वास नाही. हिंदू आणि मुसलमानांनी जर एकत्र राहण्याचा प्रयत्न केला आणि त्यात जर त्यांना अपयश आले तर फाळणी होऊ शकते. परंतु मोठ्या संख्येतील मुसलमानांचा हिंदुस्थानच्या ऐक्यावर विश्वास आहे आणि पूर्ण परीक्षा होईपर्यंत हे ऐक्य भंग करण्याची त्यांची इच्छा नाही.

दुपारी तीन वाजता गांधी अकस्मात वसतिगृहात आले. ते आले तेव्हा मी फाटकाजवळच होतो. त्यांचा चेहरा हास्याने पूर्णपणे फुललेला होता. ज्या मोटारीने नेहरू, आझाद आणि मला वर्ध्याला आणले होते तीच गाडी परत सेवाग्रामला गेली आणि तिने गांधी आणि देसाई आले होते. वर्ध्याहून पाऊण मैल अंतरावर असतानाच गाडी बंद पडली. गांधी खाली उतरले आणि हिंदुस्थानच्या तळपत्या उन्हात ते तितके अंतर चालत आले. वसतिगृहात पोहोचल्यानंतर त्यांच्या मुद्रेवर विजयी झाल्याचा भाव होता आणि त्यांनी या "नवीन औद्योगिक युगातील तांत्रिक यशांच्या अविश्वसनीयतेवर भाष्य केले."

काही मिनिटातच गांधी आझाद आणि नेहरूबरोबर एकांतात चर्चा करू वागले, मी ऊघड्या दारातून खोलीत गेलो परंतु ते हिंदुस्थानीत बोलत असल्यामुळे मी तिथून निघून आलो. नंतर हिंदुस्थानातील तरुण वृत्तपत्र प्रतिनिधी ग्रोव्हर मुलाखत घेण्याकरिता तिथे आले. गांधी त्यांना म्हणाले की हिंदुस्थान आज एखाद्या शवाप्रमाणे आहे आणि एक शव युद्धात विजयी होण्याकरिता कोणतीही विशेष मदत करू शकत नाही. हिंदुस्थान ब्रिटिशांच्या राजकीय राजकीय दास्यातून मुक्त झाला पाहिजे मगच हिंदुस्थानमध्ये स्वतःचे रक्षण करण्याइतकी शक्ती येईल.

मी साडेनऊ वाजता वर्धा सोडले. गांधींचा मी जेव्हा निरोप घेऊ लागलो तेव्हा त्यांनी माझा हात घट्ट धरून माझ्याशी हस्तांदोलन केले आणि त्यांनी मला परत भेटायला सांगितले.

सात दिवसांनंतर हिंदुस्थानातून मी न्यूयॉर्कला विमानाने गेलो. मी परतल्यानंतर काहीच दिवसांनंतर एका वार्ताहराने माझी मुलाखत घेतली. तो मला म्हणाला की गांधींना तू हा माझ्या पोटा-पाण्याचा प्रश्न आहे असे जर लिहिले असते तर बरे झाले असते. मला असे करायचे सुचलेच नाही असे मी त्यावर म्हणालो.

## भाष्य

मी गांधींचे गाव सोडल्यानंतर गांधींनी माझ्याकडे अध्यक्ष रुझवेल्टकरिता एक पत्र पाठवले. त्याबरोबर हाताने लिहिलेली एक चिठ्ठीही होती. गांधींनी लिहिले होते - तुला जर हे पत्र पसंत नसेल तर तू हे फाडून टाकू शकतो. आणि तुला जर वेगळे काही हवे असेल तर तू मला तसे सांगू शकतो. गांधीमध्ये अहंकार क्वचितच असावा.

गांधी चूक मान्य करण्यात कधीही संकोचत नाहीत आणि तसे जाहीरपणे करणेच त्यांना पसंत आहे. मे १९४२ मध्ये सर स्टॅफर्ड क्रिपना त्यांच्या कामात अपयश आल्यानंतर गांधींनी घोषित केले - “ब्रिटिशांनो चले जाओ”.ते म्हणाले की ब्रिटिशांनी त्यांचे सैन्य काढून घेतले पाहिजे. त्यांनी जर तसे केले नाही तर हिंदुस्थानला सविनय आज्ञाभंगाचे आंदोलन करणे भाग पडेल. जूनमध्ये मात्र त्यांनी आपल्या या मागणीत बदल केला. त्यांनी त्यांच्या इंग्रजी साप्ताहिकात, हरिजनमध्ये लिहिले की मी यासंबंधी जे लिहिले होते तेव्हा माझा काही गैरसमज झाला होता. माझ्या अनेक मुलाखतकारांपैकी एकाने ही गोष्ट लक्षात आणून दिल्यानंतर मला हे जाणवले. अहिंसेची मागणी परिपूर्ण प्रामाणिकपणाची असते, मग त्याकरिता कितीही मूल्य चुकवावे लागो. माझ्या या दुर्बलतेचा, जर ही दुर्बलता असेल तर, जनतेला जो त्रास होत आहे तो तिने सहन केला पाहिजे. मी मित्र राष्ट्रांना असे पाऊल उचलायला सांगण्याचा अपराध करू शकत नाही की ज्यामुळे त्यांचा निश्चित पराभव होईल. मित्र राष्ट्राचे सैन्य जर अकस्मात काढून घेण्यात आले तर त्यामुळे हिंदुस्थान आणि चीनचा पराभव होणे निश्चित आहे. माझ्या कृतीमुळे असे काही परिणाम होऊ शकतील याची मला रतिभरही कल्पना नव्हती. यामुळे (हिंदुस्थानला मुक्त करण्याची) माझी मागणी जरी पूर्ण करण्यात आली तरी हिंदुस्थान जापानी लोकांनी व्यापू नये म्हणून मित्र राष्ट्रांना आपले सैन्य हिंदुस्थानच्या भूमीवर ठेवणे आवश्यक वाटत असेल तर त्यांनी तसे करावे.

सर्वसामान्य राजकारणी माणूस जेव्हा सत्ता धारण करतो वा आपले धोरण राबवू पाहतो तेव्हा तुमच्या पाठिंब्याकरिता तो देशात समृद्धी आणण्याचे, कर कमी करण्याचे, नफा वाढण्याचे म्हणजे थोडक्यात सांगायचे तर आकाशातून चंद्र आणि तारका आणून देण्याचे आश्वासन देत असतो. आपल्या देशाचे स्वातंत्र्य हे गांधींचे जीवनध्येय असल्यामुळे ते इंग्लंडला आणि जगाला आश्वासन देऊ इच्छितात की “माझ्या या जीवनध्येयाची जरी परिपूर्ती होऊ शकली तरी हिंदुस्थानकरिता सर्व काही चांगलेच होईल असे मी म्हणू शकत नाही.” त्याऐवजी ते म्हणतात की “ब्रिटिश गेल्यानंतर हिंदुस्थानात सर्व काही सुरळीतच असेल असे मी खात्रीपूर्वक सांगू शकत नाही. त्यानंतर हिंदुस्थानात गोंधळ निर्माण होऊ शकतो. ब्रिटिशांनी सुव्यवस्थितपणे

निघून जावे आणि हिंदुस्थानला ईश्वराच्या भरवशावर सोडावे इतकेच मी म्हणेन. तुम्हाला कदाचित अशी अवास्तव भाषा आवडणार नाही. मग त्याला वाटल्यास तुम्ही अराजक म्हणा. जास्तीतजास्त इतकेच वाईट होऊ शकते. परंतु कदाचित अराजक होणारही नाही. आम्ही ते टाळण्याचा प्रयत्न करू."  गांधीचे हे विधान वाचून टीकाकार म्हणतात, ब्रिटिश गेले तर हिंदुस्थानात गोंधळ होईल असे गांधी म्हणतात."

गांधी आग्रहपूर्वक म्हणतात की ब्रिटिश जेव्हा हिंदुस्थानींकडे सत्तेचे हस्तांतरण करतील तेव्हा हिंदुस्थानातील सैन्याचे विघटन केले जाईल. परंतु त्याच्या क्षणभर आधीच ते म्हणाले होते, "कोणताही हिंदुस्थानी सैन्यात भरती होऊन मदत करत असेल वा शक्य असेल तर आर्थिक मदत करत असेल तर त्याकरिता मनाई नाही." आणि अजून एका वेळी (हरिजन ऑगस्ट ६, १९४२) त्यांनी लिहिले आहे, "हिंदुस्थानच्या करोडो लोकांमधून लक्षावधी लोकांना सैनिकी प्रशिक्षण देता येऊ शकणार नाही काय? त्यांच्यातून जगातील कोणत्याही सैन्यातील शूर सैनिकांसारखे शूर सैनिक तयार करता येणार नाहीत काय?" या सगळ्याचा काय अर्थ आहे? गांधी स्वतःचेच विधान खोडत आहेत काय? नाही. त्यांना असे हिंदुस्थानी सैन्य विघटित करायचे आहे की ज्यात उपाशीपोटी असलेल्या लोकांनी "स्वयंसेवक" म्हणून नाव नोंदवलेले आहे आणि ज्यांची सैनिक म्हणून चागलेचुंगले खाण्याची इच्छा आहे वा ज्यांना सैनिकी कामाचे आकर्षण वाटते. परंतु हिंदुस्थान त्याचे स्वतःचे राष्ट्रीय सैन्य तयार करू शकतो. यावरून गांधींना जाणीवपूर्वक कसे खोडसाळपणे उद्धृत केले जाते हे लक्षात येईल.

गांधींशी निकटचा बौद्धिक संपर्क स्थापित करण्यात आनंद होतो कारण ते खरोखरच मुलाखतकारासमोर आपले मन उघड करतात आणि त्यांच्या आतील यंत्रणा कशा प्रकारे काम करते ते ते मुलाखतकाराला पाहू देतात. बहुतेक लोक जेव्हा बोलतात तेव्हा ते आपले विचार परिपूर्ण स्वरुपात मांडतात. यामुळे त्यांना वैचारिक हल्ल्याचा किमान सामना करावा लागण्याची शक्यता असते. गांधींचे असे नाही. ते जे कोणते वैचारिक पाऊल टाकत असतात त्याचे कारण ते ताबडतोब सांगत असतात. उघड विचार करत असतात आणि ती सर्व प्रक्रिया वाचकांसमोर असते. काही लोकांचा यामुळे गोंधळ होतो आणि इतरांना गांधी स्वतःचेच म्हणणे खोडतात वा ते ढोंगी आहेत असे म्हणायला ते भाग पाडतात. गांधी त्याची फिकीर करत नसतात. शक्य आहे की ते फार म्हातारे झाले असतील वा ते अतिशय वस्तुनिष्ठ असतील वा इतर लोक ज्याप्रमाणे जग काय म्हणेल याची फिकिर करतात तशी ते कदाचित करत नसतील. मी जेव्हा अनेक हिंदुस्थानींची वा इंग्रजांची मुलाखत घेतो तेव्हा मुलाखतीच्या दरम्यान सामान्यपणे ते सावधगिरीने म्हणयचे की "माझे हे शब्द प्रकाशनार्थ नाहीत." गांधीबद्दल मी काय लिहितो वा मी त्यांना कसा उद्धृत करीन याची ते कधीही फिकीर करत नसत. ते माझ्याशी द्वढ्ढाचारी म्हणून बोलत नसत तर बरोबरीच्या नात्याने बोलत असत.  हिंदुस्थानातील मुस्लिम लीगचे अध्यक्ष मोहम्मद अली जिनांबरोबर मी किती तास घालवले आहेत. ते चाणक्ष संसदपटू, कुशल वादविवादपटू आणि अतिशय प्रामाणिक राजकारणी आहेत, परंतु ते माझ्याशी एखाद्या महान व्यक्तीप्रमाणे बोलत असत. ते मला पटवून देण्याचा प्रयत्न करत असत. मी जेव्हा एखादा प्रश्न त्यांना विचारत असे तेव्हा कोणीतरी फोनोग्राफच्या रेकार्डची बाजू बदलवली असे वाटत असे. ते तेच बोलत असत  जे मी आधीच ऐकलेले असे वा त्यांनी मला आधीच साहित्य दिलेले होते त्यात मी वाचलेले असेल. परंतु मी गांधींना जेव्हा काही विचारत असे तेव्हा मी काही तरी सर्जनात्मक प्रक्रिया सुरू केली असे मला वाटत असे. काम करत असताना त्यांचे मन काय म्हणते हे ऐकू येत असे आणि दिसत असे. जिनांशी बोलताना

फोनाग्राफच्या रेकॉर्डवरील केवळ सुई फिरताना मला दिसत असे. जिनांनी स्वतः काढलेल्या निष्कर्षाशिवाय ते मला काहीही देऊ शकत नसत. या मुळे गांधी जिनांपेक्षा कितीतरी जास्त उत्सुकतावर्धक आहेत. तुम्ही जर गांधींचा योग्य सूर छेडला तर तुम्हाला विचारांच्या नवीन खाणीचा शोध लागू शकेल. त्यांची घेतलेली मुलाखत ही नवीन शोधाची जननी असते, आणि काही वेळा तर ते जे काही बोलतात त्याने तेच आश्चर्यचकित होतात. त्यांनी जे विचार व्यक्त केलेले असतात त्यातील नाविन्याने तेच थक्क होतात. यामुळेच गांधींपासून मी बरेच काही शिकलो आहे आणि गांधीबद्दलही बरेच काही. अनेकदा ते स्वतःच्या विरोधात वापरण्याकरिता स्वतःच दारूगोळा देतात. उदाहरणार्थ त्यांच्या साप्ताहिक मौनाचे जे गुण सांगितले जातात ते त्यात नाहीत हे त्यांनी मला सांगण्याची काहीही आवश्यकता नव्हती. परंतु गांधी हे असेच आहेत. त्यांच्या डोक्यात निळी पेंसिल नाही. ते स्वतःला "सेंसॉर" करत नसतात. यामुळे ते गोधळवणारे वा चीड आणणारे माणूस आहेत असे समजले जाते. उदाहरणार्थ ते म्हणतात की मला जर संधी मिळाली तर मी जापानला जाईन आणि हे युद्ध संपवण्याचा प्रयत्न करीन. त्यांना माहीत आहे आणि त्यांनी लगेच सांगितलेही आहे की अशी संधी मला कधीही मिळणार नाही हे मला माहीत आहे. आणि मी जरी गेलो तरी जापान युद्ध थांबवणारही नाही हेसुद्धा मला माहीत आहे. जापान जर शांततेकडून होणार नाही तर मग जापानला का जायचे? त्यांच्या मनात विचार आला म्हणून? एक शांततावादी म्हणून त्यांना हे शत्रुत्व संपवण्याची इच्छा आहे. परंतु सत्य हे आहे की त्यांच्याकरिता ही आशा अव्यवहारीपणाची आहे, त्याकरिता उल्लेखनीय असे कोणतेही कारण नाही. काही वेळा गांधींना कालबाह्य आणि अव्यवहार्य कल्पनांचे स्पष्टीकरण करताना आनंद होतो. आधुनिक शोधांचा ते उपहास करतात. त्यांना माहित असते की घड्याळाचे काटे उलटे फिरवता येऊ शकत नाहीत. ते स्वयंचलित गाड्या नष्ट करू शकत नाहीत. परंतु ते त्यांची चेष्टा करू शकतात. संघीय प्रशासन आवश्यक नाही असे ते प्रतिपादन करतात. संघीय प्रशासन नसले तर कशा अडचणी येतील हे जर तुम्ही दाखवले तरी त्यांचे समाधान होणार नाही. यामुळे तुम्ही अजून युक्तिवाद करू लागला तर ते अखेरीस म्हणतील, "मला माहीत आहे की माझा वैयक्तिक दृष्टिकोन काहीही जरी असला तरी केंद्रीय प्रशासन राहणारच आहे." हे गांधींच्या शैलीचे खास वैशिष्ट्य आहे. ते एखादे तत्त्व सांगतात, त्याकरिता युक्तिवादही करतात आणि हे अव्यवहार्य आहे वा उचित नाही असे ते अखेरीस मान्यही करतात. ते मनमिळाऊ आणि तरल बुद्धीचे आहेत. त्यांना जेव्हा एखादी कृती करायची असते तेव्हा त्यांच्यात काही तरी हुकूमशहासारखे असते. मग ते आपल्या युक्तिवादाच्या वजनाने आणि लोकप्रियतेच्या आधाराने समोरच्याला चिरडून टाकतात. परंतु त्यांच्या विचारात हुकूमशहासारखे काहीही नाही. आपले चुकले असे हुकूमशहा कधीही मान्य करत नसतो. गांधी करू शकतात. त्यांनी असे कितीदा तरी केले आहे.

गांधीत बरेच काही हिंदूत्व आहे. हिंदू धर्म सहनशील आणि स्पंजासारखा आहे. हिंदूंचा एका देवावर विश्वास आहे. काहींचा ख्रिस्तावरही विश्वास आहे. काही नास्तिक आहेत; त्यांचे म्हणणे आहे की हिंदूत्व ही जीवनशैली आहे, तिचा देवाशी काहीही संबंध नाही. काही मूर्तीपूजा करतात तर काही पर्वतांची आणि नद्यांची आणि काही त्या देवीदेवतांची, जे पूर्वी स्त्रीपुरुष होते. हिंदूना त्यांना एक देवतावाद आणि मूर्तीपूजा यांत कोणताही अंतर्विरोध दिसत नाही. एक हिंदुस्थानी मला म्हणाला की, "हिंदुस्थानात जर नायगरा धबधबा असता तर तो देव असता."हिंदू धर्माचा "ऑलिंपस पर्वत" लोकांनी भरलेला आहे. परंतु काही हिंदूंची मान्यता आहे की महात्मा गांधींकरिता तिथे जागा राखून ठेवलेली आहे. गांधींबद्दल येथील सर्वसामान्य जनतेची भावना अशी आहे की त्यांनी आपले जीवन जनसेवेकरिता वाहिलेले आहे. ते जनतेसारखे राहतात आणि त्यांच्या प्राथमिक

अडिअडचणीत आणि गरिबीत भागीदार होतात. त्यांच्याजवळ पैसाही नाही आणि कोणतीही संपत्तीसुद्धा नाही. त्यांना केवळ एकच गोष्ट हवी आहे - स्वतंत्र हिंदुस्थान. आणि यामुळेच करोडो हिंदुस्थानींनासुद्धा असेच वाटते. देशाच्या उत्कट इच्छेचे गांधी प्रतीक झालेले आहेत.

हिंदुस्थानात कुठेही हिंदुस्थानी जेव्हा ब्रिटिशांवर टीका करतात तेव्हा ते ब्रिटिशविरोधी का आहेत हे त्यांनी स्पष्ट करून सांगावे अशी माझा आग्रह असतो. ब्रिटिश सरकारच्या उच्च दर्जाच्या नागरी सेवेत असलेल्या एका हिंदुस्थानी मुसलमानाला मी म्हणालो, "इतके सगळे हिंदुस्थानी ब्रिटिशविरोधी का आहेत?"

तेव्हा आश्चर्य व्यक्त करत तो म्हणाला, "का नसावे? हा प्रश्न खरे म्हणजे योग्य होईल." तो पुढे म्हणाला की कोणत्याही देशाला विदेशी सत्तेने आपल्यावर राज्य केलेले आवडणार नाही.

गांधींना वाहून घेतलेले मुसलमान अनुयायी आहेत, हिंदू अनुयायीही आहेत. पारसी आणि अस्पृश्यांचा त्यांच्यावर विश्वास आहे कारण त्यांनी इतर कोणत्याही माणसापेक्षा, तीन दशकांपेक्षाही अधिक काळ हिंदुस्थान स्वतंत्र व्हावा म्हणून धडपड केली आहे. त्यांच्यापैकी अनेकांचे गांधींशी अनेक प्रश्नावर मतभेद आहेत. ते हिंदूंचे राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न करत आहेत असा मुलमानांचा त्यांच्यावर आरोप आहे. परंतु राष्ट्राच्या मुक्ततेकरिता त्यांनी सातततयाने जी मेहनत केली ती कोणीही नाकारत नाही. आधुनिक काळात राष्ट्रीयत्वाची ओढ प्राथमिक, स्वाभाविक आणि उत्स्फूर्त झाली आहे. हिंदुस्थानच्या या इच्छेचे गांधी शक्तिशाली उद्गाते झाले आहेत.

गांधीची श्रद्धा आहे आणि त्यांना खात्रीपूर्वक वाटते की सेवाग्राम येथील आपल्या झोपडीत बसून, आपला पत्रव्यवहार वाचून आणि त्यांना येऊन भेटणाऱ्या हिंदुस्थानींचे म्हणणे ऐकून त्यांना हिंदुस्थानींच्या भावभावना काय आहेत हे कळू शकते व ते हिंदुस्थानच्या सर्वसामान्य जनतेच्या प्रार्थना ऐकू शकतात आणि म्हणून त्यांच्यातर्फे बोलण्याचा आणि कृती करण्याचा त्यांना अधिकार आहे. गांधी हिंदुस्थानच्या विचारात बुडालेले आहेत. ते हिंदुस्थानशी एकरूप झालेले आहेत. त्यांचे कान हिंदुस्थानचा आवाज ऐकण्याकरिता पूर्णपणे आतुरलेले आहेत. ते तो ऐकतात. आपण त्याचा योग्य अर्थ लावू शकतो असा विश्वास त्यांना वाटतो. अशा प्रकारे खात्रीपूर्वक वाटणे हे अनेकदा पुढाऱ्यांकरिता दीपस्तंभाप्रमाणे असते. गांधींना आपल्या अर्थशास्त्राच्या वा समाजशास्त्राबद्दलच्या दृष्टिकोनाबद्दल शंका असू शकते. ते आपली पद्धत आणि वेळापत्रक बदलवू शकतात. परंतु स्वातंत्र्याच्या केंद्रिय विषयासंबंधात ते मुळीच विचलित होणार नाहीत, झुकणार नाहीत आणि तडजोड करणार नाहीत. गांधींचा जन्म हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून देण्याकरिता झाला होता असे हिंदुस्थानी तुम्हाला सांगतील. त्याकरिता त्यांची मरायची तयारी आहे. हिंदुस्थानच्या सद्गुणासंबंधीच्या तत्त्वज्ञानात त्याग आणि संन्यासाला फार उच्च कोटीचे स्थान आहे.

जगात सर्वाधिक धार्मिक असलेल्या हिंदुस्थानसारख्या देशात गांधींच्या निर्णयक्षमतेला, चातुर्याला आणि त्यांची सखोल धार्मिक वृत्तीला विशेष स्थान असते. परंतु ते आपल्या लोकप्रियतेच्या आधारावर सर्व शक्तिनिशी ते जे आवाहन करतात ते राष्ट्राच्या स्वातंत्र्याकरिता असते. इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा त्यांच्या दृष्टीत हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याला प्राधान्य आहे, इतके की त्यासमोर त्यांच्या प्रिय अहिंसेलासुद्धा दुय्यम स्थान मिळेल. नेहरू, आझाद, राजगोपालाचारी यांच्याबरोबर निदान ते निकटचे

मित्र म्हणून काम करू शकतात. त्यांना माहीत असते की ते शांततावादी नाहीत.परंतु हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या विरोधकांबरोबर मात्र ते काम करू शकत नाही.

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासंबंधात करोडो हिंदुस्थानी जनता आणि त्यांच्यात सुसंवाद आहे. महान नेत्यांकरिता असा सुसंवाद आवश्यक असतो. त्यांच्या महत्तेचे हे चिन्ह आहे. विंस्टन चर्चिल यांच्या अनेक भाषणातून ही गोष्ट अभिव्यक्त झाली आहे. अतिशय चातूर्याने ते तेच सांगतात जे लाखो सरळसाधे इंग्रज ओबडधोबड इंग्रजीत आपल्या शेजाऱ्यांना सांगतात वा स्वतःला सांगतात. तुम्ही त्याच नेत्याचे अनुसरण करता जो तुमची अधिक चांगली आवृत्ती असतो. करोडो अर्धनग्न, अर्धपोटी लोक, हुशार शेतकरी वा राष्ट्रीय प्रयत्नाद्वारे प्रतिष्ठा आणि संपन्नता मिळवण्याकरिता धडपड करणारे कामगार याच्याकरिता ते आईवडलांसारखे आहेत. ते असंख्य अतिशय सुसंस्कृत हिंदुस्थानी लोकांच्या आणि शक्तिसमपन्न उद्योगपतीच्या प्रार्थनेलाही प्रतिसाद देतात जे विदेशी जोखडाच्या वा विदेशातील धनदांडग्यांच्या विरोधात असतात.

गांधींचे जीवन एकमार्गी आहे. त्यांना स्वतंत्र हिंदुस्थान हवा आहे. हेसुद्धा महापुरुषांचे लक्षण आहे. ब्रिटनचे पहिल्या श्रणीची सत्ता म्हणून जतन करणे हा चर्चिलचा उद्देश होता. लेनीनचा उद्देश सामंतशाहीच्या चिखलातून रशियाला बाहेर काढण्याचा होता. हिटलरचा जगज्जेता होण्याचा होता. चांगल्या शिल्पाप्रमाणे महापुरुष एकाच धातूचे बनलेले असतात.

# लुई फिशरना गांधीजींनी दिलेल्या इतर काही मुलाखती

## १. लुई फिशर यांना मुलाखत

नवी दिल्ली, जून २६, १९४६

गांधीजींनी मला रशियाशी युद्ध होण्याच्या शक्यतेच्या अफवांबद्दल विचारले.

मी सांगितले की याची चर्चा तर फार आहे परंतु अखेरीस ही गोष्ट चर्चेपर्यंतच सीमित राहील. मी पुढे म्हणालो, "तुम्ही पश्चिमेकडे अधिक लक्ष दिले पाहिजे"

यावर त्यांनी उत्तर दिले -

मी अजून हिंदुस्थानचीच खात्री पटवून देऊ शकलेलो नाही. आमच्या चोहोबाजूला हिंसा आहे. मी गोळ्या न भरलेली बंदूक आहे.

मी सुचवले की दुसऱ्या महायुद्धाच्या अंतापासून अनेक युरोपीय आणि अमेरिकी लोकांना आध्यात्मिक पोकळी जाणवू लागली आहे. तुम्ही ही उणीव काही प्रमाणात भरून काढू शकता.

परंतु मी तर आशियायी आहे, केवळ एक साधा आशियायी.

ते हसले, नंतर थोडेसे थांबून म्हणाले - येशू आशियायी होता.

'द लाईफ ऑफ महात्मा गांधी,' पृष्ठ ४५४

-----------------

# २. लुई फिशर यांना मुलाखत

(प्यारेलाल यांच्या "आफ्टर फोर इअर्स" या लेखातून उद्धृत. लुई फिशर गांधीजींना १९४६च्या १७ तारखेला आणि परत १८ तारखेला भेटले होते. हा वृत्तांत १७ तारखेला झालेल्या दोन मुलाखतींचा आहे. अठरा तारखेच्या मुलाखतीकरिता पाहा "लुई फिशर यांना मुलाखत", जुलै १८, १९४६. लुई फिशर यांनी लिहिलेल्या या मुलाखतींच्या वृत्तांताकरिता पाहा "लुई फिशर यांनी गांधीजींच्या मुलाखतीचा जो वृत्तांत लिहिला त्यातील उद्धरणे,", जुलै १७, १९४६.)

पाचगणी, [जुलै १७, १९४६] (वरील टीपेनुसार)

**लुई फिशर - मी घटनासमितीत गेलो आणि तिचा उपयोग वेगळ्या उद्दिष्टाकरिता म्हणजे रणांगण म्हणून केला व तिला सार्वभौम सत्ता म्हणून घोषित केले तर त्याबद्दल तुम्ही काय म्हणाल?**

गांधीजी - दुसऱ्या कोणी निर्माण केलेल्या संस्थेला सार्वभौम संस्था घोषित करण्याचा काहीही उपयोग नाही. अखेरीस ती ब्रिटिशांची निर्मिती आहे. केवळ घोषणा केल्याने एखादी संस्था सार्वभौम होत नसते. सार्वभौम असल्याप्रमाणे तुम्हाला वर्तन करावे लागते. जोहानिसबर्ग येथील एका लहानशा गल्लीतील तीन शिंप्यांनी 'आम्ही सार्वभौम आहो' असे घोषित केले होते. परंतु त्याचा काहीही परिणाम झाला नाही. तो केवळ चेष्टेचा विषय होऊन गेला होता. प्रस्तावित घटनासमिती क्रांतिकारक नाही असे मला वाटत नाही. प्रस्तावित घटनासमिती ही सविनय कायदेभंगाला प्रभावी रचनात्मक पर्याय आहे असे मी म्हणालो होतो आणि माझा यावर शंभर टक्के विश्वास आहे.

आमच्या समाजवादी मित्रांच्या त्यागाचे आणि आत्मसंयमाचे मला कौतुक वाटत असले तरी त्यांची पद्धत आणि माझी पद्धत यांतील अंतर मी कधीही लपवलेले नाही. त्यांचा हिंसेवर आणि तिच्याशी संबंधित गोष्टींवर विश्वास आहे तर माझ्याकरिता अहिंसाच सर्व काही आहे.

**लुई फिशर - तुम्ही जसे समाजवादी आहा तसेच तेही आहेत.**

गांधीजी - मी आहे, ते नाहीत. त्यांच्यापैकी अनेकांचा जन्मही झाला नव्हता तेव्हापासून मी समाजवादी होतो. मी समाजवादी असल्याबद्दलची जोहानिसबर्गमधील एका कट्टर समाजवाद्याची मी खात्री पटवून दिली होती. परंतु हे सांगून काहीही फायदा नाही. त्यांच्या समाजवादाचा मृत्यू झाल्यानंतरही माझा हा दावा कायम राहील.

**लुई फिशर - तुमच्या समाजवादाचा अर्थ काय?**

गांधीजी - माझ्या समाजवादाचा अर्थ आहे 'सर्वोदय'. मूक, बधीर, आंधळे अशांच्या राखेवर मला वर चढायचे नाही. त्यांच्या समाजवादात यांना बहुधा स्थान नाही. त्यांचा एकमेव उद्देश भौतिक प्रगती आहे. उदाहरणार्थ अमेरिकेला प्रत्येकाला मोटरगाडी द्यायची आहे. माझी तशी इच्छा नाही. माझ्या व्यक्तिमत्वाची पूर्ण अभिव्यक्ती करता येईल असे स्वातंत्र्य मला हवे आहे. व्याधाच्या ताऱ्यापर्यंत मला शिडी बांधण्याचा अधिकार असला पाहिजे. याचा अर्थ असा नाही की मला असे काही करायचे आहे. इतरांच्या समाजवादात व्यक्तिगत स्वातंत्र्य नाही. त्यात तुमचे स्वतःचे काहीही नसते, तुमचे शरीरसुद्धा.

**लुई फिशर - होय, परंतु समाजवादातही अनेक प्रकार आहेत. सुधारित स्वरूपातील माझ्या समाजवादात प्रत्येक गोष्ट राज्याच्या मालकीची नसेल. परंतु रशियात मात्र असेच आहे. तिथे तुमच्या शरीरावरसुद्धा तुमचा अधिकार नसतो. तुम्ही कोणताही अपराध केलेला नसला तरी तुम्हाला केव्हाही अटक करता येऊ शकते. त्यांची इच्छा असेल तिथे ते तुम्हाला पाठवू शकतात.**

**तुमच्या समाजवादात मुलांवर राज्याचा मालकी हक्क नसतो काय व राज्याला हवे तसे ते त्याला प्रशिक्षण देऊ शकत नाही काय?**

गांधीजी - सर्वच राज्य तसे करतात. अमेरिकाही असे करते.

**लुई फिशर - अमेरिका रशियापेक्षा फारशी वेगळी नाही.**

गांधीजी - परंतु असा समाजवाद एक तर हुकूमशाही होईल वा आरामखुर्चीतील तत्त्वज्ञान होईल. मी स्वतःला साम्यवादीसुद्धा म्हणवतो.

**लुई फिशर - बापरे, असे म्हणू नका. तुम्ही स्वतःला साम्यवादी म्हणवून घेता हे तर भयंकरच झाले. तुम्हाला जे हवे आहे तेच मलाही हवे आहे, जयप्रकाश व इतर समाजवाद्यांना हवे आहे. एक मुक्त जग. परंतु साम्यवाद्यांना हे नको आहे. त्यांना अशी व्यवस्था पाहिजे की जिच्यात मनाला आणि देहाला गुलाम करता येईल.**

गांधीजी - तुम्ही मार्क्सबद्दल असेच म्हणाल काय?

**लुई फिशर - आपला हेतू साध्य करण्याकरिता साम्यवाद्यांनी मार्क्सवाद भ्रष्ट केला आहे.**

गांधीजी - लेनीनबद्दल काय?

**लुई फिशर - लेनीनने याची सुरुवात केली. त्यानंतर स्टॅलीनने ही गोष्ट परिपूर्णतेकडे नेली. साम्यवादी जेव्हा तुमच्याकडे येतात तेव्हा त्यांना कॉंग्रेसमध्ये शिरायचे असते व कॉंग्रेसवर नियंत्रण स्थापित करायचे असते व आपल्या उद्दिष्टाकरिता त्यांना तिचा उपयोग करायचा असतो.**

गांधीजी - असेच समाजवादीही करतात. माझा साम्यवाद समाजवादापेक्षा फारसा वेगळा नाही. त्यात या दोघांचाही सुसंवाद साधण्यात आला आहे. मला जो काही साम्यवाद समजला आहे त्याप्रमाणे तो समाजवादाचा स्वाभाविक उपसिद्धांत आहे.

**लुई फिशर - होय, तुम्ही बरोबर आहा. एक काळ असा होता की यात भेद करता येऊ शकत नव्हता. परंतु आज समाजवादी आणि साम्यवादी यांच्यात फार अंतर आहे.**

गांधीजी - तुम्हाला स्टॅलीनच्या पद्धतीचा साम्यवाद नको आहे असे तुम्हाला म्हणायचे आहे काय?

**लुई फिशर - परंतु भारतीय साम्यवाद्यांना भारतात स्टॅलीनच्या पद्धतीचा साम्यवाद हवा आहे व त्याकरिता त्यांना तुमचे नाव वापरायचे आहे.**

गांधीजी - त्यांना यश येणार नाही.

**लुई फिशर - म्हणजे तुम्ही स्वतः घटनासमितीत जाणार नाही, परंतु तिला पाठिंबा द्याल?**

गांधीजी - होय, परंतु सत्ता मिळवण्याकरिता आम्ही घटनासमितीत जात आहो असे म्हणणे चूक होईल. ती जरी सार्वभौम सत्ता नसली तरी शक्य तितकी ती त्याजवळ आहे.

**लुई फिशर - पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले होते की १६ मेच्या शासकीय प्रपत्राच्या आधारावर ब्रिटिशांनी काही करार लादण्याचा प्रयत्न केला तर आम्ही तो प्रयत्न उधळून लावू.** (मुंबईला १० जूनच्या वृत्तपत्र परिषदेत जवाहरलाल नेहरू म्हणाले होते की . . . . अधिकार नसताना ब्रिटिश सरकारने आम्हाला जर असे सांगण्याचा प्रयत्न केला की तुमची अल्पसंख्याकांच्या बाबतीत सहमती नसल्यामुळे आणि तुमची त्यांच्याशी करार करण्याचीही तयारी नसल्यामुळे आम्ही हिंदुस्तानात काही विशिष्ट बाबतीत नियंत्रण ठेवू तर आम्ही ते मान्य करणार नाही. यामुळे परत संघर्ष निर्माण होईल. अशी कोणतीही संधी त्यांनी आमच्यावर लादण्याचा प्रयत्न केला तर आम्ही ते प्रयत्न उधळून लावू.)

गांधीजी - हो, बाहेरून जर एखादी संधी लादण्याचा प्रयत्न झाला तर.

**लुई फिशर - आणि ते म्हणाले की काँग्रेस समूह मान्य करणार नाही.**

गांधीजी - हो, मीसुद्धा तेच म्हणालो. संघ न्यायालय वा इतर एखादे न्यायालय वेगळा निकाल देत नसेल तर. (पाहा प्रार्थना प्रवचन जून २३, १९४६) आणि मला दिसते त्याप्रमाणे ब्रिटिशांनी सद्हेतूने काम केले तर घटनासमितीतून बरेच काही निष्पन्न होऊ शकते.

**लुई फिशर - तुम्ही म्हणता आणि माझाही विश्वास आहे की ते असे करतील. परंतु कल्पना करा की त्यांनी असे काही केले नाही तर तुम्ही तुमच्या पद्धतीने प्रतिकार करणार नाही काय?**

गांधीजी - जोपर्यंत परिस्थिती अनुकूल आहे तोपर्यंत नाही. परंतु भविष्याबद्दल अंदाज करणे चूक आहे, आणि आधीपासून अपयशाची कल्पना करणे तर अधिकच चूक आहे. आपण जर वर्तमानाची काळजी घेतली तर भविष्य आपोआपच त्याची काळजी घेईल.

**यानंतर ते हिंदू-मुसलमान ऐक्याच्या प्रश्नाकडे वळले. हिंदू-मुसलमान समस्या अखेरीस स्पर्शास्पर्शाच्या प्रश्नाशीच निगडित आहे असे म्हणून गांधीजींनी लुई फिशरना आश्चर्याचा धक्काच दिला.**

हिंदू धर्मात जेव्हा पूर्ण सुधारणा होईल आणि अस्पृश्यतेचा लवलेशही राहणार नाही तेव्हा सांप्रदायिक समस्या शिल्लकच राहणार नाही.

**लुई फिशर - मी असे ऐकले आहे की निवडणुकांमध्ये काँग्रेसच्या हरिजनांचा कॉंग्रेसेतर हरिजनांच्या विरोधात जो विजय झाला तो स्पृश्य हिंदूंच्या मतांमुळे!**

गांधीजी - प्राथमिक निवडणुकांमध्ये जिंकलेल्या हरिजनांमधून काहींना निवडून देण्याचा हक्क सवर्ण हिंदूंना देणे याशिवाय संयुक्त निवडणुकांचा दुसरा कोणता उद्देश होता? प्राथमिक निवडणुकांमध्ये अपयश आलेल्या कोणत्याही उमेदवाराला संयुक्त निवडणुकीत उभे राहता येत नाही. याशिवाय दावा करण्यात येतो त्याप्रमाणे बहुतेक प्रकरणी कॉंग्रेसी हरिजन कॉंग्रेसेतर हरिजनाच्या विरोधात निवडून आले असे म्हणणेही बरोबर नाही. मद्रास प्रांतात जिथेकुठे कॉंग्रेसेतर हरिजनांनी निवडणूक लढवली होती तिथेतिथे जवळपास सर्व कॉंग्रेसेतर हरिजनांचा प्राथमिक निवडणुकांमध्येच पराभव झाला होता. बहुतांश ठिकाणी कॉंग्रेसी हरिजन बिनविरोध निवडून आले होते.

**लुई फिशर - त्यांच्यातील काहींना स्वतंत्र मतदार संघ पाहिजे.**

गांधीजी - हो. परंतु आम्ही त्याला विरोध केला होता. स्वतंत्र मतदार संघाने ते स्वतःच हिंदू धर्माच्या क्षेत्राबाहेर फेकले गेले असते आणि अशुभ वर्णभेद कायम राहिला असता.

**लुई फिशर - हे खरे आहे. परंतु ते काहीही असले तरी हिंदूंनी आम्हाला आपल्या क्षेत्रापासून बाहेर ठेवले आहे असे ते म्हणू शकतात.**

गांधीजी - परंतु आज तर हिंदू आपल्या पापाचे प्रायश्चित्त करत आहेत.

**लुई फिशर - त्यांनी पुरेसे प्रायश्चित्त घेतले आहे काय?**

गांधीजी - मला हे सांगताना दुःख होते की अजून नाही. त्यांनी तसे केले असते तर अस्पृश्यता राहिलीच नसती आणि मी आधीच सांगितल्याप्रमाणे सांप्रदायिक समस्याही राहिली नसती.

**लुई फिशर - हिंदू आणि मुसलमानांमध्ये सामाजिक संबंध कमी आहेत काय?**

गांधीजी - नाही. उलट परिस्थिती याच्या विपरीत आहे. परंतु राजकीय दृष्टीने हिंदू-मुसलमानांमध्ये एक भिंत उभी राहिली आहे. तिचे श्रेय लॉर्ड मिंटो यांना आहे.

**लुई फिशर - तुमचे तरुण फारच हिंदुस्थान केंद्रित आहेत.**

गांधीजी - हे काही प्रमाणात खरे आहे. आम्ही आंतरराष्ट्रीय झालो असे मी म्हणणार नाही. परंतु आम्ही उपेक्षितांच्या हिताचे म्हणजे शोषित राष्ट्रांच्या हितरक्षणाचे काम हाती घेतले आहे कारण आम्ही स्वतःच एक प्रमुख शोषित राष्ट्र आहो.

**लुई फिशर - हिंदुस्थानात गोऱ्या लोकांबद्दल जी दुर्भावना निर्माण होते आहे ती वाईट आहे. ताजमहाल हॉटेलमध्ये "दक्षिण आफ्रिकी लोकांना प्रवेश नाही"अशी सूचना लावण्यात आली आहे. मला ती आवडली नाही. तुमच्या अहिंसेने तुम्हाला अधिक उदार करायला पाहिजे.**

गांधीजी - ती अहिंसा नाही. आज हिंदुस्थानवर गोऱ्यांचे राज्य आहे. ताजमहाल हॉटेल अशा प्रकारची सूचना लावण्याची हिंमत करत असेल तर त्याच्याकरिता ती अभिमानाची गोष्ट आहे.

**लुई फिशर - असे तर कोणताही राष्ट्रवादी म्हणेल. यापेक्षा तुम्ही काही तरी चांगले सांगायला पाहिजे.**

गांधीजी - मग परत एकदा मी राष्ट्रवादी होईन. हिंदुस्थानींना जर ते समतेची वागणूक देऊ शकत नसतील तर त्यांना इथे राहण्याचा काहीही अधिकार नाही.

**लुई फिशर - हो, बरोबर आहे. परंतु तुम्ही त्यांना त्यांच्या अधिकारापेक्षा जास्त दिले पाहिजे. तुम्ही त्यांना आमंत्रण दिले पाहिजे.**

गांधीजी - होय. जेव्हा मी व्हाईसराय होईन तेव्हा.

**लुई फिशर - भारतीय गणराज्याचे अध्यक्ष असा तुमचा अर्थ आहे?**

गांधीजी - नाही. थोड्या वेळाकरिता व्हाईसराय. एक घटनात्मक व्हाईसराय होणे माझ्याकरिता पुरेसे होईल. मग मी पहिले काम हे करीन की व्हाईसराय भवन रिकामे करून ते हरिजनांना देऊन टाकीन. मग मी दक्षिण आफ्रिकेतून आलेल्या गोऱ्यांना माझ्या झोपडीत बोलावीन आणि त्यांना म्हणेन की तुम्ही माझ्या

देशबांधवांना चिरडून टाकले आहे. परंतु आम्ही तुमची नक्कल करणार नाही. तुमच्या पात्रतेपेक्षा आम्ही तुम्हाला जास्त देऊ. तुम्ही आम्हाला दक्षिण आफ्रिकेत जसे दगडांनी ठेचून मारता तसे आम्ही करणार नाही. आणि अशा प्रकारे लज्जित करून त्यांना योग्य मार्गावर आणू.

**लुई फिशर - आज गोऱ्यांबद्दल फार प्रतिकूल भावना आहे.**

गांधीजी - अर्थातच माझा तिला विरोध आहे. यामुळे कोणाचेही भले होणार नाही.

**लुई फिशर - जग इतके विभागलेले आहे. आणि शक्य आहे की अजून एक युद्ध होईल आणि ते रंगीत व गोऱ्या लोकांमध्ये होईल.**

गांधीजी - असे दिसते की युरोप अजून एका युद्धाकडे जात आहे. अजून तो पुरेसा थकला नाही.

**लुई फिशर - युरोप अतिशय थकलेला आहे. परंतु अणुबॉम्ब हाती आल्यामुळे त्याला माणसाची तितकीशी किंमत राहिलेली नाही. काही थोडेसे वैज्ञानिक असले की त्याला पुरे आहे. पुढील युद्धात काही बटन दाबण्याचे काम राहील. यामुळे रंगभेदावर आधारित युद्ध अजूनच भयानक होणार आहे.**

गांधीजी - भ्याडपणापेक्षा कोणतीही गोष्ट चांगली. भित्रेपणा ही दुहेरी हिंसा आहे.

**आणि आपले म्हणणे स्पष्ट करण्याकरिता गांधीजींनी आफ्रिकेतील एका भीमकाय निग्रो धर्मगुरूची गोष्ट सांगितली. एका गोऱ्याने जेव्हा त्याचा अपमान केला तेव्हा 'मला माफ करा साहेब' असे म्हणून तो दुसऱ्या डब्यात निघून गेला. ही अहिंसा नाही. ही येशूच्या शिकवणुकीची चेष्टा आहे. यापेक्षा तर प्रत्युत्तर देणे अधिक पौरुषपूर्ण झाले असते.**

**लुई फिशर - अशा वेळी आपले स्वतःचे काय होईल ही भीती नसते तर इतरांचे काय होईल ही भीती असते. तुम्ही सांगितलेल्या परिस्थितीत आपल्या भावनांना अभिव्यक्ती देऊन आणि गोऱ्याला थापड मारणे हे अतिशय बेजबाबदारीचे काम होईल. हिंदुस्थानात परिस्थिती वेगळी आहे. इथे गोरे इतके जास्त नाहीत.**

गांधीजी - तुम्ही चुकताहात. इथेही एक इंग्रज जरी मारला गेला तरी गावच्या गाव भस्मसात केले जातात. किती भयानक बदल्याची भावना आहे ही !

हरिजन, ऑगस्ट ४, १९४६

# ३. गांधीजींच्या मुलाखतीचा लुई फिशर यांनी दिलेल्या वृत्तांतातील अंश

पाचगणी,

जुलै १७, १९४६

गांधीजी - जयप्रकाशला माझ्याबरोबर यावेच लागेल. मी त्यांच्याविरोधात उभा राहणार नाही. १९४२ साली मी म्हणालो होतो की मी अनोळखी सागरात माझे जहाज नेत आहे. आता मी तसे करणार नाही. तेव्हा मी लोकांना ओळखत नव्हतो. आता मला माहीत आहे की मी काय करू शकतो आणि काय करू शकत नाही.

**लुई फिशर - हिंसा होईल हे १९४२ साली तुम्हाला माहीत नव्हते?**

गां. - बरोबर.

**फिशर - तर घटनासमितीला अपयश आले तरी तुम्ही सविनय आज्ञाभंग आंदोलन करणार नाही?**

गा. - नाही, तोपर्यंत तरी नाही जोपर्यंत समाजवादी आणि साम्यवादी शांत होत नाहीत.

**फि. - याची शक्यता नाही.**

गां. - जोपर्यंत हिंदुस्थानच्या वातावरणात इतकी हिंसा भरलेली आहे तोपर्यंत मी सविनय आज्ञाभंग आंदोलनाचा विचारही करू शकत नाही. आजही काही सवर्ण हिंदू असे आहेत की जे अस्पृश्यांशी भेदभाव करतात.

**फि. - सवर्ण हिंदूंचा तुमचा अर्थ काँग्रेसच्या लोकांशी आहे काय?**

गां. - बरेचसे कॉंग्रेसी नाही. परंतु त्यांतील काही कॉंग्रेसी असे आहेत की ज्यांनी अजून आपल्या अंतःकरणातून हिंसा काढून टाकलेली नाही. ही अत्यंत दुःखद बाब आहे.... आपल्यावर अतिरेक झाला आहे असे मुसलमानांनाही जाणवते. एका कट्टर कुटुंबातील हिंदूच्या घरात मुसलमानाला ना तर एका चटईवर बसण्याचा अधिकार आहे ना त्याच्याबरोबर जेवण करण्याची परवानगी. हा खोटा धर्म आहे. हिंदुस्थान चुकीच्या पद्धतीने धार्मिक आहे. त्याने खरा धर्म अवलंबिला पाहिजे.

**फि. - तुम्हाला काँग्रेसबरोबर यश आले नाही हे खरे आहे काय?**

गां. - हो, मला यश आले नाही. मी अपयशी राहिलो आहे. हं, मी काही मिळवू शकलो. आता हरिजनांचा मदुरेच्या मंदिरात आणि इतर काही ठिकाणी प्रवेश सुरू झाला आहे आणि सवर्ण हिंदूही त्याच ठिकाणी पूजा करतात.

**फि. - काही म्हणतात की हिंदू मुसलमानांचे संबंध चांगले झाले आहेत तर काही म्हणतात की ते अजूनच बिघडले आहेत.**

गां. - एक काळ होता की जेव्हा जिना आणि इतर मुसलमान पुढारी काँग्रेसचे सदस्य होते. त्यांनी कॉंग्रस सोडली कारण काँग्रेसमध्ये हिंदू लोक जास्त संख्येत सामील होऊ लागले हे त्यांना आवडले नाही. सुरुवातीला प्रमुख कॉंग्रेसी थिऑसऑफिस्ट होते. हिंदू धर्माचे सर्वश्रेष्ठ रूप तेच आहे... सुसंस्कृत मुसलमानही थिऑसॉफिस्टांमध्ये सामील होऊ लागले. नंतर काँग्रेसची सदस्य संख्या वाढू लागली आणि हिंदूंचीही काँग्रेसमध्ये मोठ्या संख्येत सामील होण्याची प्रवृत्ती वाढू लागली. धर्माच्या बाबतीत मुसलमान कट्टरपंथी आहेत परंतु कट्टरतेचे उत्तर कट्टरपणाने देता येऊ शकत नाही. चुकीच्या शिष्टाचाराचा राग येत असतो. वाईट चालीरिती वाढल्या. काँग्रेसच्या प्रतिभाशाली मुसलमानांमध्ये घृणा निर्माण झाली. त्यांना हिंदूंमध्ये माणसामाणसात भ्रातृभावाचा अभाव दिसला. त्यांच्या दृष्टीने माणसाच्या भातृभावाचे नावच इस्लाम आहे. वास्तवात तो मुसलमानांमधील खरा बंधुभाव आहे. माणसामाणसांमधील बंधुभाव ही थिऑसॉफी आहे. हिंदूंमधील वेगळेपणाच्या प्रवृत्तीनेच काँग्रेस आणि लीगमध्ये दरी निर्माण व्हायला मदत केली. जिना वाईट प्रतिभाशाली आहेत. आपण पैगंबर आहो असा त्यांचा विश्वास आहे.

**फि. - ते वकील आहेत.**

गां. - तुम्ही त्यांच्यावर अन्याय करत आहा. १९४४ साली मी त्यांच्याशी १८ दिवस जी चर्चा केली तिच्यावरून मी तुम्हाला सांगतो की आपण इस्लामचे संरक्षक आहो असे त्यांना वाटते....

**फि. - परंतु जिना भावनाशून्य आहेत. ते काटकुळे व्यक्ती आहेत. ते एखाद्या पक्षाची वकिली करतात परंतु एखाद्या विचाराचा उपदेश करत नाहीत.**

गां. - मला मान्य आहे की ते कृष व्यक्ती आहेत. परंतु मी त्यांना धोकेबाज समजत नाही. ते सरळसाधे गृहस्थ आहेत परंतु त्यांनी मुसलमानांवर मोहिनी घातली आहे.

**फि. - १९४२ साली जिनांनी मला सांगितले होते की तुम्हाला स्वातंत्र्य नको आहे, हिंदूंचे राज्य हवे आहे.**

गां. - ते पूर्णपणे चूक आहे. हे हास्यास्पद आहे. मी तर मुसलमान, हिंदू, ख्रिश्चन आणि पारसी हे एकाच वेळी सर्व आहे. मला हिंदू राज्य हवे आहे असे जेव्हा ते म्हणतात तेव्हा ते मला ओळखत नसतात वा ते खरे सांगत नाही. ते तर तिळाचा ताड करणाऱ्या वकिलाप्रमाणे बोलत आहेत. अशा प्रकारचा आरोप तर कोणी विक्षिप्तच करू शकतो. माझी खात्री आहे की मुस्लिम लीगचे लोक घटनासमितीत जातील परंतु शिखांनी मात्र त्याकरिता नकार दिला आहे. ते ज्यूप्रमाणे अडलेले आहेत.....

**फि. - जिनांबरोबर १८ दिवस झालेल्या चर्चेतून तुम्ही काय शिकला?**

गां. - मला हे कळले की ते वेड लागल्याप्रमाणे बोलतात आणि कधीकधी आपले वेड सोडून ते सुज्ञाप्रमाणेही बोलतात. त्यांच्याशी चर्चा केल्याबद्दल मला कधीही पश्चात्ताप झाला नाही. शिकण्याच्या बाबतीत मी कधीच दुराग्रही राहिलो नाही. माझे प्रत्येक अपयश माझी एकेक पायरी होते. जिनांबरोबरच्या बोलण्यात मी प्रगती करू शकलो नाही कारण त्यांना वेड लागल्यासारखे झाले होते. परंतु चर्चेच्या दरम्यानच्या त्यांच्या वर्तणुकीमुळे अनेक मुसलमानही दुःखी झाले होते.

# जुलै १८, १९४६

**फि. - मला वाटते की आझाद हिंद सेना आणि सुभाष चंद्र बोस यांच्या भावनांना तुम्ही घाबरता. ही भावना अतिशय व्यापक आहे. त्यांनी तरुणांचे मन जिंकले आहे. तुम्हाला याची कल्पना आहे आणि या भावनांच्या व्यापकतेला तुम्ही घाबरता. तरुण पिढी आत्मकेंद्रित आहे.**

गां. - त्यांनी हिंदुस्थानचे अंतःकरण जिंकलेले नाही. हा फार व्यापक शब्द आहे. परंतु तरुणांचा आणि स्त्रियांचा एक वर्ग त्यांचे अनुसरण करतो. ईश्वराने हिंदुस्थानकरिता मवाळपणा सुरक्षित ठेवला आहे. "मवाळ हिंदू" हा शब्द दोष दाखवण्याकरिता उपयोजिला जात असतो. परंतु मी या शब्दाला चर्चिलच्या "नंगा फकीर" या शब्दाप्रमाणे भूषणास्पद मानतो. मी हा शब्द प्रशंसनीय समजतो आणि यासंबंधी मी चर्चिल यांनाही लिहिले होते. मी चर्चिलला लिहिले होते की "नंगा फकीर" होण्याची माझी नक्कीच इच्छा आहे परंतु अजून होऊ शकलेलो नाही. ...

**फि. - परंतु तुम्ही बोसची प्रशंसा करता. ते जिवंत आहेत अशी तुमची खात्री आहे काय?**

गां. - मी बोसकथांना प्रोत्साहन देत नाही. मी त्यांच्याशी सहमत नाही. आता ते जिवंत आहेत असाही माझा विश्वास नाही. एकेकाळी माझी सहजप्रेरणा मला ते जिवंत असल्याबददल सांगत होती कारण ते कथेतील रॉबिनहुडसारखे झाले होते.

**फि. - माझा मुद्दा असा आहे. बोस जर्मनी आणि जपान या दोन्ही देशात गेले होते. हे दोन्ही देश फॅसिस्ट आहेत. ते जर फॅसिस्टांच्या बाजूचे असतील तर त्यांच्याबद्दल तुम्हाला सहानुभूती वाटू शकत नाही. ते देशभक्त होते आणि १९४४च्या जर्मनी वा जपानद्वारे आपले रक्षण होऊ शकेल असा जर त्यांचा विश्वास असेल तर ते मूर्ख होते असे म्हणावे लागेल. आणि राजकारणी लोकांकरिता मूर्खपणा करण्याला कोणताही वाव नसतो.**

गां. - राजकारणी लोकांबद्दल तुमचे फार चांगले मत आहे. त्यांच्यातील बरेचसे मूर्ख आहेत. ...मला तर अतिशय विषम परिस्थितीत काम करावे लागते. .... लोकांमध्ये एक हिंसक प्रवृत्ती सक्रिय आहे. तिचा विरोध करावा लागेल व माझ्या पद्धतीने मी तो करतो आहे...

इंग्रजीवरून. लाईफ ऑफ महात्मा गांधी, पृष्ठ ४७२-४

----------------

# ४. लुई फिशर यांना मुलाखत

(प्यारेलाल यांच्या “आफ्टर फोर इअर्स” या लेखातून उद्धृत. लुई फिशर गांधीजींना १७ तारखेला आणि परत १८ तारखेला भेटले होते. हा वृत्तांत अठरा तारखेच्या मुलाखतीचा आहे.)

पाचगणी, [जुलै १८, १९४६]

**लुई फिशर - ‘मी काळोखात चाचपडतो आहे’ वा दीर्घकालीन प्रस्तावासंबंधीची जिला तुम्ही तुमची अंतःप्रेरणा वा आतला आवाज म्हणता त्याचा जर कार्यकारिणीने विचार केला असता तर तिने तो प्रस्ताव फेटाळून लावला असता काय?**

गांधीजी - होय, परंतु मी त्यांना तसे करू दिले नाही.

**लुई फिशर - तुम्ही आग्रह धरला नाही असे तुम्हाला म्हणायचे आहे.**

गांधीजी - त्यापेक्षा जास्त. माझ्या अंतःप्रेरणेचे अनुसरण करण्यापासून मी त्यांना अडवले. मी त्यांना सांगितले की जोपर्यंत तुम्हालाही माझ्याप्रमाणे जाणवत नाही तोपर्यंत तुम्ही माझ्या अंतःप्रेरणेचे अनुसरण करू शकत नाही. काय झाले असते असा अंदाज करून कोणताही लाभ होत नसतो. परंतु तरीही हे खरे आहे की राजेंद्र प्रसाद मला म्हणाले होते की : ‘तुमची अंतःप्रेरणा इतकी मजबूत आहे काय की जिच्यामुळे आम्ही दीर्घकालीन योजना फेटाळली पाहिजे?’ मी म्हणालो, ‘नाही. तुम्ही तुमच्या विवेकाप्रमाणे वागा कारण माझा विवेक माझ्या अंतःप्रेरणेचे समर्थन करत नाही. मला तुमच्याशी प्रामाणिक राहायचे असल्यामुळे मी माझे गैरसमज तुमच्यासमोर ठेवले आहेत. जोपर्यंत माझी विवेकबुद्धी माझ्या आतील आवाजाला पाठिंबा देत नाही तोपर्यंत मीसुद्धा माझ्या अंतःप्रेरणेचे अनुसरण करत नाही.’

**लुई फिशर - परंतु तुम्ही म्हणाला होता की काही विशेष प्रसंगी तुम्ही तुमच्या आतल्या आवाजाप्रमाणे काम करता. काही उपवास करताना तुम्ही असे केले होते.**

गांधीजी - होय, परंतु अशा प्रकरणीसुद्धा मी उपवास सुरू करण्यापूर्वी माझा विवेक माझ्या आतील आवाजाचे समर्थन करू शकला होता. दीर्घकालीन प्रस्तावावर माझ्या विवेकबुद्धीने माझ्या आतील आवाजाचे समर्थन केले नाही.

**लुई फिशर - राजकीय परिस्थितीत तुम्ही तुमच्या ‘आतील आवाजाचा’ प्रश्न का काढला?**

गांधीजी - कारण मला माझ्या मित्रांशी प्रामाणिक राहायचे होते. कारण मला कॅबिनेट मिशनच्या प्रामाणिकपणावरील विश्वास कायम ठेवायचा होता. यामुळे कॅबिनेट मिशनलाही मी माझे गैरसमज सांगितले. मी मलाच सांगितले की ‘त्यांच्यात जर काही कपट असेल तर त्याची त्यांनाच लाज वाटेल.’

**लुई फिशर - आता तर तुम्ही पक्के घटनावादी झाला आहात. घटनेचा विकल्प जर हिंसा असेल तर त्याला तुम्ही घाबरला आहात काय?**

गांधीजी - नाही. भारताच्या नियतीत रक्तस्नान लिहिलेले असेल तर तसेच होईल. मी घाबरायला पाहिजे माझ्या स्वतःच्या भ्याडपणाला वा अप्रामाणिकपणाला. माझ्यात या दोन्ही गोष्टी नाहीत. यामुळेच मी म्हणतो की आपण आत शिरून काम करायला पाहिजे. ते जर प्रामाणिक नसतील तर दिसूनच येईल. यामुळे आमची हानी होणार नाही तर त्यांचीच हानी होईल.

**लुई फिशर - तुम्हाला हिंसक भावनेची भीती वाटते. ती व्यापक आहे. तिने तरुणांच्या मनात घर केले आहे. त्यापासून होणाऱ्या परिणामांमुळे तुम्ही घाबरलेला आहा अशी कल्पना करा.**

गांधीजी - संपूर्ण देशाला तर त्या हिंसेच्या भावनेने प्रभावित केलेले नाही, परंतु मी कबूल करतो की देशातील काही तरुण वर्गावर तिने मोहिनी घातली आहे.

**लुई फिशर - ही अशी वृत्ती आहे की तिला तोंड द्यावेच लागेल.**

गांधीजी - होय. हे मी माझ्या पद्धतीने करत आहे. माझी खात्री आहे की अजूनही त्या हिंसेचे अवशेष शिल्लक आहेत जे वेळ आल्यानंतर स्वतःच नाहीसे होतील. ही वेळ कायम राहू शकत नाही. ही गोष्ट हिंदुस्थानच्या आत्म्याच्या पूर्णपणे विरोधी आहे. परंतु केवळ बोलण्याचा काय उपयोग? माझा अशा शक्तीवर विश्वास आहे की जी आम्हाला घडवते आणि बिघडवतेही. तुम्ही तिला ईश्वर म्हणा की अजून कोणते नाव देऊ शकता. मी केवळ इतकेच सांगतो की हिंसेच्या भीतीने मी देशाला घटनासमितीत जाण्याचा सल्ला देत नाही आहे. नागरी विद्रोहाला सन्माननीय पर्याय मिळाल्यानंतर तो मान्य न करणे ही गोष्ट अहिंसेच्या भावनेच्या विरोधी आहे.

हरिजन, ऑगस्ट ४, १९४६

--------------------

# ब्रिजमोहन हेडा यांचे अनुवादित साहित्य

१) राजबदल - मूळ लेखक बिमल मित्र, अनुवाद - ब्रिजमोहन हेडा, नवभारत प्रकाशन

२) साहिब बीबी गुलाम, मूळ लेखक बिमल मित्र, अनुवाद - ब्रिजमोहन हेडा, दिलिपराज प्रकाशन, पुणे

३) महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड १ - ४ मूळ लेखक प्यारेलाल (महात्मा गांधी - द लास्ट फेजचा अनुवाद) अनुवाद - ब्रिजमोहन हेडा

४) महात्मा गांधी - आदिपर्व, खंड १ - २ मूळ लेखक - प्यारेलाल (महात्मा गांधी - द अर्ली फेजचा अनुवाद) अनुवाद ब्रिजमोहन हेडा

५) महात्मा गांधी - सत्याग्रहाच्या उंबरठ्यावर, मूळ लेखक- प्यारेलाल (महात्मा गांधी - ऑन द थ्रेशहोल्ड ऑफ द सत्याग्रहचा अनुवाद) ,अनुवाद - ब्रिजमोहन हेडा

६) महात्मा गांधी - जन्म सत्याग्रहाचा, मूळ लेखक प्यारेलाल, (बर्थ ऑफ सत्याग्रहचा अनुवाद) अनुवाद ब्रिजमोहन हेडा, (अप्रकाशित)

७) नैतिक धर्म - महात्मा गांधी, अनुवाद - ब्रिजमोहन हेडा, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद

८) गीताबोध - महात्मा गांधी, अनुवाद - ब्रिजमोहन हेडा, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद

९) सर्वोदय - महात्मा गांधी, अनुवाद ब्रिजमोहन हेडा, नवजीवन प्रकाशन मंदिर. अहमदाबाद

१०) महात्मा गांधींची प्रेरणादायक पत्रे, संपादक - श्रीमन नारायण, अनुवाद ब्रिजमोहन हेडा, नवजीवन प्रकाशन मंदिर

११) महात्मा गांधींचे विचार - संपादक - आर. के. प्रभू आणि यू. आर. राव, अनुवाद - ब्रिजमोहन हेडा, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद

१२) गांधीजींचे जीवन - त्यांच्याच शब्दांत - संपादक कृष्ण कृपलानी, अनुवाद - ब्रिजमोहन हेडा, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद

१३) एका गुलामाची आत्मकथा - फ्रेड्रिक डग्लस, अनुवाद ब्रिजमोहन हेडा, दिलिपराज प्रकाशन

१४) प्रार्थना प्रवचन खंड १-२) महात्मा गांधी, अनुवाद ब्रिजमोहन हेडा नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद (वेब आवृत्ती)

१५) बापूंचे आशीर्वाद - दररोजकरिता विचार संकलन आणि अनुवाद ब्रिजमोहन हेडा नवजीवन प्रकाशन मंदिर, (वेब आवृत्ती)

१६) महात्मा गांधी संकलित साहित्य खंड ७१ ते ९८ (अप्रकाशित)

१७) १७.) ट्रोजन हॉर्स आणि इतर कथा - दिलिपराज प्रकाशन

१८) ताओ - लाओ त्से, अनुवाद ब्रिजमोहन. लोकव्रत प्रकाशन

१९) अनासक्तीयोग - महात्मा गांधी - अनुवाद ब्रिजमोहन. लोकव्रत प्रकाशन (वेब आवृत्ती)

२०) दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा इतिहास - महात्मा गांधी, अनुवाद ब्रिजमोहन हेडा. लोकव्रत प्रकाशन (वेब आवृत्ती)

२१) काफीर - आयान हिरसी अली (अप्रकाशित)

२२) ऍने फ्रँकची डायरी - ऍने फ्रँक (अप्रकाशित)

२३) मॉरी सोबतचे मंगळवार (अप्रकाशित)

२४) गांधींच्या सहवासात एक आठवडा आणि इतर काही मुलाखती - लुई फिशर, अनुवाद - ब्रिजमोहन हेडा

२५) बापूंच्या कारावासाची कहाणी - सुसीला नाय्यर, अनुवाद - ब्रिजमोहन हेडा

* * * * *